# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय– जयंत पाटील
५० खोक्यांचा टिळा भाळी पंचनाम्याची येईल केव्हा पाळी?

**5**
प्रबंध संपादकीय– दिलीप वळसे पाटील
गद्दारांच्या फसव्या घोषणा किती? जनता हाणेल सोटा माथी!

**6**
संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे
महाराष्ट्र–मत्सरी क्षुद्र राज्यकर्ते

**10**
शरद पवार पत्रकार परिषद
कर लादताना केंद्र सरकारने विचार करण्याची आवश्यकता– शरद पवार

**14**
अजित पवार पत्रकार परिषद
१) राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या– १४
२) मूळ प्रश्नांवरुन लक्ष विचलित करण्याचे काम सुरू आहे–१८

**20**
छगन भुजबळ अमृतमहोत्सव समारंभ,भाषणे..
१) शरद पवार–२०
२) उद्धव ठाकरे–२४
३) फारूख अब्दुल्ला–२८
४) अजित पवार–३०
५) प्रफुल पटेल–३५
६) बाळासाहेब थोरात–३६
७) जावेद अख्तर–३८
८) छगन भुजबळ–४०

**50**
माय लॉर्ड...आम्ही गोंधळलो आहोत!
– अनंत बागाईतकर

**58**
पर्व आर्थिक अनिश्चिततेचे, सत्तेच्या बेलगाम केंद्रीकरणाचे_
– अभय टिळक

**64**
एक...एक...एकाचे एकारलेपण!–
– फिरस्ता

**71**
चीनला अडचणीत आणण्याची संधी भारताने गमावली
– जतीन देसाई

**74**
भाजप भ्रमात, चकव्यात
– व्यंकटेश केसरी


**78**
शिवरायांची जलनीती
– प्रकाश पवार

**86**
१) इतिहासकार त्र्यंबक शेजवलकर–८६
२) रिसायतकार सरदेसाई–८९
– प्रा.डॉ. गणेश राऊत

**92**
घंटाकर्ण– कानोकानी (राजकीय किस्से)

**100**
कार्यकर्त्यांच्या प्रबोधनाचा 'राष्ट्रवादी' प्रयोग
– हेमंत टकले

**102**
शेवटचे पान– 'रेड अलर्ट'
–हेमन्त टकले



संचालक
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने मीडिया आर अ‍ॅण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

## अध्यक्षीय



# पन्नास खोक्यांचा टिळा भाळी पंचनाम्याची येईल केव्हा पाळी?

गद्दारी करून महाराष्ट्रात सत्तेवर आलेले शिंदे-फडणवीस सरकार हे शेतकऱ्यांच्या विरोधात असून त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगवेगळे आहेत. राज्याच्या बहुतेक सर्व भागात यंदा प्रचंड अतिवृष्टी झाली. मोठमोठे पूर आले. त्यामुळे खरीप हंगामीतील सोयाबीन, कपाशी, तूर, भात, मका, ज्वारी, बाजरी व इतर डाळवर्गीय पिकांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने काढून घेतला. ऊस पिकाचेही प्रचंड नुकसान झाले. भाजीपाला आणि फळबागा यांच्या नुकसानीची तर मोजदादच होऊ शकत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेली सलग ३-४ वर्षे द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना नुकसानीचा फटका सोसावा लागत असल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील बऱ्याच बागायतदारांनी द्राक्षाच्या बागा उपटून टाकल्या आहेत. त्याऐवजी शेतकरी टिश्यूकल्चर डाळिंबाची रोपे, केळी, भाजीपाला यांची लागवड करण्याकडे आकृष्ट झाले आहेत. बऱ्याच शेतकऱ्यांची शेतजमीनही पूर व अतिवृष्टीमुळे वाहून गेली आहे. मातीचा वरचा थर वाहून गेल्यामुळे उत्पादनक्षम जमीन नापीक बनली आहे. या जमिनीतून भविष्यात पीक कसे काढायचे आणि बँका व सोसायट्यांचे कर्ज कसे फेडायचे असा मोठा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला आहे. शेतकरी कर्जबाजारी झाल्याने व थकबाकीदार बनल्याने त्याला पुन्हा नव्याने कर्ज मिळण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे जमीन पडीक ठेवण्याची वेळ त्यांच्यावर येणार आहे. त्याचा परिणाम शेतीमालाचे उत्पादन घटण्यावर होऊन शेतकऱ्याचा संसार रस्त्यावर येणार आहे.

या संकटातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शिंदे-फडणवीस सरकारकडे सातत्याने ओला दुष्काळ जाहीर करावा, हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, खरिपासाठी घेतलेले कर्ज माफ करावे अशा मागण्या केल्या. यासाठी आंदोलने करून लेखी निवेदनेही दिली.परंतु राज्य सरकारला काही घाम फुटला नाही. सत्तेसाठी एका टोळी बरोबर युती केलेल्या भाजपाला शेती व शेतकऱ्यांबद्दल किती खोटे व वरवरचे (पुतना मावशीसारखे) प्रेम आहे. हे यातून निदर्शनास आले आहे. सरकारने आपल्याला वाऱ्यावर सोडून दिले आहे हे आता शेतकऱ्यांच्याही लक्षात आल्यामुळे ते प्रचंड संतप्त होऊन नाराज झाले आहेत.

शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अजून पंचनामा झालेला नाही. प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन पाहणी करण्यासाठी सरकारकडे तेवढी यंत्रणाच नाही. कृषी खात्यातील एका सहाय्यकाकडे पाच-सहा गावे दिली आहेत. राज्यात ८५ लाख शेतकरी आहेत. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक ही यंत्रणा नुकसान भरपाईची पाहणी व मोजदाद करण्यासाठी पुरेशी नाही. त्यात या यंत्रणेतले अधिकारी पंचनामा करण्यासाठी एकरी ४०० ते ५०० रुपये मागताहेत हे चित्र आपण टीव्हीवर पाहिले आहे. म्हणजे शेतकरी अगोदरच संकटात सापडला आहे, त्याला घरात खायला अन्न नाही आणि सरकारी कर्मचारी लाच मिळाल्याशिवाय नुकसान भरपाईचा पंचनामा करायला तयार नाहीत. राज्य सरकारचा प्रशासन व कर्मचाऱ्यांवर काहीही वचक राहिलेला नसून अस्थिर सरकारमुळे ही भ्रष्टाचाराची बजबजपुरी फैलावते आहे. लहान लहान मुलेही '५० खोके एकदम ओके' अशा घोषणा आता गावोगावी देताना आपण पाहतो आहोत. शिंदे गटाचे आमदार तर पूर्ण बदनाम झालेले आहेत आणि ५० खोक्यांचा टिळा भावी लावून ते मिरवताहेत. शेतकरी पंचनाम्यासाठी आपली केव्हा पाळी येईल याची वाट पाहतो आहे.

मूळ प्रश्नांना हात घालून त्यावर जालिम उपाययोजना करण्याऐवजी इतर तकलादू मलमपट्ट्या लावून शेतकऱ्यांना फसविण्याचा धंदा केंद्र व राज्य या दोन्ही सरकारांनी बेमालूम पद्धतीने चालविलेला आहे. 'खोटे बोल आणि रेटून बोल' हा तर भाजपचा जीवन सिद्धांतच बनला असून आता त्यांच्या नेत्यांच्या प्रत्येक घोषणेवर व वक्तव्यावर फेकू, 'लबाडाचं आवतान जेवल्याशिवाय खरे नाही' असे लोक उघडपणे बोलू लागले आहेत. सरकारचा हा ढोंगी व खोटारडेपणा आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उघड करून जनतेसमोर त्यांचा बुरखा टराटरा फाडला पाहिजे. सत्य लोकांच्या निदर्शनास आणून देऊन महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना आणि केंद्रात कृषीमंत्रीपदी मा. शरद पवार असताना त्यांनी शेतकऱ्यांना संकटकाळात किती भरभरून मदत केली होती, याची आठवण करून दिली पाहिजे.



प्रबंध संपादकीय



# गद्दारांच्या फसव्या घोषणा किती? जनता हाणेल सोटा माथी!

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून चंद्रशेखर बावनकुळे यांची बुद्धी भ्रष्ट आणि उलटी झाली आहे. ज्या देवेंद्र फडणवीस यांनी बावनकुळे हे नितीन गडकरी यांचे समर्थक कार्यकर्ते आहेत म्हणून त्यांना विधानसभा निवडणुकीचे तिकीट मिळू न देता घरची वाट दाखविली होती, ते आता राजकीय पुनर्वसन झाल्यानंतर फडणवीसांचे भाट बनून त्यांच्या कारनाम्यांना कर्तृत्वाची झालर लावून, आरत्या ओवाळू लागले आहेत. "राष्ट्रवादी काँग्रेसने कपट कारस्थान करून उद्धव ठाकरे यांच्यावर जादूटोणा केला. त्यामुळे ठाकरे त्यांच्याबरोबर गेले", असे विधान ठाणे शहरात बोलताना त्यांनी (दि. ५ नोव्हेंबर) केले आहे. ठाणे आणि जादूटोणा यांचा फार जवळचा संबंध असावा अशी शक्यता आता वाढू लागली आहे. कारण शिवसेनेशी गद्दारी करण्यात ज्यांनी पुढाकार घेतला व खोके किंवा कशाचेही का होईना आमिष दाखविले आणि सर्वांना सुरतमार्गे गुहाटीला होऊन गेले ते कामाख्य देवीच्या दर्शनाला. ही देवी जादूटोण्यासाठीच प्रसिद्ध आहे असे सांगितले जाते. खरं-खोटं मला माहिती नाही आणि माझा जादूटोण्यावर विश्वासही नाही. पण बावनकुळे मात्र या जादूटोण्याच्या मंत्रांनी चांगलेच भारावलेले दिसतात. त्यांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आता जादूटोणा दिसू लागला आहे. याचा अर्थ असा आहे की कामाख्य देवीला नवस करून शिंदे यांनी जो मांत्रिक उतारा देवेंद्रजी आणि बावनकुळे यांच्यासह भाजपाच्या इतर नेत्यांवर टाकला आहे त्याची मात्रा आता काम करू लागली आहे. याचे दर्शन जनतेला रोज घडते आहे. मा. पवार साहेबांनी त्यांच्या आयुष्यात कधीही मांत्रिक-तांत्रिक, गंडेदोरे, उतारे, जादूटोणा असले अंधश्रद्धा वाढविणारे धंदे केले नाहीत, कोणत्याही बाबाच्या आहारी ते गेले नाहीत आणि गोरगरीब जनतेची सेवा करण्याचे सोडून रोज देवदर्शने व मंदीरांचे देव्हारे पूजत बसले नाहीत. पवार साहेब नास्तिक नाहीत. ते आस्तिकच आहेत पण माणसांमध्ये परमेश्वर पाहण्याची दृष्टी त्यांना अवगत आहे. सर्वसामान्य कष्टकऱ्यांचा चंद्र दोन वेळेच्या भाकरीतच दडलेला आहे याची पवार साहेबांना जाणीव असल्यामुळे त्यांनी भारतात दुसरी हरितक्रांती यशस्वी करून दाखविली आणि प्रत्येक माणसाला दोन वेळचे अन्न कसे उपलब्ध होईल याची काळजी घेतली. शिंदे-फडणवीस आणि मोदी सरकारने तर शेतकरी पूर्णपणे वाऱ्यावर सोडून देऊन त्यांची वाट लावली आहे आणि दोन-चार उद्योगपतींची घरे भरण्याचा धंदा चालविलेला आहे. हे कुणालाही दिसत नाही आणि लक्षात येत नाही अशातला भाग नाही.

वास्तविक ज्या गुवाहाटीला आमदार पळून गेले होते त्या गुवाहाटीचा अर्थ व महत्व त्यांनी समजून घेतले असते तर ते जादूटोण्याच्या मागे लागले नसते. आसामी भाषेत गुवा म्हणजे सुपारी आणि हाटी म्हणजे बाजार. एकेकाळी संपूर्ण देशाला सुपारी पुरविण्याचे काम गुवाहाटीमधून होत होते. सुपारीचा फार मोठा व्यापार येथे होता. त्यावरून गुवाहाटी हे नाव पडले. सुपारीच्या बाजाराचा नावलौकिक लक्षात घेऊन व व्यापाराचे महत्व समजून घेऊन गद्दार आमदार व मंत्री महाराष्ट्रात आले असते तर मोदी-शहांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी महाराष्ट्रातून गुजरातला जाणारे उद्योगधंदे रोखले असते. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यापासून लाखो-कोटींची गुंतवणूक होणारे आणि लाखो लोकांना रोजगार देवू शकणारे महाराष्ट्रातले उद्योग या गद्दार सरकारने गुजरातच्या घश्यात घातले आहेत. मराठी तरूण युवकांवर बेरोजगारीची व बेकारीची कुऱ्हाड कोसळण्यास राज्य सरकारने हातभार लावला आहे. आता मोदी-शहांनी जादूटोणा केला म्हणून शिंदे-फडणवीस मूकबधिर झाले असे कुणी म्हटले तर ते बावनकुळे यांना चालेल का?

प्रदेशाध्यक्ष पदावर असणाऱ्या माणसाने किती विचारपूर्वक व तारतम्य ठेवून बोलले पाहिजे आणि जनतेला विश्वास वाटेल अशी भाषा वापरून विधाने केली पाहिजेत. पण भाजपचे सगळे धोरणच 'खोटं बोल पण रेटून बोल' अशा प्रकारचे असल्यामुळे हे जुमलेबाज, खोटारडे, विश्वासघातकी, स्वार्थी आणि लबाड सरकार आहे हे लोकांना कळून चुकलेले आहे. आज जनता व सर्वसामान्य माणसे महागाई, बेरोजगारी, सतत वाढत चाललेल्या किंमती, वाढते गुन्हेगारीकरण, दहशत, खंडण्या, गुंडगिरी, धार्मिकता तणाव, काय खायचं आणि काय परिधान करायचं यावर देखील घातली जाणारी बंधने व एकंदरीतच सरकारने स्वातंत्र्यावर घाला घालून धोक्यात आणलेली लोकशाही, राज्यघटना व स्वातंत्र्याची केलेली पायमल्ली यामुळे जनता त्रस्त आहे. ती मतदानाची वाटत पाहते आहे. मतदानाच्या पेटीतून ती असा काही सोटा हाणेल तेव्हा बावनकुळ्यांना जादूटोण्याचा खरा अर्थ कळेल. जनता ही मोठी जादूगार आहे याचा साक्षात्कार लवकरच चंद्रशेखरांना होईल. तूर्तास एवढे पुरे!

## संपादकीय



# महाराष्ट्र-मत्सरी क्षुद्र राज्यकर्ते

एअरबस व टाटा उद्योगसमूहाचा विमाननिर्मितीचा प्रकल्प महाराष्ट्रातून चोरुन गुजरातला नेण्यात आला. याआधी वेदांता-फॉक्सकॉनचा चिप तयार करण्याचा प्रकल्पही गुजरातलाच पळवून नेण्यात आला. यापूर्वी देखील महाराष्ट्रात भाजपचे सरकार असताना असे अनेक प्रकल्प गुजरातला पळवून नेण्यात आले होते. त्यामुळे ही पळवापळवी नवीन नाही. जेव्हा सुमार आणि क्षुद्र बुध्दीचे राज्यकर्ते सत्तेत असतात तेव्हा असेच घडते. या पळवापळवीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणारे राज्यकर्ते हे केवळ गुजरातचे दलाल नाहीत तर महाराष्ट्राच्या मिठाला न जागणारे बेईमान आहेत.

शिवसेनेतून फुटून गेलेल्यांना गद्दार म्हटले जाते. ती गद्दारी एका पक्षापुरती मर्यादित आहे. परंतु ही गद्दारी महाराष्ट्राशी आहे आणि ती खपवून घेणारे राज्यकर्ते पुरुषार्थ गमावलेले आहेत. उद्योग-प्रकल्प पळवापळवीवरुन महाराष्ट्रात संताप व्यक्त होत असल्याचे पाहून केंद्रातल्या राज्यकर्त्यांनी एका कनिष्ठ मंत्र्याला पत्रकार परिषद घ्यायला लावून महाराष्ट्रातील रांजणगावात पाचशे कोटि रुपयांच्या इलेक्ट्रॉनिक व डिजिटल प्रकल्पाची घोषणा करायला लावली. वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पातील गुंतवणूक १ लाख ५४ हजार कोटि रुपयांची आहे तर टाटा-एअरबस प्रकल्पातील गुंतवणूक सुमारे २२ हजार कोटि रुपयांच्या आसपास आहे. त्या बदल्यात काय दिले तर ५०० कोटि रुपयांची गुंतवणूक ? महाराष्ट्रापुढे फेकलेले हे तुकडे ? दिल्लीपतींनी केलेली महाराष्ट्राची ही क्रूर चेष्टा महाराष्ट्र खपवून घेणार काय हा आता सवाल आहे.

महाराष्ट्रातील जनतेने हा अन्याय सहन केला तर स्वाभिमानी छत्रपतींची आम्ही औलाद आहोत हे म्हणण्याचा नैतिक अधिकार महाराष्ट्र गमावणार आहे. महाराष्ट्र हा नामर्द व नेभळटांचा आहे असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल. वेळ आली आहे महाराष्ट्राचे पाणी दाखविण्याची !

गुंतवणुकीबाबत महाराष्ट्र हे राज्य नेहमीच अव्वल राहिले आहे. याचे कारण महाराष्ट्रातील वातावरण गुंतवणुकीला नेहमीच अनुकूल राहिले आहे. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी राज्याच्या हिताला, विकास व प्रगतीला सर्वोच्च प्राधान्य देऊन गुंतवणुकीसाठीचे प्रथम क्रमांकाचे राज्य म्हणून ते विकसित केले. हे करताना महाराष्ट्राने कधीही इतर राज्यांच्या प्रकल्पांची पळवापळवी व चोरी केली नाही. एवढेच नव्हे तर केंद्रात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेत्यांनीही कधी महाराष्ट्राला अवाजवी झुकते माप देऊन अन्य राज्यांवर अन्याय केल्याचे उदाहरणही सापडत नाही. महाराष्ट्रातील नेते केंद्रात अनेक महत्वाच्या व निर्णायक अशा खात्यांचे मंत्री होते पण त्यांनी कधीही इतर राज्यांच्या प्रकल्पांची पळवापळव केली नाही. कारण ते सुमार व क्षुद्रबुध्दीचे राजकारण करणारे नव्हते. आता निव्वळ सूडबुध्दीने पेटलेले नेते राजकारणात सक्रिय आहेत आणि त्यांनी देशाच्या उदार, मध्यममार्गी राजकीय संस्कृतीची पार वाट लावली आहे.

२०१४ मध्ये दिल्लीत सत्तारूढ झालेल्या नेतृत्वाच्या डोळ्यात पहिल्या दिवसापासून महाराष्ट्र खुपत होता. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. दिल्ली ही देशाची राजकीय राजधानी आहे. राजकीय राजधानी काबीज केल्यानंतर या सत्ताधाऱ्यांची नजर आर्थिक राजधानीवर पडणे अगदी अपेक्षितच होते. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी पण आहे. मुंबईसह महाराष्ट्र अस्तित्वात आल्यापासून मुंबई गुजरातपासून तोडली गेल्याची सल खुपत राहिलेली आहे. मुंबई ताब्यात आली नसेल पण मग मुंबईचे आर्थिक राजधानी म्हणून असलेले महत्व पध्दतशीरपणे कमी कसे करायचे आणि बरोबरीने महाराष्ट्राचे आर्थिक खच्चीकरणही कसे करायचे याच्या योजना बहुधा सुरु झाल्या असाव्यात. सत्तेत आल्यापासूनच या योजना अमलात येण्यास सुरुवात झाली होती. मुंबईला आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र सुरु करण्याची घोषणा झालेली होती. परंतु देशाचे पंतप्रधान झालेल्या गुजरातच्या माजी मुख्यमंत्र्यांनी सत्तारूढ झाल्यानंतर पहिले काम केले ते हे वित्तीय केंद्र गांधीनगरला हलविले. हा प्रकल्प आता गांधीनगरला गेला. एवढे करुनही केंद्रातील राज्यकर्ते थांबले नाहीत. त्यांच्या डोळ्यात मुंबईला असलेले रिझर्व बँकेचे मुख्यालयही खुपत होतेच. त्यांनी रिझर्व बँकेचे काही महत्वाचे विभाग दिल्लीला हलविण्याचे काम केले. त्यामुळे मुख्यालय नावाला मुंबईत असले तरी महत्वाचे व सरकारला हवे असलेले विभाग मात्र दिल्लीत असा हा प्रकार करण्यात आला आहे. मुंबईवरील हल्ल्यांनंतर केंद्र सरकारने देशाच्या प्रमुख महानगरांमध्ये असे काही प्रकार घडू नयेत त्याचप्रमाणे सागरी

मार्गाने येऊन किनाऱ्यांवरील प्रमुख शहरांवर हल्ले केले जाऊ नयेत या हेतुने महाराष्ट्रासाठी राष्ट्रीय सुरक्षा गार्डचे केंद्र स्थापित करण्याचा निर्णय केला होता. त्यासाठी पनवेल जवळ जागाही निश्चित करण्यात आली होती. परंतु पंतप्रधान साहेबांनी सत्तेत आल्याआल्या हे केंद्र गुजरातला हलविण्याचा निर्णय केला. बुलेट ट्रेनचा अव्यवहारी प्रकल्प अहमदाबाद ते मुंबई दरम्यान करण्याचे प्रमुख कारण मुंबईचे महत्व पध्दतशीरपणे कमी करुन अहमदाबादचे महत्व वाढविणे हे होते. मुंबईतील हिऱ्यांचा बाजारही सुरतेला मोठ्या प्रमाणात हलविण्यात आला तो याच भूमिकेतून. थोडक्यात मुंबई व महाराष्ट्राला खच्ची करण्याच्या योजनेवर पध्दतशीरपणे काम सुरु आहे.

हे नतद्रष्ट लोक एवढे करुनही समाधानी नाहीत. महाराष्ट्रद्वेष्ट्या भाजप व मुंबईतील काही भाजपनेत्यांनी मुंबई केंद्रशासित करणे कसे योग्य आहे याबाबतचे काही अहवाल त्यांच्या तथाकथित तज्ञ बगलबच्च्यांकडून तयार करुन घेतले आणि त्यांचे सादरीकरण केंद्रीय गृहमंत्रालयापुढे करण्यात आल्याची माहितीही मिळते. मुंबई व महाराष्ट्राच्या विरोधात असलेले हे अस्तनीतील साप वेळीच ओळखण्याची व त्यांचा नायनाट करण्याची वेळ आली आहे. मुंबई केंद्रशासित करण्याची बाब वाटते तेवढी सोपी नसल्याने आणि मुंबई खरोखरच महाराष्ट्रापासून वेगळी केल्यास त्याची तीव्र प्रतिक्रिया निर्माण होऊ शकते हे लक्षात घेऊन मग या महाराष्ट्रद्वेष्ट्यांकडून वेगळा मार्ग अवलंबिण्यात येत आहे आणि मुंबई व महाराष्ट्राचे महत्वच खतम करण्यावर अधिक भर देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे आणि त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्राच्या प्रकल्पांची पळवापळवी सुरु करण्यात आली आहे. नागपूरजवळ मिहान प्रकल्प हा एअरबस विमान कंपनीसाठी निश्चित करण्यात आला होता. याठिकाणी विमानांना लागणाऱ्या सुट्या भागांच्या उत्पादनाबरोबरच विमानांच्या देखभालीचे प्रमुख केंद्र म्हणून ते विकसित करण्याची योजना होती. याखेरीज टाटा उद्योग समूहाबरोबरच्या भागीदारी प्रवासी व वाहतुकीसाठी लागणाऱ्या विमानांचे उत्पादन करण्याचाही या प्रकल्पात समावेश होता. मनमोहनसिंग सरकारच्या काळातच या प्रकल्पाला मान्यता देऊन पुढील काम सुरु करण्यात आले होते. परंतु गुजरात विधानसभा निवडणुकांच्या ऐन तोंडावर हा विमान प्रकल्प गुजरातला हलविण्यात आला. त्याच्या आधीच वेदांता-फॉक्सकॉन चिप उत्पादन प्रकल्प देखील गुजरातलाच हलविण्यात आला.

या प्रकल्प पळवापळवीच्या प्रकरणी आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरु होणे अत्यंत स्वाभाविक आहे. महाराष्ट्र विकास आघाडी(शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस)च्या नेत्यांना सत्तारूढ भाजप व शिंदेगटाच्या विरोधात हा भरपूर दारूगोळा मिळाला आहे आणि ते त्याचा वापर करु लागले आहेत. काही काळ यामुळे बचावात गेलेल्या भाजप व शिंदे गटाने आता आक्रमकपणे याचा मुकाबला करण्याचे ठरविलेले दिसते. प्रकल्प गुजरातला जाण्यास महाराष्ट्र विकास आघाडीच्या सरकारचा निष्काळजीपणा व ढिलाई कारणीभूत ठरल्याचा त्यांचा मुख्य आरोप आहे. त्यासाठी कुणाला तरी माहिती अधिकारात अर्ज करायला लावण्यात आला आणि एका दिवसात त्याचे उत्तर पाठविण्यात येऊन महाराष्ट्र विकास आघाडीच्या ढिसाळ धोरणांमुळेच फॉक्सकॉन-वेदांता प्रकल्प गुजरातला गेल्याचे उत्तर देण्यात आले. या प्रकल्पाच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीची बैठकच सहा महिने न झाल्याने अखेर या प्रकल्पाने महाराष्ट्रातून काढता पाय घेतला असे भाजप-शिंदेगटाला सोयीस्कर राहणारे उत्तर माहिती अधिकाराच्या अर्जाला देण्यात आले आहे.

यातील गंमतही लक्षात घेणे महत्वाचे आहे. सर्वसाधारणपणे माहिती अधिकारा अंतर्गत एखादी माहिती मिळविण्यासाठी केलेल्या अर्जावर उत्तर मिळण्यास भरपूर दिवस लागत असतात कारण माहिती अधिकार कार्यालय तेवढे सक्षम नाही. परंतु या अर्जावर मात्र चक्क एका दिवसातच उत्तर पाठवून भाजप-शिंदेगटाला दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आता हे सर्व कसे घडून येते यामागील गमतीजमती सर्वांनाच माहिती आहे. प्रकल्पांची ही पळवापळवी वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण महाराष्ट्रातून पळवले जाणारे प्रकल्प फक्त गुजरात या एकाच राज्यात जाताना दिसत आहेत. याचे कारण काय ? हा निव्वळ योगायोग की हे सर्व योजनाबध्द रीतीने केले जाणारे काम आहे ? योगायोग असूच शकत नाही. या पळवापळवीमागचे प्रमुख कारण आहे ते गुजरातमध्ये येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका हे आहे. त्यामुळे हे जाणीवपूर्वक व योजनाबध्द रीतीने केले जात आहे हे स्पष्ट आहे. या पळवापळवीबद्दल सत्तापक्षाचे पाळीव प्रचारक आणि महाराष्ट्रात राहूनही महाराष्ट्राशी प्रतारणा करणारी काही परधार्जिणे मराठी मंडळी आहेत. काही पाळीव प्रचारक तर यूट्यूबवरुनही त्यांच्या अकलेचे तारे तोडत असतात. महाराष्ट्राचे मीठ खाऊन त्या मिठाला न जागून हरामखोरी करणारा एक यूट्यूब प्रचारक मोठा आव आणून म्हणतोय की हे प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेले तर बिघडते काय? गुजरात हा भारताचाच भाग आहे ना? हा हरामखोर आणखी काय म्हणतोय? तर म्हणे महाराष्ट्र व गुजरातचे पुन्हा एक संयुक्त राज्य करुन टाका म्हणजे असे वाद निर्माण होणार नाहीत.

महाराष्ट्रात असे फितूर पैदा व्हावेत हे महाराष्ट्राचे व मराठी माणसाचे दुर्दैव आहे. या परधार्जिण्या व सत्तापक्षाची चाटुकारिता करताकरता मराठीपण विसरलेल्या पाळीव प्रचारकाला हे विचारावे लागेल की कर्नाटकही भारतातच आहे मग महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नही निकालात काढायला हवा. आणि या पाळीव प्रचारकाच्या म्हणण्यानुसार गुजरात भारतात आहे आणि त्यामुळे एखादा प्रकल्प गुजरातला गेला तर बिघडले कुठे ? तर मग या पाळीवाला उलटा प्रश्न करावा लागेल

''अरे पाळीवा,तुझ्याच म्हणण्याप्रमाणे सगळी राज्ये भारतातच आहेत तर मग महाराष्ट्रातच तो प्रकल्प ठेवायला काय हरकत होती ?' प्रकल्प पळवापळवीचे कोणतेही सबळ व समर्थनीय कारण देता येत नसल्याने असली लंगडी कारणे किंवा भंपक युक्तिवाद - गुजरात भारतातच आहे ना ? - करण्याचे काम किंवा केविलवाणी धडपड भाजप व त्यांचे पाळीव प्रचारक करु लागले आहेत.

मराठी माणूस आणि मराठी मातीशी बेईमानी करणारी ही जी पाळीव जमात आहे त्यांनी मराठी माणसांविरुध्द आणखी एक दुष्प्रचार सुरु केला आहे की मराठी माणसाला कामच करायला नको असते, गुंतवणूकदारांना राजकीय पक्ष, कामगार संघटना, स्थानिक दादा व गुंड कसे त्रास देतात आणि त्यामुळे वैतागून हे गुंतवणूकदार महाराष्ट्र सोडून जात आहेत !

आता याला गद्दारी म्हणायचे की आणखी काही ? खरोखर अशा गद्दारांना महाराष्ट्रातून हद्दपार करण्याची वेळ आली आहे. ही मंडळी म्हणजे मीरजाफर व जयचंद यांची अवलाद आहे. सोशल मीडियावर असे अनेक लोचट, लाचार व स्वाभिमानशून्य मराठी पाळीव प्रचारक आपल्या अकलेचे तारे पाजळत आहेत. अरे लोचट स्वाभिमानशून्यांनो गुजरातची बाजू जरूर घ्या पण महाराष्ट्राला, स्वतःच्या मातीला नावे तरी ठेवू नका ! अपात्र व्यक्तींची इतकी लाचारी नका रे करु !

अरे पाळीव प्रचारकांनो महाराष्ट्रात गुंडगिरी, दादागिरी, खंडणीवसुली अशासारखे वातावरण असते तर उद्योगधंदे-व्यवसाय यामध्ये राज्याला पहिला क्रमांक मिळाला असता का? गुंतवणूकदारांनी कधीच महाराष्ट्रातून काढता पाय घेतला असता. अरे सत्तापक्ष चापलुसांनो कितीही पळवापळवी केली तरी अजुनही महाराष्ट्रातले गुंतवणुकीसाठीचे वातावरण देशात अव्वल दर्ज्याचे आहे आणि आजही महाराष्ट्र आघाडीवरच आहे. महाराष्ट्राबद्दलच्या मत्सर व आसूयेने पेटलेल्या जोडगोळीला ते सहन होत नाही म्हणूनच त्यांनी त्यांची संस्कृती व त्यांच्यावरील संस्कारांनुसार पळवापळवीचे प्रकार सुरु केले आहेत. आणि पाळीव प्रचारकांना एवढीही शरम राहिलेली नाही की पावणेदोन कोटि लाख रुपयांच्या गुंतवणुकीच्या बदल्यात पाचशे कोटि रुपयांच्या क्षुद्र व क्षुल्लक गुंतवणुकीचे तुकडे महाराष्ट्रापुढे फेकण्याचे धाडस ही जोडगोळी करीत आहे ? महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला जाणीवपूर्वक डिवचण्याचे काम ही जोडगोळी करीत सुटली आहे. त्यांचे महाराष्ट्रातले स्वामीनिष्ठ, पाळीव व स्वाभिमानशून्य हस्तक हा अन्याय निमूटपणे सहन करीतच आहेत आणि वर निर्लज्ज समर्थनही करीत सुटले आहेत.

देशाच्या पंतप्रधानसाहेबांना पोरकट कोट्या करण्याची सवय जडलेलीच आहे. काहीतरी नवीन शाब्दिक गमतीजमती करण्याच्या सवंग सवयीचा व त्यांच्या संस्कार व संस्कृतीचा तो भाग असावा. गेल्या काही निवडणुकांमध्ये त्यांनी 'डबल इंजिन'चे सरकार असा शब्दप्रयोग प्रचलित केला आहे. म्हणजे केंद्रात तर जोडगोळीचे सरकार आहेच. पण राज्यांमध्येही भाजपचे सरकार स्थापन करावे म्हणजेच 'डबल इंजिन'चे सरकार झाल्यास राज्याचा विकास वेगाने-जलदगतीने-गतिमान होईल असा त्यांचा फारच आवडता सिध्दांत ते नेहमीच मांडत असतात. आता महाराष्ट्रातही या जोडगोळीचे पाळीव सरकार असताना त्यांना महाराष्ट्रातून प्रकल्प पळवापळवीचे कारण काय ? डबल इंजिनाचे सरकार याचा अर्थ आपल्याच मालगाडीत चोऱ्यामाऱ्या करणे नव्हे ना ? चोऱ्यामाऱ्यांचेच संस्कार आणि संस्कृती असलेले लोक सवयीचे असे काही गुलाम असतात की ते स्वतःच्या घरातही चोरी करायला मागेपुढे पहात नाहीत.

आता पाळीव प्रचारकांना आणि दिल्लीतील जोडगोळीच्या महाराष्ट्रातील स्वाभिमानशून्य व पुरुषार्थ गमावलेल्या हस्तकांना आणखी एक प्रश्न यानिमित्ताने करावासा वाटतो की चोऱ्यामाऱ्या, लांड्यालबाड्या व पळवापळवी कुणाकडे करतात ?

ज्यांच्याकडे सधनता, समृध्दी असते त्यांच्यावरच डाके पडतात, त्यांच्याकडेच चोऱ्या होतात. महाराष्ट्र हे राज्य सुरुवातीपासूनच उद्योग-व्यवसाय-गुंतवणुकीला अनुकूल राहिलेले आहे. महाराष्ट्र हे एक सधन व समृध्द राज्य आहे. या राज्याचे संस्कार व संस्कृती खानदानी आहे. महाराष्ट्र हे स्वाभिमानी राज्य आहे आणि व्यापारी संस्कृतीच्या प्रभावापासून मुक्त असलेले राज्य आहे. महाराष्ट्राने कुणाच्या म्हणजेच अन्य राज्यांच्या प्रकल्पांची पळवापळवी केलेली नाही. आपल्या पात्रतेच्या, गुणवत्तेच्या आधारावरच महाराष्ट्राने आघाडीचे औद्योगिक राज्य म्हणून घोडदौड करीत प्रगती व विकासाची भरारी मारलेली आहे. राज्याचा एखादा नेता केंद्रात निर्णायक पदावर आहे म्हणून त्या पदाचा गैरवापर व गैरफायदा घेत राज्यात प्रकल्प व गुंतवणूक करवून घेण्याचे धंदे महाराष्ट्राने किंवा कोणत्याही मराठी नेत्याने केले नाहीत. म्हणूनच महाराष्ट्राची प्रगती व विकास हा स्वबळावर, स्वकर्तृत्वावर, स्वगुणवत्तेवर झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्राला नावे ठेवणाऱ्या फंदफितुरांना आता धडा शिकविण्याची वेळ आली आहे.

जाता जाता या देशाच्या नेतृत्वाबद्दलही काही शब्द लिहावे लागतील. देशाचे नेतृत्व म्हणजेच पंतप्रधानपद हे संपूर्ण देशाचे असते. एखादी व्यक्ती पंतप्रधान होते तेव्हा ती व्यक्ती संपूर्ण देशाची पंतप्रधान असते. ती व्यक्ती केवळ एका राज्याचे प्रतिनिधित्व करीत नसते तर संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करीत असते. त्या व्यक्तीकडून देशातील सर्व जनतेला, राज्यांना, प्रदेशांना समान वागणूक मिळण्याची फक्त अपेक्षा नसते तर ते घटनात्मक, नैतिक बंधन असते. पंतप्रधान केवळ त्यांच्या गृहराज्याबाबतच विचार करणारा व त्या राज्यालाच विशेष झुकते माप देणारा नसावा अशी सर्वसाधारण मान्यता असते व आहे. असे भेदभावाचे म्हणजेच स्वतःच्या राज्याला झुकते माप देणे आणि इतर राज्यांना खाली खेचण्याचे काम करणे

हे पंतप्रधानपद भूषविणाऱ्या व्यक्तीला शोभादायक नाही. ही अत्यंत हलकी, सवंग आणि निम्नस्तरावरची मनोवृत्ति मानली जाते. याचा अर्थ गृहराज्याचा विकास किंवा प्रगती याकडे दुर्लक्ष करणे असा होत नाही. पण याचा अर्थ असाही होत नाही की दुसऱ्या राज्याच्या तोंडातले घास काढून स्वतःच्या राज्याची खळगी भरत बसणे ! पंतप्रधानपदाकडून ही पक्षपाती मनोवृत्ति अपेक्षित नाही. याला सुसंस्कारित मनोवृत्ति मानता व म्हणता येणार नाही. एखाद्या प्रगतीशील व विकसित राज्याला नामोहरम करणे, त्याच्या प्रगतीला अडथळे निर्माण करणे हे फारसे शोभा देणारे नाही. मनाची उदारता व मनाचा मोठेपणा नाटकी शब्द व त्याचे सोंग करुन सिध्द होत नाही. प्रत्यक्ष कृतीत ते शब्द उतरतात की नाही यावरुन त्या व्यक्तीची श्रेष्ठता व मनाचा मोठेपणा स्पष्ट होतो. पं. नेहरूंना नावे ठेवणे, त्यांचा द्वेष करणे याला फारशी बुध्दी लागत नाही. असे म्हणतात की शिवीगाळ करायला बुध्दी लागत नाही. परंतु गुणवान होणे हे कष्टप्रद असते. परनिंदेने स्वतःचे मोठेपण सिध्द होत नाही. स्वतःचा मोठेपणा इतरांनी मान्य करावा लागतो. पं. नेहरूंनी या देशाच्या आधुनिकतेचा पाया घातला, या देशात लोकशाही संस्कृती रुजविली. हे करताना त्यांनी ते कोणत्या राज्याचे आहेत याचा विचार केला नव्हता कारण ते देशाचे पंतप्रधान होते. त्यांची दृष्टी व मनोवृत्ति विशाल व उदार होती. तिला क्षुद्रपणाचा स्पर्शही नव्हता. याचे कारण त्यांच्यावरील संस्कार व त्या संस्कारांनी विकसित झालेली त्यांची खानदानी संस्कृती हे होते. आपल्याच गृहराज्याला सर्व काही मिळाले पाहिजे ही लालसा आत्मघातकी आहे. परदेशी पाहुण्यांना देखील फक्त गुजरातला नेण्याचा पोरकट अट्टाहास अनेक वेळेस केला गेला. याला निव्वळ पोरकट अपरिपक्वता म्हणावे लागेल. परंतु तेही खपवून घेण्यात आले. आता दुसऱ्या राज्यातील प्रकल्पांची पळवापळवीचे सुरु करण्यात आलेले प्रकार हे निंदनीय आहेत. ही प्रथा किंवा पायंडा अनिष्ट आहे. पंतप्रधानपद हे कायमस्वरुपी नाही. परंतु पाडण्यात आलेला पायंडा इतिहासात नोंदला जातो. त्याच तालावर भविष्यातील एखाद्या पंतप्रधानांने केवळ गृहराज्याचेच भले करण्याचे पक्षपाती प्रकार केल्यास त्याला दोषी कसे मानता येईल ?

असा प्रचार केला जात आहे की महाराष्ट्रातील बिगर-भाजप महाविकास आघाडीच्या सरकारने टाटा-एअरबस व वेदांता प्रकल्पाकडे दुर्लक्ष केले. पण पंतप्रधान म्हणून महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांचे कान धरणे आणि त्यांना हे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रोत्साहित करणे ही निःपक्ष पंतप्रधानांची जबाबदारी असते. पक्षपात करुन संबंधित प्रकल्प पळवून स्वतःच्या गृहराज्यात नेणे असा त्याचा अर्थ होत नाही. हे अत्यंत अशोभनीय व पंतप्रधानपदाला साजेसे आचरण व कृति नाही. याचे राजकीय परिणाम फारसे चांगले होणार नाहीत. याची प्रतिक्रिया तीव्रतेने व प्रखरतेने होईल हे ध्यानात ठेवावे

## चोर की दाढी में तिनका...

**चोरी पकडल्यानंतर खजील पणा लपविण्यासाठी आणि अर्थातच चोरी लपविण्यासाठी काहीतरी परिमार्जनाचा आव आणायचा त्या थाटात महाराष्ट्राला दोन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर केल्याची घोषणा पंतप्रधानसाहेबांनी करून उदारपणाचा मोठा आव आणला आहे. ते निव्वळ ढोंग आहे. आपण अपराध केल्याची ती कबुली आहे. त्याला आणखी एक मराठी शब्द आहे – पापक्षालन ! किंवा प्रायश्चित्त ! महाराष्ट्रावर घोर अन्याय करायचा आणि मागाहून त्यावर पांघरून घालून सारवासारव करण्यासाठी घोषणाबाजी करायची असला हा प्रकार आहे. प्रकल्प केवळ मंजूर करण्याची घोषणा म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याचा प्रकार आहे. पंतप्रधान साहेबांनी महाराष्ट्राचे दोन मोठे प्रकल्प अन्यायाने गुजरातला पळवले आहेत हे सत्य आहे. आता घोषणाबाजी करून या अन्याय व अपमानाची भरपाई होणार नाही. मराठी माणूस हा अन्याय आणि अपमान खपवून घेणार नाही. या अपराधाला क्षमा नाही !**

लागेल. याची शिक्षा भाजपच्या महाराष्ट्र शाखेला भोगावी लागेल. यातून पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय तीव्रतेने व प्रखरपणे पुढे येणार आहे. सध्या हा विषय चर्चेत आहे. विशेषतः, जेव्हा बेकारीसारख्या समस्या तीव्र होत असताना अशा रीतीने प्रकल्प पळवापळवी करुन रोजगाराच्या संधीच नाकारण्याच्या किंवा नष्ट करण्याच्या या कृतीवर होणारी प्रतिक्रिया सौम्य नसेल तर जहाल असेल याची जाणीव संबंधितांनी ठेवण्याची वेळ आली आहे.

एखादा पंतप्रधान जेव्हा स्वतःच्या गृहराज्याबद्दल नको एवढा पक्षपाती असेल तर ती बाब घटनाबाह्यही ठरु शकते. कारण ही बाब संघराज्य पध्दतीला छेद देणारी आहे. पंतप्रधान हा राज्यघटनेशी बांधील असतो आणि राज्यघटनेत समाविष्ट प्रत्येक तत्वाशी त्याची बांधिलकी असते. संघराज्य पध्दती हे राज्यघटनेतील महत्वाचेच नव्हे तर भारतीय लोकशाहीतले मूलभूत तत्व आहे. त्याच्याशी प्रतारणा करणे आणि दुसऱ्या राज्यातील प्रकल्पांची पळवापळव करुन ते स्वतःच्या राज्यात नेणे हे घटनाबाह्य किंवा घटनेशी विसंगत आचरण आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीतील विजयासाठीची ही धडपड आहे हे कुणीही समजू शकतो. परंतु पळवापळवीचे संस्कार व संस्कृति यामुळे मिळालेला विजय हा तेवढाच निंदनीय व डागाळलेला असेल.



# कर लादताना केंद्र सरकारने विचार करण्याची आवश्यकता

## शरद पवार




करातून उत्पन्न मिळते, ही बाब मान्य आहे. पण, कर लादताना तो किती प्रमाणात लादावा, याचाही काहीतरी विचार होण्याची गरज आहे. केंद्र सरकार राबवित असलेली कररचना अतिशय सदोष आहे. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना जीएसटी लागू करण्याबाबत राज्याच्या मुख्यमंत्र्यांची जी बैठक आयोजित केली गेली, त्यात जीएसटीवर सर्वाधिक हल्ला नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून चढविला होता. मात्र, आज त्यांची भूमिका ही वेगळी झालेली आहे. जीएसटीच्या माध्यमातून अधिक उत्पन्न मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मात्र, त्याचा परिणाम सर्वच व्यवसायांवर झालेला दिसत आहे.

सोन्याच्या खरेदीवर ३८ टक्क्यांपर्यंत, तर वाहनखरेदीवर ४० टक्क्यांपर्यंत कर लावला जातो. महाराष्ट्र ऑटोमोबॉईल हब आहे, या माध्यमातून रोजगारनिर्मिती तर होतेच, पण त्याबरोबर अनेक लघुउद्योगही चालतात, यामुळे हा कर या सर्वांवर परिणाम करणारा ठरत आहे. व्यापार वाढवायचा असेल तर राज्य व केंद्राचे धोरण पूरक हवे. प्रोत्साहनात्मक हवे. चांगले वातावरण तयार करायला हवे.

आज जर्मनी व अमेरिकेत काही कंपन्या संकटामुळे बंद पडलेल्या आहेत, ही संधी समजून आपण काहीतरी पावले उचलायला हवीत. भारतीय वंशाचे उद्योगपती इंग्लंडच्या पंतप्रधानपदापर्यंत मजल मारु शकत असेल तर आपण भारतीय काहीही करु शकतो. या जिद्दीने काम करणे गरजेचे आहे.






राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खासदार शरद पवार यांनी ऑक्टोबर महिन्यात काही कार्यक्रमांतून तसेच पत्रकार परिषदांमधून देशातील आणि राज्यातील विविध विषयांवर व्यक्त केलेल्या मतांचा एकत्रित आढावा..

पुण्याच्या परिसरात नामांकित चार-पाच उद्योगपतींनी उद्योग सुरु केल्याने चार लाख लोकांना रोजगाराची संधी मिळाली. हिंजवडीमधील सॉफ्टवेअरमधून दोन लाख कोटींचा व्यापार होतो, या बाबी विचारात घेतल्या गेल्या पाहिजेत.

साखर कारखान्यांनी साखरेसोबत इथेनॉल व वीजनिर्मिती सुरु केल्याने अनेक कारखान्यांनी आता जिल्हा बँकाकडून कर्जे घेणे थांबविले असून ते स्वयंपूर्ण होत आहेत, ब्राझील व थायलंडमधील संकटाचा भारतीय साखर उद्योगाला चांगला फायदा मिळणार असून त्याने बाजारपेठेतही उर्जितावस्था येईल.

ज्यांच्या हातात देशाची, राज्याची सूत्रे आहेत. त्यांनी ग्रामीण भागातील जनतेच्या हितासाठी काही ठोस पाऊले टाकली पाहिजेत. पण ती टाकायची त्यांची तयारी नाही. निर्णय घ्यायला तयार नाहीत. १९७८ साली मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो, तेव्हा खेड्यापाड्यात मोठा दुष्काळ होता. तेव्हा १५ दिवसांत मी शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते. माझ्याकडे केंद्राची जबाबदारी आली, तेव्हा ३ महिन्यांत ७२ हजार कोटींचे शेतकरी कर्ज माफ केले होते.

## शिंदे-फडणवीसांची कर्जमाफीची 'ती' घोषणा म्हणजे ढळढळीत खोटं

भू विकास बँकेच्या कर्जमाफीबाबत शिंदे-फडणवीस सरकारकडून केला जाणारा दावा हा पूर्णपणे फसवा आहे. आम्ही भू विकास बँकेतील शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले, असे राज्य सरकारकडून सांगितले जाते. पण मला इथे बसलेल्या लोकांनी सांगावं की, गेल्या १० वर्षांमध्ये किमान एका शेतकऱ्याला तरी भू विकास बँकेचे कर्ज मिळाले आहे का? भू विकास बँक अस्तित्त्वात आहे, ही गोष्ट तरी तुम्हाला माहिती आहे का? भू विकास बँक एकेकाळी होती, पण आता ती राज्यात कार्यरत नाही. आता भू विकास बँकेचे नावही कोणाला माहिती नाही. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून भू विकास बँकेने दिलेल्या कर्जांची वसुलीच झालेली नाही. ही वसुली होणार नाही, हे कळल्यानंतर राज्य सरकारने घोषणा केली की, आम्ही भू विकास बँकेतील शेतकऱ्यांची कर्जे माफ करत आहोत. लबाडाच्या घरचं आवतणं जरी असलं तरी जेवल्याशिवाय

खरं नसतं, असा हा एकंदरित प्रकार आहे.

## महाविकास आघाडीने एकत्रित काम करावे

उद्या वेळ आल्यावर आमची इच्छा आहे की महाविकास आघाडीमधील घटक पक्षांनी एकत्र येऊन काम करावे. पण ही जरी इच्छा असली तरी जागेचे वाटप हा एक कळीचा मुद्दा असतो. त्यावर किती एकवाक्यता होते यावर हे अवलंबून आहे. परंतु आमचा प्रयत्न राहील की यात एकवाक्यता आणून सामूहिकरीत्या लोकांसमोर येऊन जारी करावे. आज दिल्लीतील सत्तेत असलेल्या घटकांना त्यांना भविष्यात पर्याय राहू शकेल असा एखादा पक्ष, संघटना किंवा पक्षाच्या चिन्हावर उमेदवाराची निवड करून कधीही लढवल्या जात नाहीत.

शरद पवारांचा गड कोणता हे मला अजून माहिती नाही. काही मतदारसंघात आपण अनेक वर्ष काम करतो, लोकांशी सुसंवाद ठेवतो. त्यामुळे लोक अनुकूल भूमिका घेतात. पण दुसऱ्या पक्षाला या ठिकाणी आपले स्थान मजबूत करावे असे वाटले तर त्यात काही गैर नाही. म्हणून बारामतीत केंद्रीय नेतृत्व यायला लागले तर त्यांचे आम्ही स्वागत करतो. केंद्रीय मंत्री या ठिकाणी आल्यानंतर येथील विकासाचे जे प्रश्न प्रलंबित आहेत त्यात सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे.

पक्षात संघटनात्मकरित्या निवडणुका या लोकशाही




शक्ती दिसत असल्यास त्यांच्यामागे काही ना काही लावून त्रास देण्यात येतो. केंद्रीय सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवरून अशा प्रकारची भावना लोकांमध्ये झालेली आहे.

ग्रामपंचायत निवडणुका आम्ही कोणीही पक्षाच्या वतीने लढवत नाही. यात कुठेही पक्षाचे चिन्ह अथवा पक्षाचे नाव नसते. या निवडणुका झाल्यावर आकड्यांचा जो दावा केला जातो त्याला अर्थ नाही. जिल्हा परिषद महत्त्वाची असते, कारण ती पक्षाच्या नावावर लढली जाते. या निवडणुका पद्धतीने होतात ही जमेची बाजू आहे. खर्गे व आम्ही सर्वजण संसदेत एकत्ररित्या काम करतो आहोत. त्यामुळे अनेक वर्षांपासून संघटनेत काम करणारी व्यक्ती म्हणून त्यांचा परिचय आम्हा सर्वांना आहे. त्यामुळे अशी व्यक्ती त्याठिकाणी आल्यामुळे त्याचा परिणाम संघटनेच्या दृष्टीने चांगला होईल.

## अंधेरी पोटनिवडणुकीबाबत...

अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल याची मला खात्री होती. अखेर भाजपाने

या निवडणुकीतून माघार घेतली. हा निर्णय स्वागतार्ह आहे. याचा मला आनंद आहे. एकदा त्यांनी माघार घेतली आहे त्यावर शंका किंवा इतर काही बोलणे योग्य नाही. मुळात ही पोटनिवडणूक आहे. रमेश लटके यांचे निधन झाल्यामुळे ही निवडणूक होत आहे. त्यांच्या पत्नीला जागा मिळणार अशी शक्यता होती. आधी निर्णय घेतला असता तर फायदा झाला असता का, तर निर्णय आता झाला किंवा आधी झाला, यापेक्षा निर्णय घेतला हे महत्त्वाचे आहे. असे निर्णय पटकन होत नसतात. त्याला काही ग्राऊंड वर्क करावे लागते.



महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर पोटनिवडणूक जाहीर झाली होती. त्या प्रसंगी मी स्वतः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष म्हणून मी स्वतः भूमिका घेतली होती की, गोपीनाथ मुंडे यांच्या परिवारातील कोणी उमेदवार उभा राहत असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा उमेदवार उभा करणार नाही. तसा निर्णयही घेतला.

या पूर्वीही महाराष्ट्रात पोटनिवडणूक झाल्या त्यावेळी अशी भूमिका घेण्यात आली नाही. याचे कारण आताची ही निवडणूक दीड वर्षासाठी होत आहे. यानंतर विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे वर्षा-दीड वर्षासाठी निवडणूक घेणे टाळता येईल तर बरे होईल. गोपीनाथ मुंडे यांच्यावेळी पोटनिवडणूक घेण्यात आली तेव्हा पावणे पाच वर्षांचा कालावधी होता. महापालिकेने ऋतुजा लटके यांचा राजीनामा मंजूर केला नाही. त्यांना कोर्टात जावे लागले. मुंबई महानगरपालिकेने वेळीच योग्य निर्णय घेतला असता तर त्यांना कोर्टात जाण्याची वेळ आली नसती. परंतु वेगळी भूमिका मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी घेतली. त्यामुळे कोर्टात जावे लागले. कोर्टाने निर्णय देऊन मुंबई पालिकेला योग्य संदेश देत योग्य रस्ता दाखवला.



## खेळामध्ये राजकारण नको

बीसीसीआय आणि एमसीए निवडणूक झाली. खेळामध्ये आम्ही कोणी राजकारण आणत नाही, राजकीय भूमिका घेत नाही. ज्यावेळी मी बीसीसीआय अध्यक्ष होतो तेव्हा नरेंद्र मोदी हे सुद्धा मीटिंगला उपस्थित राहायचे. त्यावेळी ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. एमसीए ही चांगली संघटना आहे. देशामध्ये राज्य संघटना म्हणून एमसीए ही प्रभावी संघटना म्हणून कार्यरत आहे. या संघटनेचे साधारणतः ४०० सदस्य असतील पण ते कोणीही राजकारण यामध्ये आणत नाहीत.

हिमाचल प्रदेशाची निवडणूक लागली पण गुजरातची निवडणूक लागली नाही. आम्हाला आश्चर्य आहे की, निवडणूक आयोगाने सगळ्यांच्या निवडणुका एकत्र घेतल्या असत्या तर निवडणूक आयोगाच्या कामाबाबत ज्या शंका घेतल्या जातात, त्या शंका घेतल्या गेल्या नसत्या. निवडणूक आयोग ही स्वतंत्र मताची अशी संस्था आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या बाबत कोणती शंका उपस्थित होऊ नये अशी आमची अपेक्षा आहे. तशी जबाबदारी निवडणूक आयोग व प्रशासनाची सुद्धा आहे.

## नुसती माफी मागून चालणार नाही

इतिहासात समाजात सामाजिक विषमतेला धरून जे काही घडले आहे, त्याबाबत आज आपण माफी मागितली पाहिजे, हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे विधान माझ्याही वाचनात आले. समाजातील एका मोठ्या वर्गाला काही पिढ्यांना ज्या यातना सहन कराव्या लागल्या. या यातनांची जबाबदारी ज्यांच्याकडे आहे त्या घटकांना याची जाणीव व्हायला लागली. हा बदल योग्य आहे. नुसती माफी मागून चालणार नाही. आपण व्यवहारामध्ये या सर्व वर्गाच्याबाबत भूमिका कशी घेतो यावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत.

■■

# राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

**अजित पवार यांची मागणी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि राज्याचे विरोधी पक्ष नेते मा. अजित पवार यांनी १९ ऑक्टोबरला मुंबई येथे पत्रकार परिषदा घेऊन अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची आणि राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. त्याशिवाय एकनाथ शिंदे–देवेंद्र फडणवीस सरकारवर विविध मुद्यांवरून हल्लाबोल चढविला.**







मित्रांनो, आज दुपारी मी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांच्यासमोर जे प्रश्न मांडायचे ते मांडले. त्याच्यामध्ये राज्यात आपल्या सगळ्यांना माहिती आहे, की प्रचंड प्रमाणावर पावसाने धुमाकूळ घातलेला आहे आणि आज १९ ऑक्टोबर असतानासुद्धा पाऊस पडत आहे. अजूनही पाऊस पडण्याची शक्यता आहे. आणि त्यासंदर्भात राज्यात आता ओला दुष्काळ जाहीर

करा आणि शेतकऱ्यांना तातडीनं मदत करा. कारण, दिवाळी तोंडावर आली आहे आणि या दिवाळीच्या तोंडावर शेतकरी त्रासून गेलेला आहे. त्याचं खरिपाचे जे पीक उद्‌ध्वस्त झालेलं आहे, ज्या भागातलं झालं आहे, त्या भागातल्या शेतकऱ्यांना दिवाळी आनंदात जाण्याच्या दृष्टिकोनातून सरकारनं भरीव अशा प्रकारची मदत ही त्याठिकाणी करावी. राज्यातील बऱ्याच ठिकाणी पावसाने जमिनी वाहून गेल्या असून घरांचीही मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. अतिवृष्टीमुळे स्थावर मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तरी राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना अजूनही नुकसान भरपाई मिळालेली नाही तरी एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या निकषाच्या बाहेर जाऊन तातडीने मदत देण्यात यावी, अशा प्रकारची मागणी केली. मुख्यमंत्री महोदय म्हणाले, की मी त्याच्याबद्दल स्वत: जातीनं लक्ष घालीन आणि त्याबद्दलचा निर्णय आम्ही घेऊ.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तुम्हाला माहिती आहे, आलमट्टी हे धरण त्याबाबतीमध्ये कृष्णा नदीला, कोयना, दूधगंगा, पंचगंगा आणि वारणा या उपनद्या







कृष्णा नदीला मिळतात, आणि महाराष्ट्र, कर्नाटक राज्यांच्या हद्दीपासून साधारण २३५ किलोमीटर अंतरावर कर्नाटक राज्यात कृष्णा नदीवर आलमट्टी धरण आहे. नेहमी आता आहे त्या उंची असतानाच




आपल्या इथं बऱ्याचदा पाण्याचा फुगवठा सांगली आणि इतर परिसरामध्ये येतो. आता पुन्हा त्याची उंची वाढविण्याचा विचार केला जात आहे. त्याला कुठल्याही परिस्थितीत आलमट्टी धरणाची उंची वाढविण्याला विरोध करा, राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे प्रमुख या नात्यानी अशा प्रकारची पण मागणी आम्ही मुख्यमंत्र्यांच्यांकडं केलेली आहे. आजपर्यंत महापूर आणि अतिवृष्टीची स्थिती पाहता आलमट्टी धरणाची उंची वाढवणं हे अजिबात महाराष्ट्राच्या दृष्टीनं संयुक्तिक होणार नाही. तरी महाराष्ट्र शासनानं याविषयी केंद्र सरकार आणि कर्नाटक सरकारकडं पाठपुरावा करावा आणि आलमट्टी धरणाची उंची वाढवण्याला प्रखर अशा पद्धतीचा विरोध करावा.

तसेच पुणे शहराजवळची जी ३४ गावं आहेत, ती पुणे शहरामध्ये, महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेली आहेत. या गावांमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी जवळपास ९ हजार कोटी रूपयांच्या निधीची मागणी महानगरपालिकेने शासनाकडे केलेली आहे. आता एवढी सगळी गावं महानगरपालिकेत समाविष्ट होऊनही तिथं पुरेसा निधी न मिळाला नसल्यामुळं ही गावं पाणी, ड्रेनेज, कचरा, रस्ते, आरोग्य अशा मुलभुत सुविधांपासून वंचित राहिली असून यामुळे या गावांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. त्यामुळं सरकारनं त्याच्यामध्ये त्वरित हस्तक्षेप करावा. महानगरपालिकेत आता प्रशासकच आहेत. आयुक्तांना स्वत: आदेश सरकार देऊ शकतं आणि निर्णय त्याठिकाणी घेऊ शकतात. वडगावशेरी विधानसभा मतदारसंघामध्ये काही तिथले प्रश्न आहेत. त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी तेथील लोकप्रतिनिधींना भेट द्यावी अशी मी मागणी केली. पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा. आज आपण पेपरला बघितलंय, की काल राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब दिल्लीला त्यांच्या सरकारी कामांसाठी गेले होते. रेल्वे मंत्रालयाला पण भेटले. मात्र उपमुख्यमंत्री महोदयांच्या दिल्लीतील चर्चेमध्ये केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांचे वेगळे मत आहे. त्यांनी पुणे-नाशिक रेल्वे इलीवेटेड करुन त्याच्या खालून हायवे करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच हायस्पीड रेल्वे ही जमिनीवर सुरक्षित नसलेबाबत मुद्दा उपस्थित केला आहे व प्रकल्पाचा पुन्हा डीपीआर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रकल्पावर एमएआयडीसी व महाराष्ट्र शासन यांनी तीन वर्षापूवीच डीपीआर तयार करुन जमीन संपादनाचे काम बऱ्याच अंशी पूर्ण झाले आहे. राज्य सरकारने बजेटमध्ये भूसंपादनाची तरतूद केली आहे. यामध्ये पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे हा प्रकल्प पुणे जिल्ह्याला, नगर जिल्ह्याला आणि नाशिक जिल्ह्याला वरदान ठरणारा प्रकल्प आहे. त्याच्याकरता रेल्वे बोर्डाचे चेअरमन यांची पण त्याला मंजुरी मिळाली. मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता त्याला अजून मिळालेली नाही. त्याचा तात्काळ पाठपुरावा करावा. मला मुख्यमंत्री म्हणाले, की मी त्याचं प्रेझेंटेशन घेतलं आहे. मला तो प्रकल्प चांगला वाटतोय. मी रेल्वे मंत्रालयाशी बोलीन.

तसंच आशा सेविकांना किमान वेतन लागू करावं, अशाही प्रकारची मागणी आम्ही त्याठिकाणी केली. त्यामुळं सेविका अधिक जोमानं, सक्षमपणानं काम करतील. त्यामुळं त्यांना किमान वेतन लागू करावं. तसंच राज्यामध्ये तुम्ही पाहता, वेळावेळी सरकार आल्यानंतर मध्यंतरी टिकाटिप्पणी झाली, की स्थगिती सरकार देतंय. त्यावेळेस आम्ही

अधिवेशनाच्या काळात मुख्यमंत्री महोदय, उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती केलेली होती, की व्हाईट बुकमध्ये आलेली कामं थांबवणं बरोबर नाही. तर राज्यातील विकासकामांवरील स्थगिती ताबडतोब उठवावी. मधी एक जीआर निघाला. पण त्याच्यामध्ये पण शिंदे साहेबांबरोबर गेलेल्या शिवसेनेतील आमदारांच्या मतदारसंघांतील कामांची स्थगिती उठवली गेली आणि बाकीची मात्र स्थगिती तशीच ठेवली गेली. तर मी ते त्यांच्या लक्षात आणून दिलं. तर ते म्हणाले, की मी डीसीएमशी चर्चा करतो आणि याबद्दलचा निर्णय घेतो.

मी परवा अहमदनगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यामध्ये वांदरकडा, खंदरमाळ गावात तुम्हाला आठवत असेल, ८ ऑक्टोबरला एकाच कुटुंबातील दोन भावांची दोन-दोन मुलं शाळेतली, त्यांना विजेच्या तारेचा शॉक लागून ती गेली, तर त्याच्याबद्दल सरकारकडनं प्रत्येकी पाच लाख रूपयांची मदत आणि महावितरणने चार-चार लाख रूपये द्यावेत. पण मला जाणीव आहे, की अठरा लाख रूपयांनी गेलेली मुलं परत येणार नाहीत, परंतु, ते कुटुंब अतिशय गरीब आहे. आदिवासी समाजातलं आहे. मी आणि डॉ. आमटे, आमचे आमदार आम्ही दोघेही तिथं गेलो होतो. त्यावेळी मी त्यांना सांगितलं होतं, की हे मी मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून देतो. मुख्यमंत्र्यांनीही ताबडतोब त्यांच्या ऑफिसला सूचना दिल्या, की ताबडतोब चेक तयार करा आणि त्या कुटुंबाला तातडीनं आर्थिक मदत करा.

तसंच विनाअनुदानित शाळांचा प्रश्न सोडवावा म्हणून बरेच दिवस आपल्या आझाद मैदानावर शिक्षक बसलेले आहेत. तर तो एक प्रश्न जवळपास १० ऑक्टोबरपासून आझाद मैदानावर मुंबईत शिक्षकांचं आंदोलन चाललेलं आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय ते आंदोलन मागं घेणार नाहीत असा पवित्रा त्यांनी घेतलेला आहे. तर सरकारनं त्यांना बोलवून काहीतरी मार्ग काढावा. दिवाळी तोंडावर आलेली आहे. दिवाळीमध्ये शिक्षक वर्गानं अशा पद्धतीनं बसणं कुठल्याही घटकानं, हे योग्य नाही आणि म्हणून त्यांच्याहीबद्दल मुख्यमंत्र्यांना सांगितलं.

तसंच सत्ताधारी लोकप्रतिनिधींकडून शासकीय अधिकाऱ्यांना दमदाटीचे प्रकार होतायंत. मीडिया म्हणून तुम्ही पण ते दाखवतांय. तर ते ताबडतोब थांबले पाहिजेत. कारण, सरकार पक्षाचे विधायक, त्यांनीच जर अशा पद्धतीची वक्तव्ये केली, तर कायदा, संविधान, घटना यांचा विचार कुणी करायचा अशा प्रकारचा प्रश्न सर्वसामान्य माणसांच्यासमोर निर्माण होतो आणि त्याच्यामुळं त्याहीसंदर्भामध्ये तातडीनं त्यांच्या आमदारांना त्यांनी सांगावं. या पुन्हा पुन्हा घटना घडतायंत. त्याला संपूर्ण पायबंद बसावा, अशाही प्रकारची मागणी आम्ही त्याठिकाणी केली.




तसंच ३६वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा गुजरातमध्ये झाली. त्याच्यामध्ये संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्रातील पदकप्राप्त खेळाडू आणि मार्गदर्शक संघटनांना रोख बक्षिसं जी दिली जातात, त्याच्यामध्ये वाढ करावी. काल मी याच्याबद्दल क्रीडा मंत्र्यांना बोललो. क्रीडा मंत्र्यांना सांगितलं, की मी उद्या सीएम साहेबांची भेट घेतोय. सीएम म्हणाले, की दिवाळी झाल्यानंतर मी त्याच्याबद्दल वेळ देतो. सगळे जे खेळाडू होते, मार्गदर्शक होते, संघटना, प्रशिक्षक त्यांना बोलवतो आणि त्या सर्वांचा यथोचित सत्कार करू. राज्याच्या दृष्टिनं ही अभिमानाची बाब आहे. सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राच्या कर्तबगार खेळाडूंनी जो प्रथम क्रमांक मिळवून राज्याचा नावलौकिक वाढवलेला आहे, त्याच्याबद्दल त्यांना शाबासकीची थाप मिळावी आणि पुढच्याही वेगवेगळ्या येणाऱ्या स्पर्धांमध्ये अधिक जोमानी आपल्या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी त्याच्यामध्ये खेळ दाखवावा आणि पदकं मिळवावीत अशी त्या पाठीमागची पार्श्वभूमी होती. या सगळ्या विषयांच्या संदर्भामध्ये मी आज मुख्यमंत्री महोदयांना भेटलो आणि बहुतेक प्रश्नांमध्ये त्यांनी सकारात्मक भूमिका दाखवली.

■■

# मूळ प्रश्नांवरुन लक्ष विचलित करण्याचे काम सुरु आहे

**अजित पवार**






८ सप्टेंबर २०२१ ला केंद्र सरकारने टाटा-एअरबस कंपनीसोबत करार केला होता. मग आता असं काय झालं की प्रोजेक्ट गुजरातला नेला जातोय. दरवेळी प्रकल्प गेला की हे सांगतात जाऊद्या. आपण आणखी मोठा आणू. आता तर म्हणतात हा प्रकल्प आलाच नव्हता. हे काय चाललंय? मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी समोर येऊन बोलावं. सरकारची भूमिका मांडावी. ओळीने चार प्रकल्प गुजरातला गेले. या सरकारने ते थांबवण्यासाठी काहीच केलं नाही. या नाकर्तेपणाला कोण जबाबदार आहे? आधीचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या टक्केवारीमुळे टाटा-एअरबसचा प्रोजेक्ट महाराष्ट्रातून बाहेर गेल्याचा आरोप केला जातोय. माझं तर असं म्हणणं आहे, की याची चौकशी करा, दूध का दूध होऊ द्या. उगाच आपलं उठायचं काहीही आरोप करायचे.

वेदांताचा प्रकल्प गुजरातमध्ये गेला. त्यावेळी त्यापेक्षा मोठा प्रकल्प राज्यात आणला जाणार असं सांगितले होते. मात्र आता एअर बस प्रकल्प गुजरातला गेला. अशावेळी आधीच्या सरकारने काय केलं आणि या सरकारने काय केले. हे आरोप प्रत्यारोप करण्यापेक्षा राज्यातील तरुणांना रोजगार कसा मिळेल याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. प्रकल्प कुणाच्या नाकर्तेपणामुळे जाताहेत का? एका राज्यात येऊ घातलेले प्रकल्प दुसऱ्या राज्यात जातात यात काही राजकारण आहे का? सर्वसामान्य नागरिकांचे मूळ प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी काही तरी काढले जात आहे.

सरकारने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा. शेतकरी चिंतेत आहे. अतिवृष्टीग्रस्त शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. ते यंदाची दिवाळीही साजरी करू शकले नाहीत. फडणवीसांनी विरोधी पक्षनेते असताना ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी पत्र लिहिलं होतं. मग आता माझंही विरोधी पक्षनेता म्हणून तेच आवाहन आहे.

महागाई, बेरोजगारीचा प्रश्न आहे आणि या सरकारचे

आमदार खोक्याचा उल्लेख करत फिरत आहेत. सत्ताधारी पक्षाचे आमदार एकमेकांवर काय आरोप करत आहेत. खोक्यांचा विषय बोलत आहेत. मंत्री कोण काय बोलतो. यांना काही तारतम्य राहिलेलं नाही. बीडमध्ये एक मंत्रीच कलेक्टरला म्हणतो, तुम्ही दारू पिता का? काय चाललंय काय ? मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी त्यांच्या मंत्र्यांना काय बोलावे आणि काय बोलू नये याबद्दल सूचना द्याव्यात.

दिवाळीत १ किलो डाळ,१ किलो रवा, १ किलो साखर, १ किलो तेल देणार होते. कुठे काहीही मिळाले नाही. दिवाळी संपली तरी अनेकांना शिधा पोहोचला नाही.

चंद्रकांत पाटील एका कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले असता त्यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेसचं 'राष्ट्रवादी पुन्हा' हे गाणं वाजलं. पण यात चुकीचं काय झालं? मूळ मुद्द्यावरून लक्ष विचलित करण्यासाठी असे वाद उकरून काढले जातात. तुम्ही म्हणतांय, की त्यावेळी लाव रे ते गाणं अशी चर्चा झाली. जाऊ द्या आता.. जे म्हणायचे लाव रे तो व्हिडीओ त्यांचे काही महिन्यापूर्वी किंवा वर्षापूर्वीचे विचार काय होते आणि आता काय आहेत ते बघा. आता काय, कुणाबद्दल न बोललेलंच बरं.

चलनी नोटांवर कुणाचा फोटो असावा यावरून देशात बरीच चर्चा सुरू आहे. पण तुम्हाला तरी पटतं का हे? देशाच्या




**महाराष्ट्रातून वेगवेगळे उद्योगधंदे गुजरातला पळवून नेण्याचा जो धंदा केंद्र सरकारने चालविला आहे आणि शिंदे-फडणवीस सरकारची त्याला जी मूक संमती आहे, तिचा पर्दाफाश विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी या पत्रकार परिषदेतून केला आहे.**

पण हे नुसतेच त्या पिशवीवर फोटो छापून प्रसिद्धी लाटू पाहत आहेत. तुळशीच्या लग्नापर्यंत दिवाळी असते, असं एक मंत्री म्हणाले होते. या लोकांनी काय जनतेची थट्टा लावली आहे. मी आजपर्यंत इतकं असंवेदनशील सरकार पाहिलं नाही. ३१ ऑक्टोबरला देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळच्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पावसामुळे राज्यात झालेल्या नुकसानीबद्दल मदत देण्याचे आवाहन एका पत्राद्वारे केले होते. आता त्या पत्रावरील फक्त मुख्यमंत्री यांचे नाव बदला, असं माझं फडणवीस यांना आवाहन आहे. आता त्यांचेच सरकार आहे. आता त्यांनी शेतकऱ्यांना मदत करावी.

अमृतमहोत्सवी वर्षात आपण आहोत. महात्मा गांधींचा हसरा फोटो प्रत्येक नोटेवर आहे. आता मध्येच काहीतरी नवीनच कल्पना काढतात. त्यानं महागाई, बेरोजगारी कमी होणार आहे का? त्यानं जनतेचे सगळे प्रश्न सुटणार आहेत का? जे महत्त्वाचं आहे ते बघा ना. ७५ वर्षांमध्ये हा प्रश्न कधी आला नाही. देशातला हा प्रश्न खरंच महत्त्वाचा आहे का? हे प्रत्येकानं स्वत:च्या मनाला विचारावं. काय नवनवीन गोष्टी काढत असतात. लोकांना मदत होणाऱ्या प्रश्नांवर बोललंच जात नाही. महात्मा गांधींचा फोटो आहे. चांगलं चाललंय. ■■



# छगन भुजबळ हे शून्यातून आदर्श

**राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त मुंबईतील षण्मुखानंद आला  होता. या कार्यक्रमात देशातील दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर**



# व्यक्तिमत्व घडविल्याचे उदाहरण

**शरद पवार**

सभागृहात १३ ऑक्टोबर रोजी अमृतमहोत्सवी सोहळा आयोजित करण्यात उपस्थित राहिले होते. या सोहळ्यातील मान्यवरांची भाषणे...



आजचा हा सोहळा अतिशय आनंदाचा सोहळा आहे. आज आपण ज्या सभागृहामध्ये जमलो आहोत, कदाचित तुमच्यापैकी काही सहकाऱ्यांना आठवत असेल, की याच सभागृहामध्ये छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्त्यांचा एक मेळावा झाला, आणि त्या मेळाव्यामध्ये इथं एक निर्णय घेतला, आणि तो निर्णय म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ही याच सभागृहात झाली आणि भुजबळांच्या अध्यक्षतेखाली झाली हे आजही मला आठवतं. अशी प्रचंड सभा याठिकाणी झाली आणि संध्याकाळी शिवाजी पार्कवर सभा होती. तिथेही अध्यक्ष छगन भुजबळ होते. एक लाखाच्यापेक्षा जास्त उपस्थिती त्याठिकाणी कार्यकर्त्यांची होती. त्यावेळी महाराष्ट्राच्या राजकारणाला एक नवी दिशा द्यायचा निर्धार सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी केला आणि त्याला प्रोत्साहित करण्याचं काम, त्या मेळाव्याचं नेतृत्व घेण्याची जबाबदारी ही छगन भुजबळांनी आपल्या खांद्यावर घेतली होती, याचं स्मरण मला आज याठिकाणी होतंय.

गेली अनेक वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये विकासाच्या राजकारणाला प्रोत्साहन देणारा नेता म्हणून आपण सहकारी त्यांना ओळखतो. खरं म्हटलं, तर शून्यातून व्यक्तिमत्व कसं उभं राहतं, याचा आदर्श उदाहरण भुजबळ साहेब आहेत. नाशिकसारख्या जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. नातेवाईक सगळे पुणे जिल्ह्यातल्या जुन्नर आणि त्या भागातले. व्यवसाय भाजीविक्रीचा. दुर्दैवानं भुजबळांना जन्माच्यानंतर आई-वडिलांचं सौख्य लाभलं नाही. मावशीचं वात्सल्य आणि पूर्ण प्रेम त्यांना लाभलं आणि तिच्या आशिर्वादानं ते मोठे झाले. ते मोठे झाले. पण त्यासाठी खस्ता खायला लागल्या. भायखळ्याला भाजीचं दुकान चालवायला लागलं. त्यावेळी भाजीपाला विक्रीच्यासाठी जे दुकान होतं, ते कुणाकडून तरी तात्पुरतं घेतलं होतं. आणि नंतर काही दिवसांसाठी ज्यांच्याकडून घेतलं होतं, त्यांनी दुकान काढून घ्यायचा निर्णय घेतला. आणि ते जर दुकान काढून घेतलं असतं, तर दोनवेळच्या भोजनाचा प्रश्न हा कुटुंबियांच्यासमोरही आला असता. आणि त्यांचं भाग्य, दोन लोक, ज्यांच्याशी माझाही कधी संपर्क आला, त्यांचे आशीर्वाद मिळाले. एकाचं नाव मुकुंद ठकोजी पाटील. मुकुंद ठकोजी पाटील हे मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष होते. आणि दुसरे, जे माझ्याबरोबर महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये होते, त्यांचं नाव बी.डी. झुटे. झुटे हे एकेकाळी मुंबई महानगरपालिकेमध्ये काँग्रेस पक्षाचे नेते होते. नगरसेवक होते. आमदार होते. आणि ज्यावेळी हे संकट आलं भुजबळ कुटुंबाच्यावर त्यावेळी बी.डी. झुटे आणि मुकुंद ठकोजी पाटील यांनी मध्यस्थी केली आणि त्यांचं दुकान शाबूत ठेवलं. आणि त्यामुळं त्यांचा प्रपंच चालू शकला.

त्यांचं शिक्षण झालं. त्यांचा ओढा पहिल्यापासून सार्वजनिक जीवनाचा, राजकारणाचा होता. आपल्या सगळ्यांना ठाऊक आहे, की शिवसेनेचं नेतृत्व त्यांनी केलं. पहिला विधानसभेचा आमदार म्हणून ते निर्वाचित झाले. नंतरच्या काळामध्ये तत्पूर्वी मुंबई महानगरपालिकेमध्ये महापौर बनून या सदनाचं नेतृत्व त्यांनी केलं. ज्याला काही पार्श्वभूमी नाही अशी एखादी व्यक्ती महापौर बनते, मुंबई शहरात स्वत:ला प्रस्थापित करतं, विधानसभेमध्ये जाते, विरोधी पक्षाचा नेता होतात, राज्याच्या मंत्रिमंडळात जातात, आणि संबंध महाराष्ट्राला एक दिशा देण्यासंबंधीचं काम करतात, असं आगळंवेगळं उदाहरण भुजबळांच्याशिवाय दुसरं क्वचितच बघायला मिळतं. त्यांना कलेचा आणि उत्तम प्रकारच्या गोष्टींची दोस्ती होती. ज्याचा उल्लेख अजित पवारांनी केला, की दिल्लीमध्ये आम्ही लोक राहतो, दिल्लीमध्ये सगळ्या राज्य




सरकारांची त्याठिकाणी निवासस्थानं आहेत. आणि सगळ्यात उत्तम निवासस्थान कुणाचं असेल, तर ते महाराष्ट्राचं आहे. आणि लोक म्हणतात, की हे कुणी केलं, ते छगन भुजबळांनी केलं आणि राज्य सरकारची गुंतवणूक न करता ती अतिशय उत्तम वास्तू, दिल्लीच्या सौंदर्यामध्ये भर टाकेल अशी वास्तू त्याठिकाणी त्यांनी बांधली.

अशा अनेक गोष्टी त्यांनी केल्यात. मुंबईमध्ये केल्यात. नाशिकमध्ये केल्यात. नाशिकचा चेहरा हा बदलण्याच्यासाठी त्यांचं योगदान हे प्रचंड आहे याची नोंद ही कायमची राहणार आहे. अशा अनेक गोष्टी त्यांनी चांगल्या केल्या. एखादं काम हातामध्ये घेतलं, तर ते उत्तमच करायचं, नेटकंच करायचं आणि त्याचं स्मरण लोकांना कायम येईल याची खबरदारी घ्यायची हे सूत्र घेऊन त्यांनी गेली अनेक वर्षे महाराष्ट्राची सेवा केली. म्हणूनच आपण एवढ्या मोठ्या संख्येनं आज याठिकाणी आलेलो आहोत. आज आपण त्यांचा सत्कार केला. प्रफुलभाई, या सत्कारामागं तुमची भूमिका जास्त होती असं कळलं मला. पण एक गोष्ट तुमच्याकडून चुकली आणि ती गोष्ट चुकली अशी, की तुम्ही सत्कार केला, पण त्यांच्या डोक्यावर फुले पगडी घातली असती तर ते अधिक चांगलं झालं असतं. बाकीच्या गोष्टी सोडून द्या, पण मला स्वत:ला आनंद आहे, की इथं आमच्या एका ज्येष्ठ सहकाऱ्याचा ७५वा वाढदिवस, त्यांचा साठावा वाढदिवस साजरा केला, आज ७५वा याठिकाणी करतो आहोत आणि ते जे काय काम करतात, त्या कामाच्या पाठीशी आपण सगळे अखंड आहोत हा विश्वास आणि दिलासा या कार्यक्रमाच्या निमित्तानं आपण त्यांना देत आहोत.

जम्मू आणि काश्मीरचे ज्येष्ठ नेते फारूख अब्दुल्ला आज अत्यंत अगत्यानं याठिकाणी आहेत. लोकांना माहिती नाही. या देशामध्ये काश्मीर जे राहिलं त्या काश्मिरच्या राहण्यामध्ये फारूख अब्दुल्लांच्या वडिलांचं योगदान प्रचंड आहे आणि नंतरच्या काळामध्ये सुद्धा फारूख अब्दुल्ला राज्याचे मुख्यमंत्री झाले, विरोधी पक्षाचे नेते झाले, केंद्राच्या पार्लमेंटमध्ये आले, केंद्राच्या मंत्रिमंडळामध्ये आले. पण त्यांची संपूर्ण निष्ठा ही भारतावर आहे. भारताच्या ऐक्यावर आहे आणि त्यासाठी पडेल ती किंमत द्यायची तयारी ही त्यांची असते आणि असा एक राष्ट्रप्रेमी नेता छगन भुजबळांना शुभेच्छा द्यायला अगत्यानं याठिकाणी उपस्थित राहिला याचा मला मनापासूनचा आनंद आहे.

मी काय अधिक बोलून आपल्या सगळ्यांचा वेळ घेऊ इच्छित नाही. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये एक दिशा देणारं जे कुणी उत्तम राज्यकर्ते होते, उत्तम नेते होते, त्याच्यामध्ये त्यांचा उल्लेख त्याठिकाणी करावा लागेल. आणि मला एका गोष्टीचा आणखीन आनंद आहे, की मी माझ्या शैक्षणिक कालखंडामध्ये ज्या विद्यापीठात मी शिकलो, ते पुणे विद्यापीठ, त्या पुणे विद्यापीठाचं नाव सावित्रीबाई फुले विद्यापीठ हे करण्याच्यामध्ये कुणी महत्त्वाची कामगिरी केली असेल, तर ती छगन भुजबळांनी केली हे अनेकांना माहिती नाही. त्यामुळं सावित्रीबाईंचा विचार, महात्मा जोतिबा फुलेंचा विचार हाच महाराष्ट्राच्या आणि देशाच्या ऐक्यासाठी, सुधारणेसाठी, आधुनिकतेसाठी उपयोगी पडेल, हे व्रत समजून त्यांनी अखंडपणानं काम करण्याची भूमिका घेतली अशा आपल्या सहकाऱ्याला तुम्हा सगळ्यांच्यावतीनं मी अंत:करणापासून शुभेच्छा देतो. उत्तम आरोग्य राहील, कुटुंब उत्तमरितीनं समाजाची सेवा करेल आणि महाराष्ट्राचं प्रेम आणि महाराष्ट्राचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी कायम राहतील, एवढंच याठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■



नेहमी अशा कार्यक्रमांमध्ये काय बोलावं हा एक प्रश्न असतो, आणि विशेषत: भुजबळ साहेबांच्या या ७५व्या वाढदिवशी, योगायोग असा आहे, की देशाच्या स्वातंत्र्यालासुद्धा ७५ वर्षे होतायंत. भुजबळ साहेबांचं कौतुक मी करण्याची आवश्यकता नाही. कारण, ती करण्याची आवश्यकता असती, तर तुम्ही एवढे जमलेच नसता. पण साहजिकच आहे, की तीन वर्षापूर्वीच्या ऑक्टोबरमध्ये पवार साहेब कुणी सांगितलं असतं, की तीन वर्षांनंतर भुजबळ साहेबांच्या पंचाहत्तरीला मला बोलवलं जाणार आहे आणि आपण सगळे एका व्यासपीठावर येणार आहोत तर कोणाचा विश्वास नसता बसला. पण असं म्हणतात, कुणी माना अथवा नका मानू, नियतीच्या मनात काय असतं कल्पना नाही, कदाचित तिच्या मनामध्ये हेच असेल, की आता नेमक्या मर्द लोकांच्या हातामध्ये मशाल देण्याची आवश्यकता आहे. आणि दादा, तुम्ही जे बोललात, की चार महिने तुम्हाला अधिक मिळाले असते, तर भुजबळ साहेब मुख्यमंत्री झाले असते. मी थोडं करेक्शन करतो. जर भुजबळ साहेबांनी शिवसेना सोडली नसती तर त्याच्या आधीच मुख्यमंत्री झाले असते. आणि सरकार वाचवण्यामध्ये ते किती वाक्‌बगार आहेत, हे मला आत्ता तुम्ही सांगतांय, तेव्हा सांगायला पाहिजे होतं. मी पण लाऊन दिलं असतं कामाला.

उद्धव ठाकरे हे पुष्पगुच्छ देऊन छगन भुजबळ यांचा सत्कार करताना, शेजारी उपेंद्र कुशवाह, प्रफुल पटेल, बाळासाहेब थोरात, विशाखा भुजबळ, मीनाताई भुजबळ, शरद पवार,




# छगन भुजबळ शिवसेनेत असते

पण, एक गोष्ट नक्की, की आता आम्ही धक्काप्रूफ झालेलो आहोत. म्हणजे असं म्हणतात, की जपानला जर एखाद्या दिवशी भूकंप नाही झाला तर लोकं जरा परेशान होतात, की अरे आज भूकंप नाही झाला. पण, पहिला आणि मोठा धक्का जो आम्हाला आणि कुटुंबीयांना बसला, मानसिक तो भुजबळ साहेब आपण शिवसेना सोडली त्यावेळेला. म्हणजे माँना बसला धक्का, बाळासाहेबांना, आम्ही तर आतापासून किती वर्षे वजा कराल त्या वयाचे होतो, म्हणजे आपला एक कुटुंबातला माणूस आपल्याला सोडून जाऊ कसा शकतो हाच एक मोठा धक्का होता. राग वगैरे हा नंतरचा भाग. तो राजकारणाचा भाग झाला. पण, आपला माणूस हा जाऊ शकतो हा एक मोठा धक्का होता आणि त्यातून सावरताना मानसिकदृष्ट्या नाही म्हटलं तरी आम्हाला खूप वेळ लागला.

एक गोष्ट आणखीन चांगली केली, की तुम्ही बाळासाहेब असतानाच हे सगळं मिटवून टाकलं. घरी आलात. बाळासाहेबांनी तुमचं स्वागत केलं. मग ते जे आपलं काही, वैरभाव हा शब्द जरा टोकाचा झाला, पण मतभेद होते ते मिटवून टाकले. हे फार चांगलं झालं. फक्त त्यावेळेला एकच कमी राहिली, जर माँ असती तर आणखीन बरं झालं असतं. ठीक आहे, या गोष्टी काही आपण ठरवून होत नसतात. ७५ वर्षे पूर्ण करून पुढे जात असताना जेव्हा आपण मागे बघतो, प्रत्येकाचंच वय हे वाढत असतं. म्हणजे बाळासाहेब सांगायचे, माझे आजोबा सांगायचे, की वयाने माणूस मोठा होत असतो, पण तो ज्याक्षणी विचाराने थकतो, त्यावेळी तो वृद्ध होतो. आणि म्हणून तुम्ही काय, फारूख साहेब काय, आजही तुम्ही तुमचं वय मानायला तयार नाहीयेत. पण ही अशी तरूण मनांची आणि नुसतीच तरूण मनं असून चालत नाही, कारण तरूण मनामध्ये एक इर्ष्या असावी लागते, जिद्द असावी लागते.

मघाशी पुस्तक प्रकाशन करताना सांगण्यात आलं, की दोन नायक, एका बाजूला शिवसेनाप्रमुख आणि दुसऱ्या बाजूला पवार साहेब, आणि हेच तर मोठं काम असतं आणि मोठं भाग्यही आहे, की आयुष्यामध्ये दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्वं मार्गदर्शक म्हणून त्यांना लाभले. असं भाग्य फार क्वचित लोकांच्या आयुष्यात येतं. पण या दोन्ही नायकांचा त्यांनी दुरूपयोग कधी केला नाही आणि त्यांच्याकडनं जे पाहिजे ते घेऊन स्वत:ची वाटचाल त्यांनी स्वत: ठरवली म्हणून आणि म्हणूनच आज ७५व्या वर्षी

फारूख अब्दुल्ला, जावेद अख्तर, अजित पवार, जयंत पाटील, नरहरी झिरवळ आणि पंकज भुजबळ, दिलीप वळसे पाटील, राजेश टोपे व रुपाली चाकणकर



# तर मुख्यमंत्री झाले असते

**उद्धव ठाकरे**

सुद्धा भुजबळ साहेब तुम्ही तरूण आहात.

एक नवीन समीकरण आपण अडीच-तीन वर्षापूर्वी महाराष्ट्रामध्ये नव्हे, देशामध्ये जन्माला घातलं. महाविकास आघाडी. काँग्रेसच्यावतीनं थोरात साहेब आलेले आहेत, राष्ट्रवादीचे तर स्वत: पवार साहेब आहेत, आणि हे समीकरण आपण यशस्वीपणे चालवून दाखवलं होतं. अडीच वर्षे यशस्वीपणानं आणि ते बघितल्यानंतर पोटामध्ये गुब्बारे येणं साहजिक आहे. तो आल्यानंतर ज्या पद्धतीनं आता सरकार पाडून प्रत्येक गोष्टीला, ज्याचा उल्लेख अजितदादांनी केला, किती खालच्या पातळीवर जायचं, म्हणजे जो उल्लेख थोरात साहेब तुम्ही केला, की जे विधानभवन होते त्याची उंचीच वेगळी होती. नुसते मजले नाहीत, वैचारिक एफएसआय जास्त बोलायचं, कशाचा धरबंद असतो, नसतो. पुन्हा काय बोललं तर प्रस्ताव जायचा आमच्या झिरवळ साहेबांकडे. त्याच्यामुळं मी त्याच्यावरती काय बोलत नाही. पण सतत आणि सतत राजकारणाचा विचार करण्यापेक्षा विचाराने राजकारण करणं किती गरजेचं आहे हेच कुणी विचार करत नाही. मला पाहिजे. सगळं पाहिजे. आणि प्रतिस्पर्धी कुणी शिल्लकच राहता कामा नये. भुजबळ साहेब एक अत्यंत चांगलं उदाहरण आहे, की त्यांचा राजकीय जन्म शिवसेनेत झाला आणि मागेच तुम्ही सांगितलं, की सुदैवानं पहिली निवडणूक तुम्ही हरलात. कारण तेव्हा त्यांचं वयच नव्हतं उमेदवारी अर्ज भरण्याचं. तरीसुद्धा उमेदवारी दिली गेली. ते लढले. जिकला असतात तर काय हा प्रश्न पडला असता, पण सुदैवानं ते पडले. पण आयुष्यातली



छगन भुजबळ यांचा शाल घालून उद्धव ठाकरे सत्कार करताना, शेजारी सौ. मीनाताई भुजबळ, शरद पवार, दिलीप वळसे पाटील

पहिली निवडणूक हरूनसुद्धा माणूस जिद्दीनं उभा राहिला आणि जे काय करायचं आहे ते त्यानं करून दाखवलं आहे.

बेळगावमध्ये तुम्ही जे गेला होता, तिथे तुमचा फोटो जर कुणी पाहिला तर माझ्यावरती आणखी आरोप होईल, की बघितलं हिंदुत्त्व यांनी कसं सोडलं आहे ते. हे अशा लोकांबरोबर मांडीला मांडी लाऊन बसल्यानंतर यांच्या ७५व्या वाढदिवसाला कौतुक करायला गेले. हिंदुत्त्वच सोडलं. हे असं नसतं कधी. सध्या प्रत्येक गोष्टीसाठी आपल्याला कोर्टात जावं लागतंय. मैदान मिळालं पाहिजे, कोर्टामध्ये जा. अरे, हिंमत होता. आणि मी स्वत: एक-दोनदा केशवराव धोंडगेंचं भाषण तिकडे येऊन गॅलरीत ऐकलेलं आहे. जसं छगनराव शिवसेनेचे एकमेव आमदार होते, त्यांच्याआधी वामनराव महाडिक एकमेव आमदार होते. तेसुद्धा पोटनिवडणुकीत. आणि त्यावेळेच्या मुख्यमंत्र्यांनी वसंतराव नाईकांनी शिवसेनाप्रमुखांना फोन करून सांगितलं होतं, की बाळासाहेब तुम्ही काय माणूस पाठवलांय, एक पाठवलांय, पण तो बोलायला उभा राहिला तर सगळं सभागृह स्तब्ध होऊन त्यांचं भाषण ऐकत असतं.

हल्ली बघितलेलं आहे मी, कोण काय बोलतंय, काय

असेल तर मैदानात या ना तुम्ही. माझी तर तयारी आहे. मी मैदानात उतरलेलो आहे. आम्हाला मैदान कसं मिळणार नाही याच्यापेक्षा दोघांनी मिळून एकत्र या, एका व्यासपीठावर येऊ, एका मैदानात येऊ आणि मग होऊन जाऊ दे काय व्हायचं ते.

मी आल्या आल्या फारूख साहेब भेटले. तशीही माझी काही गाठभेट होत नाही. एकतर वयाचं अंतर आहे आणि महाराष्ट्र ते काश्मीर अंतरही खूप मोठं आहे. पण, बाळासाहेब आणि त्यांची एक चांगली मैत्री होती. आल्या आल्या मला म्हणाले, की अजिबात घाबरू नकोस, लढ, वडिलांसारखं लढ. ही लढाई काय आम्ही सोडणार नाही. आणि कपिलजी तुम्ही भुजबळांचा वादळ म्हणून उल्लेख केला, अशी अनेक वादळं शिवसेनेनं अंगावर घेतलीत, पण त्यावेळेला ही अशी अनेक वादळे सोबतसुद्धा होती आणि आत्तासुद्धा या वादळामध्ये हे एक वादळ आणि आत्ता हे राष्ट्रवादी, काँग्रेससारखी मोठीमोठी वादळं, पवार साहेब आहेत, वादळ निर्माण करणारं, हे सोबत असल्यानंतर आणि वादळ असो, पाऊस असो, न डगमगता उभे राहणारे, त्याच्यामुळं एवढी सगळी आणि तुम्ही सोबत असल्यानंतर मी तर लढाईच्या क्षणाचीच वाट बघतोय.

असो, मी जास्त काय बोलत नाही. नाहीतर भुजबळ साहेब म्हणतील, कौतुक माझं आहे की तुझं आहे. सांगायला गेलं तर जुन्या आठवणी खूप आहेत. पण त्याच्यामध्ये मी आत्ता काय रमत नाही. मी भुजबळ साहेबांना खूप खूप मनापासून शुभेच्छा देतो. तुमची पहिलीच पंचाहत्तरी आहे. पुढच्या पंचाहत्तरीला पण सोबतच राहा, बोलवा. तुम्हाला पण एक सांगतो. नुसतं नेत्याचा जयजयकार करून चालणार नाही. भुजबळ साहेब आगे बढो, पवार साहेब आगे बढो, नुसतं म्हणतोय, सोबत येणार आहे का. नाहीतर घोषणा दिल्यानंतर आम्ही आगे बढणार आणि पाठी वळल्यानंतर कोणीच नाही. तर तसं नाही चालणार. ही लढाई केवळ माझी एकट्याची, शिवसेनेची नाही. आपली सगळ्यांची आहे. विशेष म्हणजे आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षी देशाच्या स्वातंत्र्याची पुन्हा दुसरी लढाई आहे. त्याच्यासाठी ही जी एक निशाणी म्हणून नाही, तर विचारांची धगधगती मशाल आहे. ती घेण्यासाठी मला खरोखरच मनापासून आनंद आहे, की शिवसेनाप्रमुखांचा जुना साथी, सोबती परत राष्ट्रवादीच्या माध्यमातून का होईना, म्हणजे जाताना एकटे गेले आणि येताना संपूर्ण राष्ट्रवादी सोबत घेऊन आले आणि नुसती राष्ट्रवादी नाही, तर सोबत काँग्रेससुद्धा घेऊन आले. तर अशा या आमच्या छगनरावांना खूप खूप उदंड, निरोगी, दीर्घ आयुष्य लाभो अशी मी ईश्वरचरणी, शिवचरणी प्रार्थना करतो. धन्यवाद! जय हिंद!! जय महाराष्ट्र!!!

■■



**उद्धव ठाकरे हे 'फटकारे' हे पुस्तक छगन भुजबळ यांना भेट देताना, शेजारी प्रफुल पटेल, समीर भुजबळ, मीना भुजबळ, राजेश टोपे व शरद पवार**



# धर्मात न अडकता भारताला एकत्रित येऊन घडवूया

**फारूख अब्दुल्ला**

महाराष्ट्रातल्या भावा-बहिणींना मी सांगू इच्छितो, की आम्ही सर्वजण तुमच्याबरोबर आहोत. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भारताला मजबूत करायचे आहे. याच्याशिवाय दुसरा मार्ग नाही. एक गोष्ट मी तुम्हाला जरूर सांगू इच्छितो, की आपल्यामध्ये एकसारखे काय आहे? तुम्ही पाहा, तुमची परंपरा वेगळी, खानपान वेगळे, हवामान वेगळे, भाषा वेगळी, प्रत्येक गोष्ट वेगळी, आमचीही भाषा वेगळी, याठिकाणी उष्णता, त्याठिकाणी बर्फ पडत आहे. तमिळनाडू, बिहार, बंगालचे वेगळे. अशी कोणती गोष्ट आहे, जी आपल्याला एकत्र बांधून ठेवते. ती गोष्ट म्हणजे आपण एकत्र राहूनच भारत बनवू शकतो, याच्याशिवाय बनूच शकत नाही. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आपापसातली मैत्री. धर्म वेगवेगळ्या



गोष्टी शिकवत नाही. मजहब नहीं सिखाता आपसमें बैर रखना, हिंदी हैं हम वतन हैं, हिंदोस्ताँ हमाना॥

मी एक डॉक्टर या नात्याने तुम्हाला विचारतो, की ज्यावेळी तुमचा रूग्ण हॉस्पिटलमध्ये असतो आणि त्याला रक्त हवे असते. त्या रक्ताच्या बाटलीला तो रूग्ण किंवा त्याचा नातेवाईक विचारतो का, की हे रक्त दलिताचे आहे, शिखांचे आहे, बौद्धाचे आहे, मुसलमानाचे आहे. काय विचारतो? तो डॉक्टरला विचारतो, की डॉक्टर साहेब, दुसरी बाटलीही लावा, जेणेकरून माझा रूग्ण याठिकाणाहून घरी जाऊ शकेल. एखादे औषध हिंदू खातो पोटात दुखतंय म्हणून, मग एखादा शिख व्यक्ती ते औषध खात नाही? मुसलमान किंवा अन्य दुसरा कोणी खात नाही? प्रत्येकासाठी देवाने आपल्याला एकसारखे बनवले आहे,

धर्म वेगवेगळा का असेना, पण आपल्याला जोडतो धर्म.

मी तुम्हाला विचारतो, की आज जे भगवान रामाविषयी ओरड करतात, पण भगवान राम फक्त हिंदूंचे आहेत? ते तर विश्वाचे भगवान आहेत. ते तर अमेरिकन, इंग्रज, रशियन आणि त्यांचाही भगवान आहे, जो त्यांना मानत नाही. पण आपल्याला आज वेगवेगळे केले जात आहे. हा मुसलमान आहे, हा हिंदू आहे, हा शिख आहे. असे म्हणत नाहीत, की आपण सर्वजण भारतीय आहोत. आम्ही या देशाचे आहोत. आपल्याला या देशात राहायचे आहे. तुम्ही मंदिरात जाता, वरच्याचे स्मरण करता ना. त्याच्याशिवाय तर काहीच नाही. आम्ही मशिदीमध्ये जाऊन जर नमाज पढत असू, तर कोणासमोर पढतो. तोच जो तुमचाही मालिक आहे, तो माझाही मालिक आहे. काहीच फरक नाही. पण ज्या पद्धतीने आज आमच्यात घृणा निर्माण केली जात आहे, वेगवेगळे केले जात आहे, हे देशाला मजबूत करणार नाही, हे देशाला कमजोर करेल.

तुम्हाला सांगतो, अशा धर्मांध शक्तींशी लढायचे आहे, ज्या देशाला कमकुवत बनवत आहेत. आणि या शक्ती बाहेर नाहीत. आत आहेत. आपल्यामध्ये आहेत. त्याला हटवायचे आहे. त्यावेळीच तुम्ही या भारताला घडवू शकाल, त्यावेळी हा भारत मजबूत होईल. आज अवस्था पाहा भारताची काय आहे. महागाई पाहा कुठं पोहोचली आहे. आज गरीब चिरडला जात आहे. घरात मुलं शिकली सवरलेली आहेत. पण कुठे नोकरी नाही. गॅसचे दर, पेट्रोलचे दर, विजेचे दर पाहा, प्रत्येक गोष्ट आज एवढी महाग झाली आहे, की पुढे काय होईल हे आज आपल्याला दिसत नाही. पण एक गोष्ट तुम्हाला सांगेन, की देवाला कधी सोडू नका. भगवान आणि अल्लाहच आहे, जो आपल्याला या अडचणीतून बाहेर काढेल. हे लक्षात ठेवा. हिम्मत सोडू नका. आठवतंय, सर्वाधिक शिकलेला रावण, त्याच्यामध्ये एवढी ताकद आणि ज्ञान होते, की सृष्टीमध्ये कोणाकडे नव्हती. पण ज्यावेळी तो स्वत:ला केवळ मीच आहे, दुसरा कोणी नाही असे समजू लागला, तेव्हा वरच्याने सीतामाईंचे अपहरण करून घेतले आणि रामाला तयार केले, की तूच त्याला मारशील. पण जेव्हा भगवान रामला विचारले, की तू मारले? सांगितले, की मी नाही मारले. वरच्याने मारले. कारण हा अहंकारी बनला होता. हा समजत होता, की बस्स् मीच आहे आणि माझ्याशिवाय काहीच नाही.

अशाच पद्धतीच्या आपल्या धर्मातही आले आहेत. स्वत:ला आपणच सर्वेसर्वा आहोत असं समजत आहेत. जे काही आहे ते तुम्ही आहात, बाकी काहीच नाही. तो वरचा आणि तुम्ही आहात. या देशाला घडवायचे असेल तर तुम्हाला घडवायचे आहे. आपण सर्वांनी घडवायचे आहे जे इथे बसले आहेत. एकत्रित येऊन घडवायचे आहे. एकटा देश घडू शकत नाही. हे सांगायला मी तुमच्याकडे आलो आहे. आज भुजबळांना ७५व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो, खूप जुनी ओळख आहे आमची. मला आनंद आहे, की त्यांनी मला बोलावलं. शरद पवारांनी बोलावलं, की तुमच्याशी बोलू शकेन. मी मुसलमान आहे. पण भारतीय मुसलमान आहे. चीनी मुसलमान नाही. हे लक्षात ठेवा. जीना यहाँ, मरना यहाँ, इसके सिवा जाना कहाँ. आशा करतो, की तुम्ही एकमेकांबद्दल बंधूभाव ठेवाल, प्रेम वाटाल. तेच भारताला वाचवेल. तेच आपल्याला मजबूत करेल. जयहिंद! बहुत बहुत शुक्रिया! ■■




फारूख अब्दुल्ला व उपेंद्र कुशवाह हे छत्रपती शिवाजी महाराज व म. फुले यांच्या पुतळ्याला नमस्कार करून आदरांजली वाहताना,



# ओबीसींच्या हक्कांसाठी भुजबळांनी

मित्रांनो, योग कसा आहे बघा, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंच्या दरवर्षीच्या दसरा मेळाव्याला शिवाजी पार्क मिळायचं. परंतु, काही नाकर्त्या लोकांनी यावेळी दिलं नाही आणि शेवटी कोर्टानं तो निकाल दिला आणि तिथं शिवाजी पार्क द्यायला सांगितलं. आणि आत्ताची जी बायइलेक्शन आहे, त्याच्यामध्येदेखील कोर्टानं सांगितलं, की राजीनामा मंजूर करा आणि त्यांना उभं करायला परवानगी द्या. नेहमी सत्याचा विजय असतो ही गोष्ट लक्षात ठेवा. नेता बहुजनांचा, नेता बहुगुणांचा असा ज्यांचा लौकिक आहे ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्रातल्या सर्वपक्षीय लाखो कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक आदरणीय छगन भुजबळ साहेबांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस




# स्वत:चा जीवही धोक्यात घातला

**अजित पवार**

सोहळ्याच्या निमित्तानं याठिकाणी उपस्थित असणाऱ्या सर्व मान्यवरांचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, भुजबळ साहेबांचा चाहता या नात्यानं सर्वप्रथम मी मनापासून आपल्या सर्वांचं स्वागत करतो. सर्वांना मनापासून धन्यवाददेखील देतो. एक आगळावेगळा कार्यक्रम याठिकाणी होतोय. भुजबळसाहेबांना तितकीच तोलामोलाची साथ देणाऱ्या आदरणीय मीनाताई वहिनींनादेखील भुजबळ साहेबांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो. भुजबळ साहेबांना, मीनाताई वहिनींना निरोगी, दीर्घायुष्य लाभावं अशा प्रकारची प्रार्थनादेखील करतो.

मित्रांनो, आज खरं तर आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आहे, आपल्या महाराष्ट्राची परंपरा आहे. अनेक मान्यवरांचे



सत्कार आपण अनेक वर्षे पाहात आलेलो आहे. महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहिले असते, तर राजकीय मतभेदाचे मुद्दे बाजूला ठेऊन तेही छगन भुजबळ साहेबांच्याबद्दल बोलले असते तर महाराष्ट्राचा राजकीय सुसंस्कृतपणा अधिक ठळकपणे समोर आला असता. अशा एखाद्या घटनेनं महाराष्ट्राच्या सुसंस्कृत प्रतिमेला धक्का लागणार नाही याची खात्रीदेखील माझ्यासारख्या कार्यकर्त्याला आहे.


मीदेखील माझ्या राजकीय जीवनामध्ये कामाला सुरूवात केली, त्यावेळेस ज्येष्ठ नेते म्हणून भुजबळ साहेबांच्या हाताखाली काम करण्याची संधी आम्हाला मिळाली आणि भुजबळ साहेबांची अतिशय जवळून कामाची पद्धत, एखाद्या गोष्टीमध्ये लक्ष घातल्यानंतर जीव ओतून त्याच्यामध्ये काम करायचं, अशा पद्धतीनं त्यांनी आजपर्यंत त्याठिकाणी काम केलेलं आहे. बाळासाहेब थोरातांनी भुजबळ साहेबांची काही उदाहरणे दिली. मला आठवतंय, की भुजबळ साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनेत अनेक जबाबदारीच्या पदांवर कामे केली. स्वीकारलेलं पद आणि आणि मिळालेली जबाबदारी पार पाडताना आपल्या कार्याचा स्वतंत्र अवीट अशा प्रकारचा ठसा त्यांनी उमटविला. बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेनेची स्थापना ज्यावेळेस केली, त्यावेळेसही ते शिवसेनेच्या प्रमुखांबरोबर होते. आणि ज्यावेळेला शिवाजी पार्कला राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली तेव्हाही आदरणीय नेते शरदराव पवारांच्या खांद्याला खांदा लाऊन भुजबळ साहेब त्याठिकाणी लढत होते.

राजकीय घडामोडी होतात. चढ-उतार येतात. परंतु, त्याच्यातनं डगमगायचं नाही. भुजबळ साहेबांच्यावर कुठले कुठले आघात घडलेत ते आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे. मी त्याच्या खोलात जास्त जात नाही. परंतु, मित्रांनो मी एक गोष्ट जरूर सांगतो, जर एखाद्या दुसऱ्या नेत्यावर तशा प्रकारचे आघात झाले असते तर तो नेता खचून गेला असता, घरी बसला असता, त्यानं राजकारण सोडलं असतं. परंतु, भुजबळ साहेबांनी तसं केलं नाही. पुन्हा नव्या उमेदीनं तुमच्या सगळ्यांच्या पाठिंब्याच्या जोरावर त्यांनी हे सगळं सहन केलं आणि जनतेची कामं करण्याचा ध्यास त्यांनी त्याठिकाणी मनामध्ये ठेवला.

खूप उदाहरणं आहेत. ज्यावेळेस पाठीमागच्या काळामध्ये ते पहिल्यांदा मुंबईचे महापौर झाले, बॉम्बेऐवजी मुंबई नामकरण करताना त्यांचा फोटो प्रत्येक मुंबईकराच्या



**समारंभस्थळी अनौपचारिक गप्पात रमलेले छगन भुजबळ, फारूख अब्दुल्ला,**



आणि महाराष्ट्रवासियांच्या मनावर कोरला गेला. ही गोष्ट देखील आपल्याला नाकारता येत नाही. दोन वर्षे लागोपाठ महापौर म्हणून काम करत असताना त्यांची कामाची पद्धत, ८५ला आम्ही नव्हतो, आम्ही ९०ला मी, आर. आर. पाटील, जयंत पाटील, दिलीप वळसे पाटील आम्ही सगळेजण ९०च्या बॅचचे. परंतु, इथे बसलेले बाळासाहेब थोरात हे ८५चे. जुनी माहिती ज्यावेळेस आम्ही घ्यायचो त्यावेळेस एकटे भुजबळ साहेब एकट्या मशाल चिन्हावर शिवसेनेचे निवडून आलेले, परंतु सगळे सभागृह दणाणून सोडायचे. त्याठिकाणी लोकांचे प्रश्न मांडायचं काम करायचे. अशा प्रकारची त्यांची धडाडीची वृत्ती ही उभ्या महाराष्ट्राने त्याठिकाणी पाहिलेली आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागामध्ये मराठी माणूस आणि मराठी भाषेवरच्या अन्यायाच्या विरोधात आंदोलन करण्यासाठी ३६ वर्षांपूर्वी १९८६मध्ये भुजबळ साहेब दुबईचा व्यापारी इक्बाल शेखच्या वेषात बेळगावमध्ये घुसले होते. त्याबद्दल त्यांना अटकदेखील झाली. नंतर जेलदेखील झाली. मराठी माणसाचा आवाज सीमा भागामध्ये कमी होणार नाही यासाठी ते काम करत राहिले. आजदेखील काही पक्ष संघटना ओबीसी बांधवांकरता खोटे गळे काढत आहे. परंतु, ते मगरीचे अश्रू आहेत. देशात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळेस राज्यामध्ये आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रामध्ये अतिशय ठोस भूमिका घेण्याचं काम हे भुजबळ साहेबांनी केलं. त्यावेळेस साहेबांना बळ देण्याचं आणि शिवसेनेत असूनदेखील भुजबळ साहेब आघाडीवर होते ही गोष्ट आपल्याला विसरता येणार नाही.



प्रफुल पटेल, अजित पवार आणि दिलीप वळसे पाटील

मित्रांनो, खूप प्रसंग आले. एकदा तर अक्षरश: भुजबळ साहेबांचं आणि आपल्या सगळ्यांचं नशीब चांगलं, त्यांचा पुनर्जन्म झाला. त्यावेळेस फार गंभीर परिस्थिती होती. परंतु, त्याच्यातूनही ते वाचले. कारण आपल्या सगळ्यांचा भरभक्कम पाठिंबा, वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद, आपल्या सगळ्यांचं प्रेम त्यांच्या पाठीशी होतं, त्याच्यातून ते तावून सुलाखून निघाले. मित्रांनो, एवढ्या पुरतंच नाही, बाकीच्या बाबतीमध्ये आम्ही ज्यावेळेस पाहायचो, ओबीसी बांधवांच्या आरक्षणाच्या हक्कासाठी स्वत:ची राजकीय कारकिर्द आणि जीवही धोक्यात टाकण्याची जोखीम त्यांनी पत्करलेली होती, याची नोंद यानिमित्तानं आपण सगळ्यांनी घेतली पाहिजे.

१० जून १९९९ साली ज्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची

स्थापना झाली, त्याच्यानंतर खरं तर लगेच निवडणुका झाल्या. सहा महिने आधी निवडणुका घेतल्या. मित्रांनो, त्या निवडणुका रेग्युलर पाच वर्षांनी घेतल्या असत्या, चार महिन्यांमध्ये भुजबळ साहेबांनी आणि बाकीच्या सगळ्यांनी महाराष्ट्र पिंजून काढला पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली, आपण ५८ निवडून आलो, काँग्रेसचे ७५ आले आणि त्याच्यातून भुजबळ साहेबांना उपमुख्यमंत्रिपद घ्यावं लागलं. पण तेच जर सहा महिने अजून मिळाले असते, तर मी दाव्यानी सांगतो, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पहिल्या क्रमांकाचा पक्ष राहिला असता आणि भुजबळ साहेब त्यावेळेस राज्याचे मुख्यमंत्री दिसले असते. काही जणांच्या नशिबामध्ये संधी नसते हे आपण सगळ्यांनी पाहिलं. आपल्यालाही खूप वर्षे वाटत होतं, की पवार साहेबांनी पंतप्रधानपदावर बसावं. पण नाही योग आला. तशा पद्धतीनं मुख्यमंत्रिपदाचा योगही भुजबळ साहेबांना आला नाही. परंतु, तरीदेखील भुजबळ साहेबांनी मुख्यमंत्र्यांच्या तोडीस तोड काम करून दाखवलं. महाराष्ट्र सदन, मला आठवतंय प्रणव मुखर्जी साहेब राष्ट्रपती होते. उद्घाटनाला आले. त्यांनी बघितल्यानंतर म्हणाले, की दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवन आणि त्याच्यानंतर सगळ्यात चांगली इमारत कुठली असेल तर ती महाराष्ट्र सदन आहे. आजदेखील अनेकजणं जातात, राहतात. मी फायनान्स मिनिस्टर होतो. जयंत पाटील इथं बसलेत. एक रूपयादेखील राज्य सरकारनी महाराष्ट्र सदनमध्ये खर्च केला नाही. तरीही भुजबळ साहेबांची अतिशय वाईट पद्धतीनं बदनामी झाली. एखाद्याला अशा पद्धतीनं लोकांच्यामध्ये बदनाम करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचं जे घाणेरडं राजकारण काही जण करतात त्याला कुठंतरी आळा बसला पाहिजे. कारण आपण शाहू-फुले-आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेतो, त्यांचा महाराष्ट्र आहे. कुठंतरी आपण या गोष्टी शिकल्या पाहिजेत.

मित्रांनो, इतकंच नाही, मघाशी बोलत असताना बाळासाहेब थोरातांनी थोडं सांगितलं, एकदा असाच प्रसंग आला, सरकार जायचं, विलासराव देशमुख मला, जयंतरावना आम्हा सगळ्यांना म्हणाले, की जाऊ द्या आता, देऊ सोडून. आता नाही टिकत सरकार. भुजबळ साहेब म्हणाले, अजिबात नाही. सरकार टिकेल आणि भुजबळ साहेब कामाला लागले. समीरभाऊही त्याच्यामध्ये अतिशय पुढाकार घेऊन कामाला लागला आणि जवळपास गेलेलं सरकार पुन्हा आणलं. भुजबळ साहेब याच्यामध्ये खूप तरबेज आहेत. तुम्हाला माहिती नाही. उद्धवसाहेब जेव्हा पंधरा लोकं गेली तेव्हा तुम्ही त्यांना सांगितलं असतं ना, आत्ता तुम्ही मुख्यमंत्री दिसला असता. आम्ही स्वत: बघतोय. ठोशास ठोसा कसा त्याठिकाणी द्यायचा, त्याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे भुजबळ साहेब आणि तुम्ही बघा, नाशिक, नाशिकचा बदल केव्हा झाला. भुजबळ साहेब पालकमंत्री झाल्यानंतर तिथं फ्लायओव्हर झाले, तिथं रस्ते झाले. तिथं सुधारणा झाल्या. तिथं विकास झाला. नुसतं राजकारण केलं नाही, त्याच्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्येदेखील त्यांनी त्याठिकाणी क्रांती केली. अतिशय चांगल्या पद्धतीची खूप कामं भुजबळ साहेबांच्या नेतृत्वाखाली झाली. हे पण आपल्या विसरता येणार नाही, नाकारता येणार नाही.

मित्रांनो, भुजबळ साहेबांचा मोठा गुण आपण सगळ्या कार्यकर्त्यांनी घेतला पाहिजे. त्यांची लढाऊ वृत्ती, संकटांना न डगमगणारं, संकटांवर मात करून बचेंगे तो और भी लडेंगे म्हणत जिद्दीनं उभं राहणारं त्यांचं नेतृत्व हेदेखील आपल्याला विसरता येणार नाही. याची पण नोंद आपण घ्या. इतर पण बाबतीमध्ये भुजबळ साहेबांना अनेक बाबतीमध्ये अडचणी आल्या, बाळासाहेब ठाकरे पण त्यांच्यावर नाराज होते, परंतु, नंतर तो राग कमी करण्याच्याकरता शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी नंतरच्या काळात भुजबळ साहेबांना पूर्ववत प्रेम त्याठिकाणी दिलं. सगळं कुटुंब मातोश्रीवर गेलं होतं. घरी बोलवून अतिशय कौटुंबिक भोजन समारंभ घडवून आणण्यात आला होता. त्याच्यातून स्वर्गिय बाळासाहेब ठाकरेंचादेखील मनाचा मोठेपणा, विचारांचा दिलदारपणा त्याठिकाणी दिसतो. तसंच भुजबळ साहेबांच्या मनामध्ये स्वर्गिय बाळासाहेबांच्याबद्दल असलेला आदर आणि प्रेमदेखील त्याठिकाणी दिसतंय. महाराष्ट्राची हीच राजकीय संस्कृती लोप पावत चाललेली आहे याची खंत आज माझ्यासारख्या कार्यकर्त्याला कुठंतरी आहे. ही पण बाब आपण लक्षामध्ये घ्या.

भुजबळ साहेबांनी काय नाही केलं? भुजबळ साहेबांनी राजकारण केलं, समाजकारण केलं, साहित्य, कला, क्रीडा, नाटक, चित्रपट, अभिनय अशा अनेक गोष्टींत रमणारं, जीवनाचं मनापासून आनंद घेणारं हे व्यक्तिमत्त्व. अहो चित्रपटातदेखील काम केलं. फार मोठ्या नटसम्राटाला आपला महाराष्ट्र मुकलाय. नाहीतर बाकीच्यांचं काही खरं नव्हतं. मित्रांनो, १९८५मध्ये दैवत आणि १९९०मध्ये नवरा-बायको या दोन चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली. अशा पद्धतीनं कलेच्या क्षेत्रामध्येदेखील त्यांचं काम आहे. आदरणीय भुजबळ साहेब, वयाचं ७५ वर्षाचं संघर्षमय जीवन जगणारे तुम्ही आहात, त्यांना तोलामोलाची साथ देणाऱ्या सौभाग्यवती मीनाताई वहिनी आहेत, त्याच्यामध्ये समीर आहे, त्याच्यामध्ये वेगवेगळे माझे सहकारी आहेत, आणि या सगळ्यांच्यामध्ये ज्यांनी भुजबळ साहेबांच्या वाढदिवसाच्यानिमित्तानं मी पुन्हा एकदा व्यक्तीश: माझ्यावतीनं सर्वांच्यावतीनं त्यांचं अभिष्टचिंतन करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय राष्ट्रवादी!!!

■■



# उपेक्षितांसाठी लढणारा योद्धा म्हणजे भुजबळ साहेब

**प्रफुल पटेल**

भुजबळ साहेबांची एकसष्टी जेव्हा आपण साजरी केली होती, बरेच लोक तुमच्यापैकी त्यावेळेही उपस्थित असणारच. ती विराट सभा आपण केली होती शिवाजी पार्कमध्ये. लाखोंच्या संख्येनी महाराष्ट्रातून आणि महाराष्ट्राच्या बाहेरूनसुद्धा त्यांना चाहणारे बंधू-भगिनी आले होते. त्यावेळीही पवार साहेबांच्या उपस्थितीमध्ये तो कार्यक्रम आपण साजरा केला होता. आज महाराष्ट्रामध्ये एक योद्धा म्हणून फक्त ओबीसी समाजासाठीच नव्हे, तर दलित, शोषित कुणीही व्यक्ती असेल, त्यांच्यासाठी लढा लढणारा एक योद्धा म्हणून भुजबळ साहेबांची ओळख या महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये आहे. आणि म्हणून अशा एका व्यक्तीच्या ७५व्या वर्षामध्ये आपण सगळ्यांनी त्यांचा सन्मान करावा, त्यानिमित्तानं, भुजबळ साहेब यावेळेस तयार नव्हते, पण आम्ही काही लोकांना त्यांना सांगितलं, की अरे साहेब, ७५वं वर्ष आहे. वारंवार हे वर्ष येत नाही. शंभरावा तर आपण साजरा करणार आहोतच, पण त्याच्याआधी ७५वा वाढदिवस आपण सगळ्यांनी इथं उत्साहानं, प्रेमानं साजरा करावा म्हणून आजचा हा कार्यक्रम. अल्पशा वेळेमध्ये घेतलेला हा कार्यक्रम आहे. उद्धवजी, गेल्या चार-पाच दिवसांपासून एक व्हॉटसअ‍ॅप मेसेज व्हायरल होत आहे. त्यामध्ये भुजबळ साहेब ८५ साली मशाल घेऊन तिथे माझगावच्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी तिथे उभे होते. आता याचा अर्थ काय आहे ते समजून घ्यावा. नाही रिटर्न नाही. पण सोबत. असं रिटर्न घ्यायला लागलं तर अनेकांना घ्यावं लागेल. ते नाही परवडणार आपल्याला. तुम्हालाही नको आहे. पण निश्चित भुजबळ साहेब ८५ साली शिवसेनेचे पहिले विधानसभेवर निवडून गेलेले आमदार आणि तेवढंच नव्हे, त्याचवर्षी ते कार्पोरेटरही बनले आणि मुंबईचे महापौरही बनले. एक दीर्घ प्रवास त्यांचा आपल्या सगळ्यांना पाहायला मिळतो.



कार्यक्रमाचा समन्वयक म्हणून मी पुन्हा एकदा उपस्थित सर्वांचे आभार मानतो. आपण सर्वजण आलात, त्याबद्दल तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करताना भुजबळ साहेब, ७५नंतर शंभराव्या वर्षाची बॅटिंग कराल त्यावेळेही समन्वयक मीच असेन. खूप खूप धन्यवाद. शुभेच्छा. भुजबळ साहेब दीर्घायुष्य लाभो!

■■



# पुरोगामी-प्रॅक्टिकल राजकारण हे भुजबळ यांचे वैशिष्ट्य

**बाळासाहेब थोरात**

आज भुजबळ साहेब ७५व्या वर्षामध्ये पदार्पण करत असताना अमृतमहोत्सव सोहळा आपण संपन्न करत आहोत, मला असं वाटतं, की षण्मुखानंद हा त्यांच्या सोहळ्यासाठी खूपच अपुरं पडणारं सभागृह तुम्ही निवडलेलं आहे. वादळाचं स्वागत करायचं, वादळाचा सत्कार करायचा तर ते मोठ्या मैदानातच झालं पाहिजे असं माझं मत आहे आणि असं हे व्यक्तिमत्त्वसुद्धा आहे. भुजबळ साहेबांना मी पाहिलंय १९८५ साली मी प्रथम आमदार म्हणून विधानसभेत आलो आणि तेव्हापासून त्यांचं अत्यंत जवळून जीवनातलं काम पाहण्याची संधी मला मिळालेली आहे. कोणतंही नवीन सभागृह ज्यावेळी भरतं, त्यावेळेस सगळ्यांना खूप उत्सुकता असते. महाराष्ट्राला उत्सुकता असते. प्रेसच्या गॅलरीला उत्सुकता असते. आम्हालासुद्धा उत्सुकता असते, की कोण कोण आलंय. त्यावेळेस ते सभागृह भरलेलं असताना काही काळाकरता एक व्यक्तिमत्त्व मागं राहिलं आणि सभागृह सुरू झाल्यानंतर एक कापडाचा फलक घेऊन घोषणा देत सभागृहामध्ये घुसलं आणि आम्ही सगळ्यांनी प्रेससह टवकारून पाहिलं, की कोण आलं. तर भुजबळ साहेब आले होते. शिवसेनेची खरी एन्ट्री तेव्हापासून सुरू झाली आणि रोजच्या दिवसाला भुजबळ साहेबांनी भाग घेतला असं नाही आणि घेतला भाग तर ठसा उमटून गेलं हे वैशिष्ट्यसुद्धा त्यांच्या त्या आमदारकीच्या कालखंडातलं आम्हालासुद्धा आठवतं.

त्या कालखंडातले जे काही विरोधी म्हणून होते, त्यांच्यामध्ये आक्रमक आणि तरूण खूपजण होते. महत्त्वाची व्यक्तिमत्त्वं होती. राम कापसेसाहेब असतील, राम नाईक, केशवरावजी धोंडगे होते, दत्ता पाटील होते. मृणालताई होत्या.

परंतु, या सगळ्यांपेक्षा खूप तरूण असणारं असं व्यक्तिमत्त्व म्हणजे भुजबळ साहेबांचं. ९२ला ते आमच्याकडे आले. मंत्री म्हणून आम्ही त्यांचं काम पाहिलं. उत्तर देण्यामध्ये तरबेज. कधीच अडकले नाहीत. ९५ आलं आणि वेगळा काळ सुरू झाला. युतीचा कालखंड सुरू झाला आणि आम्ही विरोधी पक्षात जाऊन बसलो. परंतु, त्यावेळेससुद्धा विधानपरिषदेमध्ये भुजबळ साहेब गेले होते, विधानपरिषदेचे ते विरोधी पक्ष नेते राहिले. वादळ काय थांबलं नव्हतं. रोज काही ना काही बातमी आणि सरकारला धारेवर धरण्यामध्ये पटाईत असणारे भुजबळ साहेब आम्हा सगळ्यांना त्यावेळेस पाहायला मिळाले.

९९ला पुन्हा सरकार येण्यामध्ये जे वक्ते म्हणून कारणीभूत ठरले, मला आर. आर. पाटलांचं, आबांचं नाव घ्यावं लागेल. आठवण येणं साहजिक आहे. परंतु, पुन्हा सरकार आणण्यामध्ये जे कुणी कारणीभूत झाले, त्या सगळ्यांमध्ये युतीच्या विरूद्ध लढाई कुणी लढली असेल तर त्यामध्ये वरचा क्रमांक हा भुजबळ साहेबांचा राहिला हे सगळ्यांना आम्हाला मान्य करावं लागेल. थोडेसे झाले होते प्रश्न काही. दोन काँग्रेस झाल्या होत्या. परंतु, एक गोष्ट तुम्हाला सांगतो, भुजबळ साहेब जसं विचार घेऊन काम करतात, तसे प्रॅक्टिकल सुद्धा राजकारणी ते आहेत. बऱ्याच वेळा पुरोगामी म्हणणाऱ्यांच्या आणि डावा विचार घेऊन चालणाऱ्यांचं राजकारण मागं गेले. कारण ते प्रॅक्टिकल नव्हते. भुजबळ साहेब मात्र या दोन्हींचा फार सुंदर मेळ आहेत. आणि त्यामुळं पुन्हा दोन्ही काँग्रेस एकत्र आणण्यामध्ये आणि आघाडीचं सरकार स्थापण्यामध्ये भुजबळ साहेबांचा मोठा वाटा राहिला आणि आम्ही सगळे मंत्री झालो. बरेच जण आम्ही मंत्री झालो ते त्यावेळी झालो.



पंधरा वर्षांची वाटचाल आम्हाला सत्तेमध्ये मिळाली. काम करण्याची संधी आम्हाला मिळाली. पण एक गोष्ट आपल्याला मी त्यानिमित्तानं सांगतो, की २००२ किंवा २००३ साल असेल, अजितदादा आणि आम्ही सगळेजण अमेरिकेत होतो, जयंतराव होते. आम्ही सगळेजण पवार साहेबांनी आम्हाला जगातल्या शेतीचा अभ्यास करण्यासाठी नेलं होतं. आम्ही अमेरिकेत असताना अचानक एक संदेश आला, की काहीतरी गडबड तुमच्या सरकारमध्ये झालीय. काही मंडळी पळून जायच्या विचारात आहेत. आम्ही सगळेजण पाठीमागे आलो. त्यावेळेसुद्धा ग्राउंडवर ज्यांनी सूत्रं हलवली असतील, त्यामध्ये भुजबळ साहेबांचा मोठा वाटा आहे. समीर भाऊचं नाव त्यामध्ये घ्यावं लागेल मला. आमदारांना ताब्यात ठेवण्यामध्ये जे कोण होते, त्यामध्ये भुजबळ साहेबांचं नाव घ्यावं लागेल आणि मी यानिमित्तानं एक आठवण कायम सांगेन, की माननीय स्वर्गिय विलासरावजी देशमुख साहेब हे कायम म्हणायचे, की बाळासाहेब या भुजबळ साहेबांची आपल्याला खूप मदत झाली सरकार आपलं पुन्हा ठेवण्यामध्ये. आणि म्हणूनच नाशिकला समीरभाऊ उभे राहिल्यानंतर तुम्ही नाशिकमध्ये लक्ष द्या. तिथं समीरभाऊ खासदारकीला निवडून आले पाहिजेत असं कायम सांगणारे विलासराव देशमुख साहेब असायचे.

राजकारण हा विचाराचाही भाग असतो, पण राजकारण प्रॅक्टिकल असतं. राजकारण विद्वानांचं असतं, तत्त्वज्ञानाचं राजकारण असतं. परंतु ते प्रॅक्टिकल उतरलं तर कठीण होत असतं. परंतु, पुरोगामी विचार घेऊन त्या विचाराला प्रॅक्टिकलची जोड देऊन आपला विचार जो पुरोगामी विचार आहे तो पुढं नेण्याचं काम हे कायम भुजबळ साहेबांच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये झालेलं आहे. आणि म्हणून आजच्या या ७५व्या वर्षी त्यांना शुभेच्छा देत असताना त्यांना मी सांगेन, की या आता पुन्हा एकदा लढाई सुरू झालेली आहे आणि पेटवा रे मशाली आत्ताच म्हटले तुम्ही. मशालीबरोबर हात आहे आणि हाताला घड्याळ आहे. त्यामुळं काही काळजी करू नका. भुजबळ साहेब तुम्हाला पुन्हा एकदा महाराष्ट्रात फिरावं लागेल. पुरोगामी विचार आणि हे राजकारण सांगावं लागेल. आज जे आपल्याला दिसतंय लोकशाही धोक्यात, राज्यघटना धोक्यात, यामधून देश वाचवण्यासाठी तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. हे यानिमित्तानं मी सांगतो. आपल्याला ७५व्या वर्षाच्या खूप शुभेच्छा मी देतोय. आपल्या हातून आणखी खूप सेवा या देशाची, समाजाची व्हावी आणि याकरता चांगलं आरोग्य लाभो, अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो आणि शुभेच्छा देतो.

■■



मला याठिकाणी बोलावल्याबद्दल मी आभारी आहे. मी याठिकाणी बसलो असताना, एक गोष्ट माझ्या लक्षात आली, की हिंदुस्थानात लोकशाही आहे, किमान आतापर्यंत तरी आहे, पण ज्यावेळी आपण देशातून बाहेर जातो आणि मेडिटेरियल कोस्टपर्यंत जातो, तेव्हा आपल्याला लोकशाही मिळत नाही. असे कोणते गुण आहेत आपल्यामध्ये, की आपण लोकशाही ठेवली. त्याची मूळं एवढी घट्ट रूजली आहेत, की आज ती उखडू पाहणाऱ्यांना उखडता येत नाहीयेत. काय कारण आहे? याचे कारण हे आहे, की आपण हजारो वर्षांपासून लोकशाहीसाठी तयार होत होतो, आपले प्रशिक्षण सुरू होते. ही विचारधारा, ही संस्कृती देशाची हे सांगते, की चार गोष्टी त्यांच्या बरोबर आहेत, तर चार गोष्टी माझ्याही बरोबर आहेत. चार गोष्टी हे चांगल्या सांगत आहेत, मी मान्य करत नसलो तरी ठीक आहे त्यांचा दृष्टिकोन तरी सांभाळतो. त्यांची विचारधारा आहे. ही या देशाची परंपरा राहिली आहे आणि याच गोष्टीने जगात लोकशाही जीवंत राहत आहे. असे नाही, की जे केवळ मी सांगतोय तेच बरोबर आहे आणि जे अन्य सांगत आहेत ते चुकीचे आहे. मीच एकटा राष्ट्रप्रेमी, बाकीचे सर्व राष्ट्रद्रोही ही या देशाची विचारधारा कधीच राहिली नाही. त्यामुळेच आपल्याकडे लोकशाही आहे आणि ज्या ज्याठिकाणी हे झाले आहे, आणि ज्या ज्या ठिकाणी ही विचारधारा आहे, की जे आम्ही सांगतोय तेच बरोबर आहे आणि जे आम्ही सांगत नाही ते पूर्णपणे चुकीचे आहे, ते योग्य असूच शकत नाही, तर त्याठिकाणी लोकशाही कशी असेल?

हिंदुस्थानची विचारधारा हजारो वर्षांपासून वेगळी राहिली आहे. याठिकाणी बारकाईने पाहा. याठिकाणी चार-पाच राजकीय पक्षांचे लोक बसले आहेत. का सोबत बसले आहेत? कसे सोबत बसले आहेत? राजकीय पक्ष वेगळे आहेत, तर कुठेतरी विचारधाराही वेगळी असेल. मात्र, त्यांच्यामध्ये हीच नम्रता आहे, त्यांच्यामध्ये हीच आपल्या पारंपरिक संस्कृतीचा समजूतदारपणा आहे, की काही गोष्टी आम्ही बरोबर सांगत आहोत, पण तेसुद्धा योग्य सांगत आहेत आणि याच विचारधारेला हिंदुस्थान म्हणतात. या व्यासपीठावर हिंदुस्थान बसला आहे. मी आभारी आहे, की मला याठिकाणी बोलावले आहे.

पण आज तुम्ही बघत असाल, की असेही प्रयत्न केले जात आहेत, की ही जी विविधतेत एकता आहे, ती संपुष्टात आणली पाहिजे. आपल्याला असे बनवण्याचे प्रयत्न जसे आपल्या शेजारी काही लोक आहेत, मला तर तसे बनायचे नाही. आपण निवडणुकीची चर्चा करतो, ही शुल्लक गोष्ट आहे. निवडणुका येतात आणि जातात. प्रश्न हा आहे, की मला आणि तुम्हाला, आपल्या सर्वांना विचार हा करायचा आहे, की या देशाला कुठे घेऊन जायचे आहे. तिकडे ज्याठिकाणी आपल्याला हजारो वर्षांची परंपरा बोलवत आहे की तिकडे जेथे आम्हीच योग्य आहोत बाकी सर्वजण चुकीचे आहेत. हा निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे. मला घ्यायचा आहे.


सर्वप्रथम मी छगन भुजबळ साहेबांना ७५व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतो. मी त्यांना पाहून स्वत:ला असुरक्षित समजत आहे, की ते ७५व्या वर्षात एवढे तंदुरूस्त दिसत आहेत. मलाही प्रयत्न करावे लागतील. त्यांच्याशी माझी पहिली भेट झाली, त्याचा किस्साही सांगण्याची आवश्यकता आहे. अनेक वर्षांपूर्वी मी वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. त्या काळात लज्जा कादंबरी लिहिलेली तस्लिमा नसरीन



# संस्कृती, परंपरा हीच भारताची हजारो वर्षांपासूनची ताकद

## जावेद अख्तर यांचे उद्गार

बांगलादेशची, त्याठिकाणी हिंदु समुदायावर जे अत्याचार होत होते त्याविषयी कादंबरी लिहिली होती आणि त्यामुळे तेथील इस्लाम समुदाय त्यांच्याविरोधात गेला होता, तिचा खून करण्यासाठी आतुर होते, ती हिंदुस्थानात आली, कोलकात्यात होती. तर मी वर्तमानपत्रात एक छोटीसी बातमी वाचली, की तस्लिमा नसरीन मुंबईत येत आहे आणि मुंबईतच एक राजकीय पक्ष आहे, ज्यांनी म्हटलंय की मुंबईत पाय ठेवला तर जीवंत जाळू. मी माझ्या कोलकात्यातील एका मित्राला फोन केला आणि तस्लिमा नसरीनचा फोन नंबर देण्यास सांगितले. तिला फोन केला. माझी ओळख सांगितली. मी विचारले, की मुंबईला कधी येणार आहे. पण तिने सांगितले, की मुंबईला येण्याचे ठरवलेले नाही. मी म्हटलं, की तुम्ही मुंबईला येणार नाही. पण आता तर यावं लागेल. कारण जर आता तुम्ही आला नाहीत तर या पक्षाला वाटेल, की त्यांच्यामुळे तुम्ही आला नाही. तेव्हा तुम्ही मुंबईला या. तेव्हा त्यांनी तुम्ही सांगत आहात तर मी येते असे सांगितले. सायंकाळी मला पश्चिम बंगालचे उपमुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांनी फोन केला. म्हणाले, की तुम्ही तिला बोलवत आहात. पण त्यांच्या सुरक्षेचं काय. मी सांगितलं, की सुरक्षा होईल, तुम्ही याची काळजी करू नका. मी हा फोन ठेवला आणि त्यावेळचे गृहमंत्री छगन भुजबळ यांना फोन केला आणि सांगितलं, की सर आपल्याला या मुलीला मुंबईत बोलवायचं आहे आणि मुंबईत एखाद्या कोपऱ्यात कार्यक्रम घ्यायचा नाही, तर जो भाग संवेदनशील समजला जातो त्याठिकाणी कार्यक्रम घ्यायचा. भुजबळांनी सांगितलं, की तुमचा लोकतांत्रिक अधिकार आहे. तुम्ही त्यांना बोलवा. आम्ही त्यांना पूर्ण संरक्षण देऊ. तस्लिमा नसरीन आली. विमानतळावर आम्ही स्वागत केलं आणि मध्य मुंबईत मोठा कार्यक्रम घेतला. आणि छगन भुजबळांचा मी आभारी आहे, की कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही. ही आमच्या संबंधाची सुरूवात होती आणि त्यांचे हे उपकार मी विसरू शकत नाही.



आम्ही कोणत्या पक्षाचे नाही. पण एखाद्या नागरिकाचे राजकीय लोकांपेक्षाही मोठे कर्तव्य आहे, की त्याने जातीयवादाविरूद्ध आवाज उठविला पाहिजे आणि सांगितले पाहिजे, की मी भारताचा नागरिक आहे. तुम्ही जो भारत मला सांगत आहात तो नको आहे. मला तोच भारत पाहिजे, जो हजारो वर्षांपासूनच आहे. इथे एवढ्या मोठ्या संख्येने जमलेल्या लोकांवरून हे लक्षात येते, की छगन भुजबळ साहेबांनी तुमच्या मनावर किती ताबा मिळविला आहे. तेव्हा वाढदिवसाच्या पुन्हा एकदा शुभेच्छा! धन्यवाद!

■■



सौ. मीनाताई भुजबळ यांचा खासदार सुप्रिया सुळे सत्कार करताना, शेजारी प्रफुल पटेल, बाळासाहेब थोरात, छगन भुजबळ, शरद पवार,

# लहानपणापासून केलेल्या

माझी एकसष्टी साजरी झाली होती शिवाजी पार्कला आणि त्यावेळेला सुद्धा पवार साहेब तर होतेच, परंतु फारूख अब्दुल्ला साहेब त्यावेळेला शिवाजी पार्कवर आले होते आणि त्यांनी मला आशीर्वाद दिला होता. सगळेच आले होते. पण दोन लोक त्यावेळी होते, पण आत्ता नाहीत ते म्हणजे विलासराव देशमुख आणि गोपीनाथजी मुंडे. खरं तर आपण उपमुख्यमंत्र्यांनासुद्धा बोलवलं होतं, परंतु त्यांची काही अडचण असेल. नाही आले. पण त्यांच्या शुभेच्छा असतील असं मी गृहित धरतो मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या दोघांच्या.

७५ वर्षे झाली. खरं म्हणजे हा वाढदिवस येतोच, आपल्या हातामध्ये काहीच नसतं. आपण जरी सांगितलं ना, की तु येऊ नको. तरी तो थांबतच नाही. येतोच. मग ते वय किती आहे, अमुक किती आहे, तमुक किती आहे. काल दोन-तीन लोकांनी मला बोलवलं होतं. ते एबीपी माझामध्ये, तिथं पण त्यांचा काहीतरी कट्टा कार्यक्रम होता. तिथले ते प्रमुख म्हणाले, की अहो भुजबळ साहेब तुम्ही ही दाढी कशाला ठेवता हो. त्यातून तुम्ही उगीच वयस्कर वाटतांय. मी पण म्हटलं, की हे खरं आहे. आपलं तर वयच झालेलं नाही. मग मी त्यांना सांगितलं, की साहेब आज देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये दाढीवाल्यांचं राज्य आहे. कुठे काळी दाढी आहे. कुठे पांढरी दाढी आहे. त्याच्यामुळे मी पण ठेवली.

आता ज्याचा वाढदिवस आहे त्यानं सांगायचं तरी काय. सगळ्यांनी कौतुक केलं. पण ७५ वर्षाचा आयुष्याचा चित्रपट जेव्हा डोळ्यासमोरून जातो आणि मग आपण विचार करतो, की आपण कुठे होतो, काय झालं, पुढं काय झालं. हे



राजेश टोपे, दिलीप वळसे पाटील, उद्धव ठाकरे, फारूख अब्दुल्ला, कवी जावेद अख्तर आणि अजित पवार

# कष्टातून संपत्ती आली

**छगन भुजबळ**

अलिकडच्या दोन-पाच दिवसांमध्ये विचार करायला लागलो आणि मग असं लक्षात आलं की ज्यावेळेला आपल्याला काही कळत नव्हतं, त्यावेळेला आपले आई-वडिल दोघेही गेले आणि मग माझी मावशी मला माझगावला घेऊन आली. माझ्या भावाला पण आणलं आणि दहा बाय पंधरा फुटाच्या पत्र्याच्या घरामध्ये, जिथं लाईट नाही, वीज नाही, पाणी नाही, काहीही नाही. सकाळीसुद्धा दुसऱ्या बिल्डिंगमध्ये जायचं, अशा ठिकाणी लहानाचं मोठं आम्हाला केलं, म्युनिसिपालटीच्या दिव्याखाली आम्ही शिकलो, माझगावच्या डोंगरावर जायचो वाचायला, परंतु म्युनिसिपालटीच्या शिक्षकांनी माझ्यावर प्रेम केलं, कपडेसुद्धा ते द्यायचे, पुस्तकंसुद्धा ते द्यायचे, वक्तृत्व स्पर्धेला बोलायचं कसं, मुद्दे मांडायचे कसे असं सगळं त्यांनी केलं. आमच्या आजीनं, जी अशिक्षित होती, ती सगळीकडं घेऊन जायची. म्युनिसिपालटीच्या शाळेनंतर ते मला घेऊन गेले एलफिन्स्टन टेक्निकल हायस्कूलमध्ये. तिथे पण चांगलं शिक्षण मिळालं. अभिनयाचं पण शिक्षण मिळालं. एनसीसीमध्ये गेलो. नौदलाच्या बोटींवरही शिक्षण झालं. टेक्निकल बोर्डामध्ये चांगले मार्क्स मिळाले. मेरिटमध्ये आलो आणि एकदम व्हीजेटीआय कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. तिथेसुद्धा अभिनयामध्ये भाग घेतला आणि पहिलं बक्षिस मिळालं.

आता हे सगळं करत असताना बाळासाहेब ठाकरे यांची सभा शिवाजी पार्कला झाली. मी कॉलेजमध्ये सेक्रेटरी होतो. सगळी मुलं म्हणाली, की आपल्याला नोकऱ्या तर पाहिजेत, मराठी माणसांच्या न्यायासाठी लढणारे आहेत हे बाळ ठाकरे. चला आपण जाऊया शिवाजी पार्कला. आम्ही गेलो. त्या सभेला प्रबोधनकार ठाकरे होते. रामराव आदिक होते. दत्ताजी

साळवी होते. घरी आलो. सगळीजणं माझ्याभोवती जमले. भुजबळ तुम्हीच शाखाप्रमुख व्हा. आणि पहिले जे दहा-पंधरा शाखाप्रमुख झाले अख्ख्या मुंबई आणि महाराष्ट्रात, त्यातला मी शाखाप्रमुख पहिला. काम सुरू झालं. मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी लढणारी शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे असं मी स्वत: चुन्यानच भिंतीवर लिहियचो. असं करता करता ७३ साली छगन भुजबळ यांना मते द्या हे सांगत मी निवडून आलो. पैसे काहीच नव्हते. लोकांनी, शिवसैनिकांनी निवडून दिलं.

माझा मोठा भाऊ होता, समीरचे वडील, खूप कष्ट घेतले. सकाळी तीन वाजता मार्केटमध्ये जायचे. आम्ही दोघे लहान होतो ना, त्यावेळेला भाजी आणायला मार्केटमध्ये जायचो. तिथून मागून थोडीशी भाजी आणायची, ती माझगावच्या आमच्या घराच्यासमोर फुटपाथवर विकायची. मार्केट चार



पाच किलोमीटर लांब होतं. त्यावेळी टांगे होते. त्या टांग्याच्या मागच्या बाजूला आम्ही गुपचूप लटकायचो. कधी कधी टांगेवाल्याचा चाबूक अंगावर पडायचा. आम्ही दोघे पण कळवळायचो. खूप कष्ट घेतले. हळूहळू धंदा पण वाढत गेला. शिक्षण पण घेत राहिलो. भाऊ पहाटे तीन वाजता आणि मी पाच वाजता जायचो आणि तुम्हाला मी सांगतो हे आरसीएफ, जॉन्सन-जॉन्सन अशा मोठ्या मोठ्या कंपन्यांचे कॉन्ट्रॅक्ट जे आहेत वाशीत ते मगन बंधू या नावाखाली आम्ही दोघांनी त्यावेळी घेतली आणि ट्रक भरून भाजी पाठवायचो रोज. आणि लोक विचारतात, की एवढी संपत्ती कुठून आली? अरे, लहानपणापासून आम्ही मेहनत घेतलीय.

दास अँड कंपनीमध्ये प्राणलाल शाह, त्यावेळेला हिंदुस्थानमध्ये सगळ्यात जास्त व्हिन्टेज कार त्यांच्याकडे होत्या, त्यांचे काम मिळाले. अण्णासाहेब पाटील माझे मित्र, माथाडींची कॉन्ट्रॅक्टसुद्धा मी घेतली. त्याच्यातसुद्धा दोन पैसे मिळाले. एक कंपनी बंद पडली होती रबरेक्स, त्या अंजनवाडीमध्ये, मालकच सोडून पळून गेला होता. पगार नाही कोणाला, कामगार म्हणाले, घ्या कंपनी आणि चालवा. कंपनी सुरू केली. अख्ख्या बीएसटीचे टायर्स रिमोल्डिंगमध्ये माझ्याकडे यायचे. कसे आले पैसे? कसे आले पैसे? पनवेलमध्ये आणखी एक कंपनी घेतली. रबरचे वेगवेगळे पार्टस् बनवायला लागलो आम्ही. मुंबई ते गोवा अशी पहिली लक्झरी बस भवानी ट्रॅव्हल्स ही छगन भुजबळनं सुरू केली. सिनेमेही काढले. अनेक उद्योग गेले. ७८ साली वयाच्या अवघ्या ३२व्या वर्षी सप्तशृंगी गडावर मी आणि माझी पत्नी, माझा भाऊ, कडक उन्हामध्ये आम्ही गेलो. दर्शन घेतलं, पायऱ्या उतरल्या आणि माझा भाऊ तिथेच ब्रेन हॅमरेजने गेला. आता काय दु:ख, दु:ख तरी सांगायचं. लढत राहिलो. अतिशय कष्टानं.

७८ साली महानगरपालिकेची निवडणूक झाली. जनता पार्टीचं राज्य आलं. बाळासाहेबांनी मला नेता केलं. माझं काम चांगलं होतं. इंदिरा गांधींची हत्या झाली. लोकसभेची निवडणूक झाली. महाराष्ट्रात काँग्रेसला चांगलं यश मिळालं. दोन महिन्यांनी विधानसभेची निवडणूक आली. त्यावेळेला एस. काँग्रेसचे ५२

सदस्य निवडून आले. त्यावेळेला आमची पार्टी रजिस्टर नव्हती. त्यामुळं महानगरपालिका आणि विधानसभेला कुठली तरी निशाणी दिली जायची. लोकांना वाटायचं की शिवसेनेचा वाघ म्हणजे निशाणी. पण तो नव्हता. मग सोप्यात सोपी निशाणी कुठली? सोप्यात सोपी निशाणी म्हटलं ही मशाल आहे आणि ती मशाल घेतली. काढायला सोपी. कारण भिंतीवर आम्हालाच काढायची होती ना आणि आमच्याकडे ते सांगली, विट्याचे ते सोनाराचे काम करणारे सगळे. ते मग दिवट्या, मशाली घेऊन फिरायचे आणि भुजबळाला मते द्या, शिवसेनेला मते द्या असे गोंधळी सुरूच. प्रचाराची वेगवेगळी पद्धत शिवसेनेने सुरू केली आणि मी निवडून आलो. महाराष्ट्राचा निकाल आला आणि तुम्हाला सांगतो, अतिरथी, महारथी पडले, आणि एकटा छगन भुजबळ जो आहे त्यावेळेला निवडून आला. आता त्यानंतर आणि तिकडे फोन आला, मा. मनाहेर जोशींचा. म्हणाले, मी तुमचा फॉर्म मुंबई क्रिकेटच्या अध्यक्षपदासाठी भरतोय. मी म्हणालो, मला काही त्यातलं माहित नाही. ते म्हणाले, की तुम्ही कशाला काळजी करताय. मी आहे ना. त्यांनी फॉर्म भरला आणि त्यांच्या मुलानी अनुमोदक म्हणून सही केली. मला निवडणुकीची काहीच माहिती नव्हती. मी आलो आणि विरूद्ध कोण तर पवार साहेब. मला तर मतदार पण माहित नव्हते. मी विचारलं, की मनोहर जोशी कुठायंत. तर हे गायब. मी गेलो बाळासाहेबांकडं. म्हणालो, अहो बाळासाहेब, मी नको सांगितलं आणि यांनी फॉर्म भरला आणि हे दिसतच नाहीत कुठे. बिचारे बाळासाहेब, त्या बजाजना फोन कर, यांना फोन कर, त्यांना फोन कर. निवडणुकीच्या दिवशी त्या वानखेडे स्टेडियमवर गेलो आणि आम्ही शिवसैनिक उभे राहिलो. मी



काय झालं, छगन भुजबळ ८५ ते ९० या काळात अनेकांना कल्पना नाही, पण साहेबांपासून आमच्या या सगळ्या मंडळींना माहिती आहे.

खूप लढाई असायची. साहेबांच्या विरूद्धही, पहिल्यांदा वसंतदादा पाटलांच्याविरूद्ध लढलो, मग निलंगेकर पाटील, त्यांच्याविरूद्ध, मग शंकरराव चव्हाणांच्याविरूद्ध, आणि मग साहेबांना आणलं मुख्यमंत्री म्हणून. त्यावेळी काँग्रेसमध्ये काहीशी गडबड झाली. साहेबांच्या विरूद्धही लढलो आम्ही. भांडण केलंय. तुमची ती मुंबई क्रिकेटची कमिटी आहे ना. काय गंमत सांगायची आमची, मी कुटुंबाबरोबर बाहेर गेलो होतो, अध्यक्षपदासाठी उभा आहे असं सांगत होतो. तिकडून पवार साहेब सुद्धा आले. अध्यक्षपदाचे उमेदवार आणि त्यांच्याबरोबर कोण आले, तर मनोहर जोशी, सुधीर जोशी, पेठे. अहो, यांचं काय सांगता येत नाही हो.

पण दोन महिन्यांनंतर जे आहे, महानगरपालिकेची निवडणूक आली. आणि बाळासाहेबांनी मला पुढं केलं. त्या अगोदर प्रजा समाजवादी पक्षाबरोबर समझोता होता शिवसेनेचा. पण बाळासाहेबांनी स्वतंत्र लढायचं ठरवलं. परत लोकांनी मशाल निशाणी घेतली. पहिल्यांदा महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात त्यावेळी आली. बाळासाहेबांनी आमदार



राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे पुष्पगुच्छ देऊन छगन भुजबळ यांचा सत्कार करताना, शेजारी उपेंद्र कुशवाह

असतानासुद्धा छगन भुजबळला मुंबईचा महापौर केला. मी पहिला आमदार आणि महापौर मुंबईचा ८५ साली. मी अतिशय आनंदानं काम केलं. हुतात्मा स्मारकाचं काम आपण पाहिलं. मुंबईचे चौपाटीवर असलेले बोर्ड पण आपण केले. सुंदर मुंबई, मराठी मुंबईचा नारा दिला. ट्रॅफिक आयलंड जे दिसतात ना मुंबईत, ही कल्पना छगन भुजबळ महापौर असताना. त्यावेळी वर्तमानपत्रांनी लिहिलं, की मुंबई विकायला लागले व्यापाऱ्यांना. मी म्हटलं, विकायचं काय. इथे मोठे मोठे लोक येतात. पैसे कमावतात. इन्कम टॅक्सला पैसे भरतात. आणि आपले हे ट्रॅफिक आयलंड तसेच पडलेत. एक झाड नाही, पाणी नाही, काही नाही. त्यांना एवढंच सांगितलं, की नाहीतर आपण कुणाचं तरी नाव देतो ना. मी २२ वॉर्डमध्ये जाऊन तेथील हॉटेलवाले, व्यापारी, काही मोठ्या संस्थांना सांगितलं, की आमचे हे ट्रॅफिक आयलंड घ्या. आमचा माणूस नळ, पाणी, वीज सर्व काही देईल. सांभाळायचं तुम्ही. तुमची पाटी लावायची. आणि अख्ख्या मुंबईचं जे चित्र आहे ते बदललं. दादा कोंडके आमच्याबरोबर होते. त्यांनी सुंदर मुंबई, मराठी मुंबई नावाचा एक छोटा सिनेमा काढला. आम्ही दोघांनी उस्मानाबाद, लातूर भागात लाल दिव्याची कॉन्टेसा घेऊन शिवसेनेचा प्रचार केला. शिवसेना वाढली.

त्यावेळी तुम्हाला सांगतो, बीजेपी बरोबर नव्हती. आता जे ते म्हणतात ना, की शिवसेनेने काँग्रेसबरोबर युती केली. त्याविषयी सांगतो तुम्हाला. परत ९१ला भाजपबरोबर युती झाली. तुम्हाला सांगतो, हिंदुत्त्वाचा नारा बाळासाहेबांनी दिल्यानंतर भाजपबरोबर जाण्याचा विचार ज्यावेळी सुरू झाला, तेव्हा इथले जे वसंतरावर भागवत वगैरे भाजपचे जे होते, त्यांनी सांगितलं, की शिवसेना हा प्रांतिक पक्ष आहे. त्यांच्याबरोबर जायचं नाही. बाळासाहेबांनी म्हटलं, की नाही तर नाही. त्यावेळेला प्रमोद महाजन आणि इतर मंडळी, या बीजेपीच्या कार्यकारिणीची मिटिंग इथेच कुठेतरी झाली, कार्यकारिणीमध्ये दुसऱ्यांना बोलवत नाहीत. पण त्यांनी बाळासाहेबांना बोलवलं. त्यांनी मला बरोबर नेले. त्यावेळी वाजपेयी साहेब म्हणाले, की बाळासाहेब, आप के पास भुजबल है और हमारे पास बुद्धबळ है. दोनो अगर एक हो जाय तो चमत्कार हो जायेगा. एक प्रकारचा संदेश त्यांनी दिला. मग मी, मनोहर जोशी शिवसेनेच्या बाजूनी, प्रमोद महाजन, महादेव शिवणकर, मुंडे हे दुसऱ्या बाजूनी. मग वाटाघाटी सुरू झाल्या. त्यावेळी ठरलं, की विधानसभेला शिवसेना जास्त जागा लढवणार आणि लोकसभेला भाजप जास्त जागा लढवणार. त्यावेळी मग सगळ्यांना एकच निशाणी पाहिजे. आणि मग त्यावेळेला पार्टी रजिस्टर झाली आणि धनुष्यबाण मिळालं आणि मी परत निवडून आलो.

मंडलचा जयघोष आम्ही विधानमंडळातसुद्धा करायचो,

की मंडल झालंच पाहिजे म्हणून. व्ही. पी. सिंग यांनी मंडलची घोषणा केली. मी सुद्धा स्वागत केलं. मी महापौर होतो आणि त्यावेळेला गडबड झाली. बाळासाहेबांनी सांगितलं, की पोटाला जात नसते. आरक्षणची गरज नाही. शरद यादव त्यावेळी वस्त्रोद्योग मंत्री होते. कपिल पाटील, मृणाल गोरे, अनुराग चतुर्वेदी त्यांच्याबरोबर. यादव मला म्हणाले, की चला आमच्याबरोबर तुम्हाला ओबीसींचा नेता बनवतो. कोणीतरी म्हणाले, की ठाण्याच्या एका नगरसेवकाने शिवसेना सोडली आणि काय झालं ते तुम्हाला माहित आहे. मी यांच्याबरोबर गेलो शिवसेना सोडून, तर यांची पार्टी सोडत नाही आणि काँग्रेस म्हणणार, जा तुझं तू सांभाळ. सांभाळणार कोण मला? पुढे आमच्या ३६ आमदारांनी सांगितलं, की शिवसेनेतून बाहेर पडायचं. पवार साहेबांबरोबर माझी मिटिंग पुण्याच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्ये झाली. शिवसेना सोडली आम्ही. ३६ नाही आले, १८ आले. अठरातले सहा गेले. पण त्यावेळी वन थर्ड होतं. तरीही मधुकर चौधरींमुळे आमची आमदारकी राहिली. आता त्या पुस्तकामध्ये लिहिलंय, की मनोहर जोशींना विरोधी पक्ष नेता केलं म्हणून भुजबळ गेला. पण त्या पुस्तकातल्या काही गोष्टींबरोबर मी सहमत नाही.

अहो, नाशिकला बाळासाहेब आणि त्यांचे कुटुंबीय पत्रकार परिषद घेतायंत, की पोटाला जात नाही आणि मी मात्र त्याचदिवशी आरक्षण मिळालंच पाहिजे म्हणून मोर्चात सहभागी झालो होतो. दुसऱ्या दिवशी पेपरला भुजबळांच्या घरी ही प्रेस कॉन्फरन्स आहे आणि भुजबळ या मोर्चातही आहेत. हे खरं की ते खरं. मग निर्णय घेतला आणि त्यावेळेला जे पत्र तयार केलं, शिवसेनेचे खासदार विद्याधर गोखले आणि राधाकृष्ण नार्वेकर या दोघांनी मिळून ते पत्र तयार केलं, ते शिवसेनेचे खासदार होते. मग तिथे काय झालं शिवसेना सोडल्यानंतर. आत्तासारखी परिस्थिती नव्हती बाबा. नुसती पळापळ. कुठल्या तरी कंपनीत जायचं. तिथे थांबायचं. मग एक दिवशी गोविंदराव तळवळकर आले भेटायला. प्रतापसिंह पाटील गृहमंत्री होते. गोविंदराव तळवळकर महाराष्ट्र टाईम्सचे संपादक होते. त्यांनी आदल्या रविवारी पानभर लेख लिहिला होता, की वाघ जखमी झाला. ते म्हणाले, की मी एवढंच सांगायला आलो आहे, की तुम्ही कुठेही जा, पण भाजपमध्ये जाऊ नका.



मी शिवसेना सोडली. पवार साहेब भेटले. त्याच काळात समता परिषदेची स्थापना झाली होती. पवार साहेब मजबुतीने समता परिषदेच्या पाठीमागे उभे राहिले. समता परिषदेचा पहिला मेळावा एक लाख लोकांच्या उपस्थितीत कडक उन्हामध्ये जालन्यामध्ये झाला. सहा तास बसले होते. सगळं मंत्रीमंडळ होतं. पवार साहेब मुख्यमंत्री. आम्ही एकच सांगितलं, की साहेब, मंडल आयोगाची अंमलबजावणी करा. पवार साहेब उभे राहिले आणि सांगितलं, की भुजबळ ही एवढी सगळी मंडळी कडक उन्हामध्ये बसली आहेत. एक महिन्याच्या आत मी आरक्षण देणार म्हणजे देणार. पवार साहेबांनी शिक्षणात, नोकरीत आणि राजकारणातसुद्धा आरक्षण ताबडतोब एक महिन्याच्या आत दिलं. महात्मा फुले, सावित्रीबाई फुलेंचा वाडा पुण्याला राष्ट्राला अर्पण करण्याचा कार्यक्रम, त्यावेळीसुद्धा पवार साहेबांनी याच्यामध्ये सिंहाचा वाटा घेतला. एसपी ग्राऊंडला पाच लाखाची सभा होती आणि गव्हर्नर अलेक्झांडर आणि राष्ट्रपती शंकर दयाल शर्मा तिथे आले आणि आम्ही परत मागणी केली, की साहेब महात्मा फुलेंना ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी गुरू मानलं, त्या बाबासाहेब आंबेडकरांचं नाव मराठवाडा विद्यापीठाला दिलंच पाहिजे आणि हे काम तुम्ही करा. साहेबांनी सांगितलं, भुजबळ तुम्ही जालन्यात मागणी केली, एक महिन्यात पूर्ण केली. ही सुद्धा करणार आणि आपण नाही केलं तर कोण करणार. एक महिन्याच्या आत मराठवाडा विद्यापीठाला नाव देणार. सरकार गेलं तरी बेहत्तर. पण नाव देणार.

९५ साली पराभूत झालो. नाशिकला गेलो. वाचन, फिरणं सुरू होतं. एके दिवशी दिल्लीला तिकिट घेण्यासाठी गेलो. साडेतीन तिकिटं. त्यातील अर्धे मला मिळाले. विलासराव देशमुखांना मिळाले नाही. २७ मतांची गरज होती. मला ३६ मिळाले. विलासराव एक मताने पडले. त्यांना शिवसेनेने पाठिंबा दिला होता. आणि ते पडले म्हणून पुढे ते मुख्यमंत्री झाले. पवार साहेबांनी नंतर मला विरोधी पक्ष नेता केलं. रमाबाई नगरमध्ये बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना झाली. आंदोलन झालं. फायरिंग झाली. अकरा लहान

मोठी माणसं मारली गेली. मी विधानपरिषदेत येऊन सांगितलं, की हे सरकार खुनी आहे. यांनी लोकांचे खून केले. दुसऱ्या दिवशी माझ्या घरावर हल्ला झाला. अनेक गोष्टी झाल्या. राजू जैन नावाच्या व्यक्तीनं ॲफिडेव्हिट केलं, की मला सांगितलं होतं या भुजबळाने की तु विटंबना कर. पण मी नाही म्हणून सांगितलं, म्हणून त्यानं दुसऱ्याकडून करून घेतली. सामनामध्ये छापून आलं, की हाच तो नराधम. बघा यानेच विटंबना केली. मी म्हटलं, अरे मी काहीच केलं नाही. या सगळ्या प्रकरणामध्ये गुंडेवार समितीची नेमणूक झाली. त्यामध्ये स्पष्ट झालं, की या माणसाशी माझी भेट झालीच नव्हती. ज्यावेळी तो आला म्हणून सांगत होता, त्यावेळी मी कांदिवलीला मोर्चामध्ये होतो. तो ज्या हॉटेलमध्ये राहिला म्हणून सांगतो, तिथे तो राहिलाच नाही. ज्या बसने गेला म्हणून सांगतो, ती बसच तिकडे नाही. आणि गुंडेवार समितीने क्लिन चीट दिली.

मी बाळासाहेब ठाकरेंवर केस टाकली मानहानीची. एकीकडे हायकोर्टाच्या माजी न्यायाधिशांनी दिलेली क्लिन

तयार नाहीत. अहो, केस झाली पूर्ण. तुम्हाला कळतंय का या केसचा काय निकाल आणि तुम्ही काय करतांय. मी पाय धरतो. पण मला केस मागं घ्यायचीय असं सांगितलं. केस मागे घेतली. तिथेच मागे उद्धव साहेब होते. त्यांनी मला सांगितलं, की साहेबांनी तुम्हाला चहाला बोलवलंय. मी सांगितलं, की नंतर येतो. साहेबांनी आठ दिवसांनी फोन केला. पूर्ण कुटुंबाला घेऊन मातोश्रीवर यायचं. सगळ्यांना घेऊन गेलो. तीन-चार तास सगळं नाष्टा, जेवण, चहा. जणू काही आमच्या आयुष्यात काही घडलंच नाही. भांडण झालंच नाही. ही फार मोठी माणसं होती. अहो, पवार साहेब आणि त्यांचं किती मोठं भांडण. तरीही किती मैत्री.

त्यावेळेला काम पण केलं होतं आम्ही. हे गँगवार जे आहे ते कंट्रोलमध्ये आणण्याचं काम केलं. ७५ हजार पोलिसांना विलासराव होते त्यावेळी ताबडतोब कायम करून टाकलं. रॅपिड ॲक्शन फोर्स, सायबर क्राईम, पर्यटन होतं, त्यामध्ये तारकर्ली, मल्टिप्लेक्सची पॉलिसी मी तयार केली. अनेक कामं



प्रथम आमदार व मुंबईचे महापौर झाल्यावर छगन भुजबळ यांची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत निघालेली भव्य विजयी मिरवणूक



चीट आणि दुसरीकडे सामनाचे वृत्त, त्यातही प्रश्नचिन्ह नाही. ठळठळीत हाच तो नराधम. केस सुरू झाली. काही महिन्यांनंतर सुभाष देसाई आले. संजय राऊत आले. एक चिठ्ठी दिली. त्यांनी सांगितलं, की बाळासाहेबांचं वय झालंय. आजारी पण असतात. माझ्या लक्षात आलं. म्हटलं, आता काय बोलू नका. मला समजलं काय करायचं ते. केस कधी आहे ते सांगा. तारीख सांगितली. मी तिथं गेलो. न्यायाधिशांसमोर विनवण्या केल्या, की मला केस मागे घ्यायचीय. पाच मिनिटे ते ऐकायलाच

आपण केली. आणि तितक्यात परत माझ्यावर स्टॅम्प पेपरचा आरोप झाला. माझा काहीच संबंध नव्हता. त्याआधीच्या सरकारनं सोळा वेळा त्या तेलगीला सोडलं होतं. कोर्टानं फरार घोषीत केलं होतं आणि त्यावेळचे मुख्यमंत्री नारायणराव राणे यांच्याबरोबर धुळ्याच्या मिटिंगमध्ये तो. त्याला अटक करणारे त्यावेळचे कमिशनर यांना पदावरून उतरताच अटक केली. न्यायालयानेही त्यांना का म्हणून अटक केली अशी विचारणा केली. केस सीबीआयकडे गेली. त्यावेळी बीजेपीचं

सरकार होतं. माझी आणि माझ्या मुलांची चौकशी झाली. पण चार्जशीट तयार झाली. त्यामध्ये भुजबळ हे नावच नाही. पण नुकसान झालं होतं. उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा, मंत्रिपदाचा राजीनामा. पण किटाळ टळलं होतं.

परत २००४ला निवडणूक आली. पवार साहेब म्हणाले, की काय करायचं. निवडणूक लढवायची, पण येवल्यातून असं सांगितलं. उभा राहिलो आणि लोकांनी मोठ्या मतांनी निवडून दिलं. त्यानंतरही खूप काम केलं. पालकमंत्री केलं. त्यावेळी सप्तशृंगी गडावर जाण्यासाठी ट्रॉली केली. रस्ते केले. विमानतळ केलं. रिंग रोडस् बनवले. पाणी आणलं. बोट क्लब केलं. सलमान खान आला होता. नंतरच्या सरकारमधील मंत्र्याने पंधरा बोटी लंपास केल्या. त्या बोट क्लबला अमेरिकेच्या मासिकाने बेस्ट डिझाईन, बेस्ट बोट क्लब म्हणून फ्रंट पेजवर फोटो छापला. पाच वर्षांनंतर ज्यावेळेला पवार साहेबांच्या जादुगिरीमुळे आमचं सरकार आलं, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, त्यावेळेला तो बोट क्लब सुरू झाला.

फुटाची आणि तिला सहा फुटाचा रेडा होईल का? शंभर कोटीचं कॉन्ट्रॅक्ट असेल तर त्याच्यामध्ये हजार कोटी कसा काय खाणार. अडीच वर्षे आम्ही जाऊन आलो आत. नंतर आता केस झाली. सुरू आहे सत्र न्यायालयात. कंत्राट दिलं हाय पॉवर कमिटीनं. केस चालली नाही. केसमधून आमची नावंच काढून टाकली. सगळ्यांनी सांगितलं, की महाराष्ट्र सदन एवढं सुंदर एवढं सुंदर. तिकडे दिल्लीश्वरांच्या बैठका व्हायच्या. लोक म्हणायचे, क्या महाराष्ट्र सदन कितना सुंदर है. म्हटलं, हां महाराष्ट्र सदन बहुत सुंदर हैं, बनानेवाला अंदर हैं.

अडीच वर्षे जेलमध्ये जाऊन आलेल्या माणसाला ज्यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांचं सरकार बनलं आणि तुम्हाला सगळ्यांना कल्पना आहे, या पवार साहेबांनी मंत्री केलं. कोण करतं हो हे सगळं. मी स्वत:ला अतिशय भाग्यवान समजतो. माझ्या आयुष्यामध्ये दोन नेते, एक बाळासाहेब ठाकरे, ज्यांनी मला माझगावच्या झोपडपट्टीतून पुढं आणलं महापौरपदापर्यंत, आणि नंतर फुले-शाहू-आंबेडकरांच्या





शरद पवार आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना एका हारात गुंफून त्यांचा सत्कार करताना मुंबईचे महापौर आमदार छगन भुजबळ

महाराष्ट्र सदनचं मी काय सांगायचं. राज्य सरकारने अजून एक पैसा दिला नाही त्या कंत्राटदाराला. ते महाराष्ट्र सदन, अंधेरीचं फाईव्ह स्टार आरटीओ ऑफिस, हायमाऊंट असे बरेच काही, पण एक पैसा नाही दिला त्या चमनकराला. कॉन्ट्रॅक्ट शंभर कोटीचं, आणि माझ्यावर आरोप २५ हजार कोटी खाल्ले, दहा हजार कोटी खाल्ले, हजार कोटी खाल्ले. समजा म्हटलं खाल्ले, पण शंभर कोटीचं काम ना रे, त्याच्यामध्ये हजार कोटी कसा खाईन? आमचे आर. आर. पाटील म्हणायचे, म्हैस चार

मार्गानं समता परिषदेचं काम करत असताना पवार साहेबांनी सातत्यानं पाठराखण केली. विश्वास ठेवला. माझ्याएवढा भाग्यवान दुसरा कोणीही राजकारणी नसेल. बाळासाहेबांकडून अनेक गोष्टी शिकलो. पवार साहेबांकडून रचनात्मक काम कसं करायचं हे शिकलो. अडचणीमध्ये आपल्या सहकाऱ्यांना कसं सांभाळायचं, कसा त्यांना मदतीचा हात द्यायचा हे पवार साहेबांकडून शिकायचं. म्हणूनच ते देशाचे नेते होतात.

साहेब तुम्हाला सांगतो, हे जे काय आत्ता चाललेलं



छगन भुजबळ यांचा सत्कार करताना बाळासाहेब ठाकरे

आहे ना, की हे काँग्रेसबरोबर गेले, हिंदुत्त्व सोडलं. मस्तान टँकवर आणि जुला मैदानवर बॅरिस्टर गुलाम महंमद बनातवाला यांच्याबरोबर बाळासाहेब ठाकरेंची मुसलमानांच्या एरियामध्ये दोन वेळा सभा झाली. मुस्लिम लीगचे अध्यक्ष जी. एम. बनातवाला यांच्याबरोबर. त्यांनी सांगितलं होतं, की तुम्ही भारतीय मुसलमान आहात. आपण एकत्रित काम करू. बाळासाहेबांचा तोच दृष्टिकोन होता. एवढंच नाही, सलमान रश्दीच्या विरूद्ध भेंडी बाजारात मोर्चा निघाला. बाळासाहेब त्या मोर्चामध्ये गेले. काय सांगतात हे. मन मोठं लागतं हो. तेव्हा लोक मोठे होतात. काही दिवस प्रॅक्टिकल सोशॅलिझम, निळूभाऊ खाडीलकर आणि नवाकाळ, तीसुद्धा कास बाळासाहेब ठाकरेंनी धरली. आणखी एक सांगतो. दलित मुस्लिम महासंघ निर्माण झाला होता आपल्याकडं. माझ्याच घरी बाळासाहेबांची आणि त्या नेत्यांची बैठक झाली आणि पुढच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये त्या महासंघाने सगळीकडे उमेदवार उभे केले. आम्ही पण सगळीकडे उमेदवार उभे केले. दलित मुस्लिम महासंघानं काँग्रेसची मतं खाल्ली आणि शिवसेनेचे उमेदवार निवडून आले. राजकारणातले हे जे कंगोरे आहेत ना ते पाहावे लागतात.

काँग्रेसचं सांगतात, अंतुलेंच्या वेळेला शिवसेनेनं पूर्ण पाठिंबा काँग्रेसला दिला. एकही उमेदवार उभा केला नाही बाळासाहेबांनी. त्या बदल्यात तीन एमएलसीज् शिवसेनेला मिळाल्या विधानपरिषदेमध्ये. मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, वामनराव महाडिक एमएलसी झाले. असं नाही की काँग्रेसबरोबर गेले नाहीत बाळासाहेब. गेले होते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सपोर्ट केला होता. राजकारणामध्ये आपल्याला पुढे जायचं असेल तर काही वेळेला तडजोडी कराव्या लागतात. एवढंच नाही. त्यावेळी श्रीलंकेत लिट्टेची गडबड सुरू होती आणि राजीव गांधींना भेटायला तिकडचे नेते आले होते. एक दिवशी महापौर बंगल्यावर मी परत आलो. बाळासाहेब बसलेले होते. ते म्हणाले, की थांबा काही पाहुणे आपल्याकडे येणार आहेत. अचानक मोरेश्वर सावे खासदार होते. त्यांच्याबरोबर चंद्रास्वामी आणि दोन





लोक आले होते. लिट्टेचा प्रभाकरन आणि चंद्रहास अशी ती दोघे होते. बाळासाहेबांची शक्ती पण तेवढी होती, त्यांना भेटायला लोक यायचे. लंकेतली ती माणसं राजीव गांधींशी बैठक झाल्यानंतर बाळासाहेबांना भेटायला आली होती. या गोष्टी मी का सांगतो, तर या गोष्टी कुणालाच माहित नाहीत.

कॉन्ट्रोव्हर्सी आणि आम्ही, आमचं काय संपतच नाही. लागल्या. महिला शिकायला लागल्या आणि मग मी सांगितलं, की एकानं राज्यक्रांती घडवली. अन्यायाच्याविरूद्ध आवाज उठविला. आपल्याला खरं स्वातंत्र्य त्यावेळी मिळालं. फुले, शाहू, आंबेडकर, सावित्रीबाई, भाऊराव पाटील, अण्णा कर्वे या सगळ्या मंडळींनी आपल्याला शिकवलं. यांची पूजा करा. दुसऱ्या दिवसापासून ट्रोलिंग, माझ्या घरी नाशिकला, सरस्वतीची



जाहीर सभेत बाळासाहेब ठाकरे यांच्या समवेत दत्ताजी साळवी, छगन भुजबळ, प्रमोद नवलकर आणि मनोहर जोशी.

समता परिषदेचं अधिवेशन. पवार साहेब अध्यक्ष. सत्यशोधक समाजाला दीडशे वर्षे झाले म्हणून तो कार्यक्रम आणि सत्कार. सत्यशोधक समाजाच्या पुस्तकात काय काय लिहिलंय हे कुणी वाचलंय का. त्यांना म्हणाव एकदा वाचा. लहानपणापासूनच आम्हाला सांगतात, की सरस्वती ही विद्येची देवता आहे. मग पाच हजार वर्षे आम्हाला शूद्र म्हणून का शिकू दिलं नाही. हे मराठा वगैरे आम्ही सगळे शूद्र. बाकीचे अतिशूद्र. ब्राह्मणांच्या मुलींनीसुद्धा शिकायचं नाही. अशा वेळेला महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले हे पुढे आले. पहिली शाळा निघाली. त्यांना ब्राह्मणांनी पाठिंबा दिला. भिडे, चिपळूणकर, भांडारकर आणि पहिल्या वर्गामध्ये सहा मुली आल्या, त्यात चार ब्राह्मणांच्या, एक धनगर आणि एक मराठा. अरे म्हटलं, यांनी आपल्याला शिकवलं ना. महात्मा फुलेंचे डॉक्टर होते, डॉ. घोले हे सर्जन होते मोठे. त्यांच्या लहान मुलीला शाळेत पाठवायचं होतं. काही लोकांना ते पटलं नाही. काच कुटून तयार केलेला लाडू त्या कोवळ्या मुलीला खायला दिला. आतमध्ये रक्तस्राव झाला आणि ती मुलगी गतप्राण झाली. त्यावेळी मुली शिकायला पूजा, करा म्हटलं, मी नाही कुठं म्हटलं. अरे पण, तेच आपल्या घरात करा. घरामध्ये कुणाचीही पूजा करा. पण शाळेमध्ये लहानपणापासून या महापुरूषांचा इतिहास त्यांना सांगा. यांचं काम त्यांना सांगा. म्हणजे त्यांना कळेल, की या शिक्षणासाठी या लोकांनी काय केलंय आणि आपल्याला काय करायचंय.

आता मोहन भागवत त्यादिवशी बोलले, की ब्राह्मणांनी पापक्षालन केलं पाहिजे. पवार साहेबांनी पण त्यांना सांगितलं, की ते नुसतं करून चालणार नाही. ते व्यवहारामध्येसुद्धा उतरावं लागेल. महात्मा फुले समता परिषदेचं काम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं काम आणि महाविकास आघाडीचं काम पवार साहेब आणि इतर सगळ्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपल्याला सुरू ठेवावं लागेल. मागे हटून चालणार नाही. काय वाट्टेल ते झालं तरी. जिंदगी के खेल में कल हो ना हो क्या पता, पर आगे की मंझिल पाने की ख्वाईशे मैं हमेशा रखता हूँ. लहानपणी मी जे शिकलो, की जिंदगी हैं संग्राम, बंदे ले हिम्मत से काम. धन्यवाद. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■




# माय लॉर्ड...आम्ही गोंधळलो आहोत!

**अल्पसंख्यक समाजाबद्दल एवढा तिरस्कार व घृणा ठासून भरलेले राज्यकर्ते देशात असतील तर न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी कितपत होईल याबद्दल सामान्यजनांच्या मनात शंका निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतील धर्मनिरपेक्षता तत्वाचा संदर्भ देणे सहज सोपे आहे. परंतु राज्ययंत्रणा आणि राज्यकर्तेच त्या तत्वाला हरताळ फासणारे असतील तर न्याय होणार कसा ? देशाचे पंतप्रधान उघडपणे कोणताही मुलाहिजा न ठेवता बिनदिक्कतपणे बहुसंख्यक धर्म पुरस्काराचे प्रकार करीत असतील तर न्यायालयांनी व्यक्त केलेली मते, त्यामागील भावना केवळ निरर्थक, अर्थहीन मानाव्या लागतील. न्यायालयांनी राज्यघटनेशी बांधिलकी व्यक्त करतानाच त्या राज्यघटनेची शब्दशः आणि त्यामध्ये अपेक्षित उद्दिष्टांच्या आधारे अंमलबजावणी करण्यावरही भर दिल्यास कायद्याचे अधिराज्य अवतरले असे म्हटता येईल. अन्यथा 'कृतिविण वाचा व्यर्थ आहे' किंवा 'शब्द बापुडे केवळ वारा' असे न्यायालयीन निर्णयांबद्दल म्हणावे लागेल.**


अनंत बागाईतकर

या सर्व घडामोडी अलिकडच्या काळातल्याच आहेत. सर्वसामान्यांना त्यामुळे गोंधळल्यासारखे झाले आहे. विषय माननीय सर्वोच्च न्यायालयाने अलिकडे केलेल्या काही निर्णयांबद्दलचा आहे. सर्वसामान्य नागरिकांना कायद्याचे जुजबी ज्ञान असते आणि मुख्य म्हणजे कायद्यांचा अर्थ किंवा एखाद्या कायद्याचा हेतु काय व त्यात समाविष्ट असलेली भावना(स्पिरिट) याचे आकलन सामान्यांना असू शकते. त्याचप्रमाणे 'रुल ऑफ लॉ'–'कायद्याचे अधिराज्य' म्हणजेच सर्व नागरिकांना समान कायदा लागू असण्याचे मूलभूत तत्वही सामान्यजनांना त्यांच्या शालेय अभ्याक्रमातच माहिती झाले असते. त्यामुळेच माननीय न्यायालयाचा असा एखादा निर्णय आला की ज्यामुळे नागरिकांच्या कायद्यापुढील समानता मानण्याच्या तत्वाला छेद जाताना आढळल्यास सामान्यजनांचा गोंधळ उडतो. हिजाब संबंधीच्या प्रकरणात निर्णय न करता ते प्रकरण घटनापीठाकडे पाठविण्याचा निर्णय करण्यात आला. त्यानिमित्ताने माननीय न्यायमूर्तींनी प्रकट केलेल्या मतांमुळे सामान्यजनांचा गोंधळ उडणे स्वाभाविक आहे. हिजाब परिधान करणे ही व्यक्तिगत स्वातंत्र्याची बाब आहे की राज्यघटनेत समाविष्ट धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाशी जोडलेली आहे यासंदर्भात दोन न्यायमूर्तींनी प्रकट केलेली मते भिन्न असल्याने आता हे प्रकरण सरन्यायाधीशांकडे पाठवून कदाचित घटनापीठाकडे किंवा मोठ्या खंडपीठाकडे पाठविण्याची शिफारस झालेली आहे. हा निर्णय देताना एका न्यायमूर्तींनी शाळांमध्ये परिधान करावयाच्या गणवेषाबद्दल संबंधित राज्य सरकारला निर्णयाचा अधिकार आहे आणि घटनेत समाविष्ट धर्मनिरपेक्षतेच्या तत्वानुसार शाळा–महाविद्यालयांमध्ये समान गणवेष पध्दती लागू करण्याच्या बाजुने निर्णय दिला. तर दुसऱ्या न्यायमूर्तींनी हिजाब किंवा पेहराव व पोशाख परिधान करण्याचा अधिकार हा व्यक्तिगत स्वातंत्र्याची बाब असल्याचे सांगून संबंधित व्यक्तीस ते स्वातंत्र्य मिळावे असा निर्णय दिला. या मतभिन्नतेमुळे यासंदर्भात निर्णय होऊ न शकल्याने आता ते प्रकरण सरन्यायाधीशांकडे पाठविण्यात आले आहे. या मतभिन्नतेमधून आलेला मुद्दा महत्वाचा आहे. लोकशाही देशात व्यक्तिगत स्वातंत्र्य अधिक महत्वाचे किंवा प्राधान्याचे की सामूहिकतेला प्राधान्य द्यायचे हा तो मुद्दा आहे. आता याचा निर्णय कोणत्या निकषांवर होणार याची प्रतीक्षा आहे.

आठ महिन्यांपूर्वी कर्नाटक सरकारने शाळांमध्ये जाणाऱ्या मुस्लिम विद्यार्थिनींना हिजाब किंवा बुरखा परिधान करण्यास मनाई करणारा आदेश जारी केला होता. त्याला कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्य सरकारचा मनाई आदेश कायम ठेवला. त्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाचे दोन न्यायमूर्ति हेमंत गुप्ता आणि न्यायमूर्ति सुधांशु धूलिया यांच्या खंडपीठापुढे याप्रकरणी सुनावणी झाली. त्यासंबंधीचा निर्णय देताना दोन्ही न्यायमूर्तींमध्ये मतभिन्नता असल्याचे स्पष्ट झाल्याने आता हे प्रकरण सरन्यायाधीशांच्या आधीन होऊन कदाचित एखाद्या मोठ्या खंडपीठाकडे ते सुपुर्त होऊ शकते. न्यायमूर्ति हेमंत गुप्ता यांनी त्यांच्या निर्णयात राज्यघटनेत समाविष्ट धर्मनिरपेक्षतेच्या तत्वावर भर दिलेला आढळतो. राज्य सरकारच्या अनुदानावर चालणाऱ्या एखाद्या शाळेत धार्मिक श्रध्दांना प्राधान्य देणे उचित ठरणार नाही. कारण संबंधित शाळा सरकारी असल्याने व सरकार धर्मनिरपेक्षतेस बांधील असल्याने धार्मिक श्रध्दांना तेथे प्राथमिकता असू शकणार नाही असा त्यांच्या निर्णयाचा सर्वसाधारण आशय आहे. तसेच अभिव्यक्तीच्या अधिकारानुसार स्वतःच्या



इच्छेनुसार पोशाख करण्यास उचित व रास्त बंधने लागू असतात. एकसारखा गणवेष परिधान करण्याने समानतेचा अधिकार प्रस्थापित होतो. असेही त्यांनी त्यांच्या निर्णयात नमूद केले आहे. न्यायमूर्ति गुप्ता यांनी आणखी एक निरीक्षण नोंदविले आहे. हिजाब परिधान करणे ही धार्मिक श्रध्दा किंवा विश्वास







किंवा मुस्लिम सामाजिक आचरणाचा भाग असू शकतो परंतु ती बाब सर्वस्वी व्यक्तिगत किंवा वैयक्तिक आहे. सारांशाने न्यायमूर्ति गुप्ता यांच्या निरीक्षणांचा अर्थ लावायचा झाल्यास त्यांनी राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला विशेष प्राधान्य दिलेले आढळते. कोणतेही सरकार हे राज्यघटनेला बांधील असते आणि पर्यायाने त्यामध्ये समाविष्ट तत्वांनाही ते बांधील असते. त्यामुळेच सरकारी मदतीवर चालणाऱ्या शाळांमध्ये सरकारी नियम व तेही राज्यघटनेतील तत्वांवर आधारित निर्णय लागू करणे ही पूर्णपणे सरकारी अधिकार कक्षेतील बाब आहे.


शाळेतील गणवेष कसा असावा आणि तो निश्चित करताना घटनेतील तत्वांचे पालन कसे होईल हे पाहणे सरकारचे कर्तव्य आहे व त्यानुसारच कायदा सर्व नागरिकांना समान असतो या तत्वानुसार कर्नाटक सरकारने शाळांमध्ये मुस्लिमधर्मीय मुलींना हिजाब घालण्यास बंदी केली ती कायद्याशी सुसंगतच आहे.

न्यायमूर्ति धूलिया यांनी मात्र हिजाब परिधान करणे हा व्यक्तिगत स्वातंत्र्याचा भाग असल्याचे सांगून कर्नाटक सरकारने केलेली बंदी अयोग्य असल्याचे नमूद केले. घरात किंवा घराबाहेर देखील मुस्लिम मुलींना हिजाब परिधान करण्याचा अधिकार आहे आणि तो अधिकार शाळेच्या प्रवेशद्वारापाशी संपत नाही. शाळेत किंवा तिच्या वर्गातही तिची व्यक्तिगतता (प्रायव्हसी) आणि वैयक्तिक प्रतिष्ठा जपण्याचा तिला अधिकार आहे व तो तिचा मूलभूत अधिकार आहे. शाळेत किंवा वर्गात बसताना ती तो अधिकार गमावते असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. आपण लोकशाही व्यवस्थेत राहतो

आणि कायद्याच्या समानतेचे तत्व सर्वांना लागू होते. जे कायदे व नियम असतात ते राज्यघटनेशी सुसंगतच असले पाहिजेत. राज्यघटनेच्या अनेक पैलूंपैकी विश्वास हा एक महत्वाचा पैलू आहे. राज्यघटना हा विश्वासाचा दस्तावेज आहे. आणि हा विश्वास अल्पसंख्यक समाजाने बहुसंख्यक समाजावर व्यक्त केलेला आहे अशी निरीक्षणे न्यायमूर्ति धूलिया यांनी नोंदविली आहेत. केवळ हिजाब परिधान करण्यास बंदी घालण्यामुळे आपण मुलींना शिक्षणापासून वंचित तर ठेवणार नाही हा प्रश्न यासंदर्भात स्वतःला करावा लागेल. मुलींना सुशिक्षित करण्यास आणि त्यासाठी त्यांनी अधिकाधिक संख्येने शाळा व शिक्षणाच्या संधीचा लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असताना केवळ हिजाब परिधान करण्याचे कारण पुढे करुन तिला शिक्षणाची संधी नाकारायची काय हा प्रश्नही यासंदर्भात विचारात घ्यावा लागेल असे महत्वपूर्ण मतही त्यांनी नोंदविले आहे.

या निर्णयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयातील दोन न्यायमूर्तींमध्ये झालेल्या मतभिन्नतेमुळे या प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे. लोकशाही देशात व्यक्तिगत स्वातंत्र्य व अधिकारांना प्राधान्य की बहुसंख्यक सामूहिक इच्छाशक्तीपुढे अल्पसंख्याकांनी माघार घ्यायची असा वाद यातून उत्पन्न होऊ शकतो. जर हिजाबला धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली बंदी घातली जात असेल तर बहुसंख्यक समाजाच्या मुलांनी देखील त्यांच्या धार्मिक श्रध्दा व चालीरीती-प्रथांचे प्रकटीकरण करणे बंद केले पाहिजे. मग त्यामध्ये कपाळावर गंध लावण्याची बाब देखील समाविष्ट होते हे हिजाब-विरोधकांना लक्षात घ्यावे लागेल. गंध ही एक लहानशी बाब झाली. अनेक प्रसंग असे असतात की ज्यामध्ये व्यक्ती त्यांच्या समाजाच्या चालीरीती, प्रथा व परंपरांची चिन्हे व प्रतीके अंगावर बाळगत असतात. त्यामुळे धर्मनिरपेक्षतेचे राज्यघटनेत समाविष्ट तत्व पाळायचे ठरविल्यास ते किती अवघड जाईल किंवा जाऊ शकते याचा विचार करावा लागेल. फ्रान्समधील शाळांमध्ये शीख मुलांना फेटा घालण्यास बंदी करण्यात आली होती. त्याला साहजिकच शीख समाजाने जोरदार विरोध केला होता. भारत सरकारने राजनैतिक पातळीवरुन हा मुद्दा फ्रान्सबरोबर उपस्थित करुन या बंदीचा फेरविचार करण्याची विनंती केली होती. फ्रेंच वकिलातीने यावर खुलासा करताना फ्रान्समध्ये सर्व नागरिकांना कोणत्याही धर्माचे पालन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे आणि शीख समाजालाही ते स्वातंत्र्य प्राप्त आहे व त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी ते फेटा व शीख धर्माची अन्य धार्मिक चिन्हे बरोबर ठेवून वावरु शकतात असे सांगितले. परंतु शाळांमधील शीख विद्यार्थ्यांच्या संदर्भात त्यांनी ते अधिकार शाळा प्रमुखांना देऊन हा विषय संवेदनशीलतेने हाताळण्याच्या सूचना दिल्याकडे भारताचे लक्ष वेधले होते. हे उदाहरण देण्याचे कारण एवढेच की हा मुद्दा संवेदनशीलतेने हाताळण्याच्या सूचना फ्रेंच सरकारने दिल्या होत्या हे येथे लक्षात घ्यावे लागेल. भारतातही हिजाबची बाब संवेदनशीलतेने हाताळणे शक्य आहे. हिजाबमुळे शालेय शिक्षणात कोणत्या अडचणी किंवा अडथळे येतात ही अद्याप लक्षात आलेले नाही. कारण शाळेत गणवेष हा आवश्यक असला तरी अनेक मुले धार्मिक चिन्हे व प्रतीके धारण करुन शाळेत येत असतात. शीख मुले फेटा बांधून, हातात कडे घालून शाळेत येत असतात तेव्हा त्यांना कुणी बंदी करीत नाही किंवा धर्मनिरपेक्षतेचा मुद्दा पुढे करीत नाहीत. त्यामुळे हा दुटप्पीपणा कुठपर्यंत चालणार हे ठरविण्याची वेळ आली आहे. केवळ मुस्लिमांसाठी धर्मनिरपेक्षतेचे निकष लावण्याचे धंदे कितपत उचित आहेत ?



सरकार हे धर्मनिरपेक्ष असते हे न्यायमूर्ति गुप्ता यांनी

विशेष भर देऊन सांगितले आहे. त्याच मुद्याच्या संदर्भात सोमनाथ मंदिराच्या जीर्णोध्दाराची आठवण आल्याखेरीज रहात नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरदार वल्लभभाई पटेलांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोध्दाराचा प्रस्ताव मांडला. त्यावेळी महात्मा गांधी हयात होते. त्यांनी त्या प्रस्तावाला पाठिंबा दिला मात्र त्यासाठी सरकारचा पैसा वापरायचा नाही आणि धार्मिक समारंभात सहभागी होऊ नये अशी त्यांची शास्त्रशुध्द भूमिका होती. अर्थात राजेंद्र प्रसाद समारंभाला गेले. नेहरू धर्मनिरपेक्ष होते पण लोकशाहीवादीही होते. त्यामुळे विरोध असतानाही त्यांनी या समारंभाचे रेडिओवरुन थेट प्रक्षेपण होऊ दिले हे याठिकाणी मुद्दाम नमूद करावे लागेल. मुख्य म्हणजे त्यांनी एका तात्विक भूमिकेतून विरोध केला होता आणि प्रतिमताचा आदर केला होता. नूतनीकरणाचे काम सुरु असतानाच वल्लभभाईंचे निधन झाले होते. ते या प्रकल्पाची देखरेख करीत होते परंतु निधनानंतर त्यांची ती जबाबदारी मंत्रिमंडळातील सहकारी के.एम.मुन्शी यांच्याकडे त्यांनी दिली. हा नेहरूंचा



सोमनाथ मंदिराच्या नूतनीकरणाला राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद उपस्थित होते.



राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद सोमनाथाच्या मंदिरात सपत्निक पूजा करताना.


लोकांकडून देणग्या गोळा करुन त्या पैशातून मंदिराचे नूतनीकरण करावे असे पटेलांना सांगितले. पटेलांनीही त्यास मान्यता दिली. नेहरूंनीही मंदिराच्या नूतनीकरणासाठी सरकारी पैसे वापरण्याचे नाकारले. सरकार आणि धर्म या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. सरकार कोणत्याही धर्माशी बांधील नसते अशी त्यांची भूमिका होती. तसेच सोमनाथ मंदिराच्या नूतनीकरणासाठी सरकारने पैसे दिल्यास नंतर इतर धर्मीय देखील तशा आर्थिक मागण्या करु लागतील व त्याला शेवट राहणार नाही अशी व्यावहारिक भूमिका देखील त्यामागे होती. नेहरू हे सर्वार्थाने धर्मनिरपेक्ष होते. सोमनाथच्या उद्घाटनाला राष्ट्रपति राजेंद्र प्रसाद गेले होते. नेहरूंनी त्यास विरोध केला होता आणि सरकार किंवा राजसत्ता आणि धर्म हे परस्परांपासून स्वतंत्र व वेगळे असले पाहिजेत आणि म्हणूनच राजसत्तेच्या प्रतिनिधींनी अशा विरोधी मतांचा आदर करण्याचा उदारमतवाद हा लक्षणीय होता. हे उदाहरण अशासाठी की राजसत्ता म्हणजेच सरकार आणि धर्म या दोन स्वतंत्र व वेगळ्या बाबी असल्या पाहिजेत आणि सरकारने म्हणजेच राजसत्तेने कोणत्याही धार्मिक गोष्टीत सहभागी नसले पाहिजे ही धर्मनिरपेक्षतेची कसोटी मानली गेली

पाहिजे. न्यायमूर्ति गुप्ता यांनी त्याकडेच दिशानिर्देश केल्याचे त्यांच्या निर्णयावरुन लक्षात येते.

न्यायमूर्ति गुप्ता यांनी त्यांच्या निर्णयात दिलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या दाखल्याच्या आधारे काही समकालीन घटनांचा उल्लेखही करणे अपरिहार्य ठरते. राजसत्ता किंवा सरकार हे राज्यघटनेत समाविष्ट धर्मनिरपेक्ष तत्वाशी बांधील आहे आणि त्यामुळेच सरकारी मदतीने चालणाऱ्या शाळांमध्ये गणवेष कसा असला पाहिजे आणि त्यामध्ये कोणत्याही धार्मिक चिन्हे किंवा प्रतीके अथवा चालीरीतींचे प्रतिबिंब नसले पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे. न्यायमूर्तींच्या मताला कायद्याइतकेच वजन असते. म्हणूनच त्यांच्या या मताच्या संदर्भात सध्या आजुबाजुला काय घडते आहे याचा उल्लेख अत्यावश्यक ठरतो. अगदी ताजे उदाहरण. केदारनाथ, बद्रीनाथ अशा निसर्गरम्य तीर्थस्थळांना देशाच्या पंतप्रधानांनी भेटी दिल्या. त्या भेटी त्यांनी कोण म्हणून दिल्या ? ते पंतप्रधान आहेत म्हणजेच सरकारचे प्रमुख आहेत. त्यांनी अशी एखाद्या विशिष्ट धर्मस्थळांना गाजावाजा करीत भेटी देणे कोणत्या धर्मनिरपेक्षतेशी आणि राज्यघटनेशी सुसंगत आहे ? हे ताजे उदाहरण आहे. साक्षात राम मंदिराच्या भूमिपूजनच पंतप्रधानांनी केले होते. हे कोणत्या धर्मनिरपेक्षतेत समाविष्ट होते हे जर न्यायालयाने आम्हा सामान्यजनांना समजावून सांगितल्यास बरे होईल. एवढेच नाही तर दिवसेंदिवस निगरगट्टपणा असा वाढत चालला आहे की बहुसंख्यक मते पदरात टाकण्यासाठी निवडणुकीच्या वेळेसच मुद्दाम देवदर्शनाचा मोहिम सुरु केली जाते आणि आपण किती भाविक व सश्रध्द आहोत हे बहुसंख्यक मनावर ठसविले जाते. हे सर्व विधिनिषेधशून्यपणे चालू असताना आमची सन्माननीय न्यायालये किंवा निवडणूक आयोग काय करीत असतात असा आम्हा सामान्यजनांना प्रश्न पडतो. एकीकडे अल्पसंख्यक समाजाने भेटीदाखल दिलेली टोपी नाकारली जाते व दुसरीकडे बिनदिक्कतपणे धर्माच्या आधारे राजकारण केले जात असताना न्यायालयांना ते काही दिसत नाही काय असे वाटायला लागते. उत्तर प्रदेशात विशिष्ट धर्मीयांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असताना त्या एकांगी कारवाया खपवून घेतल्या जातात. कोणत्याही सरकारी यंत्रणा त्या कारवाया रोखत नाहीत. राजसत्ता ही उघडपणे आणि कोणतीही लज्जा आणि शरम न बाळगता विशिष्ट अशा धर्मीयांना व प्रामुख्याने बहुसंख्यक समाजाला झुकते माप देऊन अन्य धर्मीयांना भेदभावाची वागणूक देत असेल तर राज्यघटनेत समाविष्ट आणि न्यायमूर्ति गुप्ता यांनी उल्लेख केलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाच्या आणि ते तत्व राज्यघटनेत समाविष्ट असल्याने राज्यघटनेच्या विरोधातील आहे हे स्पष्ट आहे.



केदारनाथ मंदिरात नरेंद्र मोदी पूजा करताना.



अशा झाकोळलेल्या परिस्थितीतच सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक निर्णय दिला आहे. 'हेट स्पीच' म्हणजेच विशिष्ट धर्मीयांच्या विरोधात तिरस्कार व घृणा पसरविणारी भाषणे

देण्याचे प्रकार. तुम्हाला आठवतच असेल की भाजपचे दिल्लीचे एक खासदार प्रवेश वर्मा यांनी मुस्लिम समाजावर बहिष्कार करण्याचे आवाहन एका जाहीर सभेत केले होते. ही अलीकडचीच घटना आहे. उत्तर प्रदेशात तर लाजलज्जा न बाळगता आणि राजसत्तेचा वरदहस्त प्राप्त असल्यासारखे प्रकार सुरु बिनदिक्कतपणे सुरु आहेत. कोणतीही कायदेशीर कारवाई न करता एखाद्या मुस्लिम संशयिताच्या घरांवर बुलडोझर चालवून ती नष्ट करण्याचे मोकाट प्रकार सुरु आहेत. हे प्रकार देशभरात सर्वत्र सुरु आहेत. विश्व हिंदू परिषदेतर्फे नुकत्याच झालेल्या विराट हिंदू संमेलनातही मुस्लिमद्वेष व तिरस्कार जाहीरपणे प्रकट करण्यात आला होता. त्यासंदर्भात कोझीकोडचे निवासी शहीन अब्दुल्ला यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागणारी




उत्तर प्रदेशात मुस्लिमांच्या घरांवर योगी बुलडोझर फिरवित आहेत.

याचिका सादर केली व त्यावर मतप्रदर्शन करताना सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अशा तिरस्कार पसरविणाऱ्या भाषणांविरुध्द पोलिसांनी व कायदा-सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणांनी तक्रार दाखल होण्याची वाट न पाहता तत्काळ स्वतःहोऊन कारवाई केली पाहिजे असा निर्णय दिला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास न्यायालयाची अवमानना केल्याबद्दलच्या कारवाईस तोंड देण्याची तयारी ठेवा असेही न्यायालयाने बजावलेले आहे. आता प्रतीक्षा आहे ती प्रत्यक्ष कारवाई केली जाते की नाही हे पाहण्याची !

यासंदर्भात न्यायालयाने दिल्लीचे पोलिस आयुक्त, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या दोन राज्यांचे पोलिस महासंचालक यांना नोटिसाही पाठविल्या आहेत. न्यायालयाच्या निर्णयानुसार ते यासंदर्भात कोणती कारवाई किंवा न्यायालयीने निर्देशावर अंमलबजावणी करतात याबाबतचा अहवालही न्यायालयास सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. न्यायमूर्तींनी राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचा(प्रिअँबल) संदर्भही दिला आहे आणि त्यामध्ये समाविष्ट धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाशी बांधिलकी ही अपरिहार्य आहे असे म्हटले आहे.

समाजाचे सौहार्द व सलोखा बिघडविणारी भाषणे करणाऱ्यांविरुध्द कारवाईची शिफारस करणारा न्यायालयाचा आदेश स्वागतार्ह आहे. परंतु १९२३-२४ मध्ये एका ब्रिटिश न्यायाधीशांनी(लॉर्ड हेवर्ट) दिलेल्या निर्णयातील एका वाक्याचा संदर्भ आजही दिला जातो त्याची आठवण येथे येणे अपरिहार्य आहे. "..................दॅट जस्टिस शुड नॉट ओन्ली बी डन , बट शुड मॅनिफेस्टली अँड अनडाऊटेडली बी सीन टु बी डन !" याचा अर्थ हा असा की केवळ न्याय देणे किंवा करणे पुरेसे नाही तर तो निःसंशयपणे केल्याचे प्रत्यक्षात दिसणे आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास निव्वळ न्याय करणे पुरेसे नाही तर त्याची अंमलबजावणीही तेवढीच महत्वाची आहे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने 'हेट स्पीच'

किंवा 'तिरस्कार पसरविणाऱ्या भाषणां'बद्दल दिलेला निर्णय स्वागतार्ह असला तरी जोपर्यंत त्याची अंमलबजावणी होताना प्रत्यक्षात दिसत नाही तोपर्यंत तो आदेश निरर्थक मानावा लागेल. आदेश अंमलबजावणीची यंत्रणा न्यायालयाकडे नसली तरी राजसत्तेला म्हणजेच त्यांनी उल्लेख केलेल्या सरकारांना व पोलिस यंत्रणांना त्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल आणि ते ती करतील एवढीच अपेक्षा तूर्तास केली जाऊ शकते.

न्यायालयाची भावना आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यातील विसंगती स्पष्ट आहे. दुर्दैवाने असे राज्यकर्ते सत्तेत आहेत की त्यांनी केवळ आक्रमक व एकांगी बहुसंख्यकवादाचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या दृष्टीने अन्य अल्पसंख्यक हे देशाचे दुय्यम नागरिक आहेत किंवा त्यांनी बहुसंख्यक समाजाच्या तालावर नाचले पाहिजे. अल्पसंख्याकांना व विशेषतः मुस्लिमांच्या विरोधात तिरस्काराची मोहिम चालविताना त्यांच्यातील बहुपत्नीत्वाच्या प्रथेचा संदर्भ दिला जातो आणि एक नवरा व चार बायका मिळून त्यांना होणाऱ्या पाचजणांची पंचवीस मुलांचाही अतिशयोक्त व हेटाळणीचा उल्लेख केला जातो. सध्याचे पंतप्रधान गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मुस्लिमांची हेटाळणी करताना 'हम पांच हमारे पच्चीस'अशी घोषणाच देऊन बहुसंख्यक समाजाला भडकविले होते. गुजरात दंग्यांनंतर मुस्लिमांना संरक्षण व निवारण छावण्या देण्याबद्दल विचारणा झाली असता, 'मुले पैदा करणारी केंद्रे स्थापन करायची आहेत काय?' असे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगितले जाते. अल्पसंख्यक समाजाबद्दल एवढा तिरस्कार व घृणा ठासून भरलेले राज्यकर्ते देशात असतील तर न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी कितपत होईल याबद्दल सामान्यजनांच्या मनात शंका निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेतील धर्मनिरपेक्षता तत्वाचा संदर्भ देणे सहज सोपे आहे. परंतु राज्ययंत्रणा आणि राज्यकर्तेच त्या तत्वाला हरताळ फासणारे असतील तर न्याय होणार कसा ? देशाचे पंतप्रधान उघडपणे कोणताही मुलाहिजा न ठेवता बिनदिक्कतपणे बहुसंख्यक धर्म पुरस्काराचे प्रकार करीत असतील तर न्यायालयांनी व्यक्त केलेली मते, त्यामागील भावना केवळ निरर्थक, अर्थहीन मानाव्या लागतील. न्यायालयांनी राज्यघटनेशी बांधिलकी व्यक्त करतानाच त्या राज्यघटनेची शब्दशः आणि त्यामध्ये अपेक्षित उद्दिष्टांच्या आधारे अंमलबजावणी करण्यावरही भर दिल्यास कायद्याचे अधिराज्य अवतरले असे म्हटता येईल.


गुजरातमधील गोध्रा हत्याकांड

अन्यथा 'कृतिविण वाचा व्यर्थ आहे' किंवा 'शब्द बापुडे केवळ वारा' असे न्यायालयीन निर्णयांबद्दल म्हणावे लागेल. सामान्यजनांच्या मनाचा हा उडालेला गोंधळ दूर करुन त्यांना सुयोग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी न्यायालयांनी पार पाडण्याची वेळ आली आहे. हिजाब सारखे प्रकरणही अधिक संवेदनशीलतेने हाताळणे अपेक्षित आहे. शाळेतल्या गणवेषापेक्षा मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करणे अधिक महत्वाचे व प्राधान्याचे आहे. हिजाबमुळे राष्ट्रीय सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होतो असे कुणीच म्हणू शकणार नाही. त्यामुळे विशिष्ट धर्मीयांनी शाळेत हिजाब परिधान केल्याने फार मोठा सामाजिक असमतोल तयार होतो असे म्हणणेही अतार्किक, तर्कदुष्ट आहे. शाळांमध्ये गणवेष एकसारखा असला पाहिजे असे तत्व मान्य करताना देखील व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या मुद्याकडेही दुर्लक्ष करुन चालणार नाही आणि म्हणून ही क्षुल्लक बाब संबंधितांच्या सद्सद्विवेकेबुद्धीवर सोडणे अधिक श्रेयस्कर ठरु शकेल.

■■

# पर्व आर्थिक अनिश्चिततेचे, सत्तेच्या बेलगाम केंद्रीकरणाचे

**अभय टिळक**

रशियाचे स्वामी असणाऱ्या पुतीन यांची चालू कॅलेंडर वर्षातील फेब्रुवारी महिन्यापासून अव्याहत चालू असलेली अरेरावी आणि दादागिरी, चीनमध्ये शि झिनपिंग यांच्या हाती पुन्हा नव्याने एकवटलेली सर्वोच्च सत्तासूत्रे, ऋषी सुनक यांच्या खांद्यावर चढलेली ब्रिटनच्या पंतप्रधानकीची वस्त्रे, जॉर्जिया मेलोनी यांच्या हाती आलेली इटलीची सत्ता, स्वीडन आणि फ्रान्समध्ये कडव्या राजकीय विचारसरणीला लाभत असलेला वाढता पाठिंबा आणि आता ब्राझीलमध्ये डाव्या विचारसरणीचा पाठपुरावा करणाऱ्या लुला यांना मिळालेला निसटता विजय...या सगळ्या घटना वरकरणी निरनिराळ्या दिसत असल्या तरी या सगळ्यांत एक समान सूत्र नांदताना दिसते. 'कोविड-१९'च्या दणक्यापायी खिळखिळे झालेले वैश्विक अर्थकारण, त्यांतून उद्भवलेली महागाई आणि बेरोजगारी, त्यांपायी अधिकाधिक अस्वस्थ बनत चाललेले देशोदेशींचे अर्थकारण, त्या अस्वस्थतेचे समाजकारणात उमटणारे पडसाद, या गुंतागुंतीला खंबीरपणे तोंड देण्यासंदर्भात हतबल ठरत राहणारी धोरणदृष्टी, धोरणदृष्टीच्या अभावापायी चिघळत जाणारे आर्थिक-सामाजिक वास्तव आणि या सगळ्यांपायी निव्वळ तात्कालिक प्रश्नांवर जुजबी मलमपट्टी करण्यात गुंगून जात रोकड्या वास्तविक प्रश्नांना धार्मिक-भावनिक पेहराव चढवत त्या आधारे सत्तेची पोळी शेकत राहण्यात दिवस ढकलणारे राजकीय नेतृत्व या अवघ्या कार्यकारणपरंपरेचे समान सूत्र वैश्विक स्तरावर आज सर्वत्र बळजोरपणे गुंफले जाते आहे. एखाद्या कोळीष्टकाप्रमाणे






माजलेल्या या जाळ्यापायी वैश्विक समाजाचे घटक असणारे आपण सर्वच जण आजमितीस अनिश्चिततेच्या भयाण सावटाखालून वाटचाल करतो आहोत. तात्कालीक तडजोडींवर निर्भर राहणारे आणि निखळ भावनिकतेवर पोसले जाणारे राजकारण आणि काही बलवान राजकीय नेते व विचारसरणी यांच्या हाती अनिर्बंधपणे होत राहणारे राजकीय सत्तेचे केंद्रीकरण ही या अनिश्चिततेची दोन मुख्य अपत्ये होत. हीच दोन बाळे आज जागतिक पटलावर धुमाकूळ घालत आहेत. आणि, या सगळ्या खेळाकडे हतबल होऊन बघत बसण्याखेरीज सर्वसामान्य मनुष्याच्या हातात आजमितीस तरी काहीच नाही.

आजघडीला देशोदेशी घडते आहे ते नेमके हेच. पुतिन यांनी २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेनवर केलेल्या आततायी चढाईपायी जगभरातील अन्न व ऊर्जासाखळी पूर्णत: विस्कळीत बनलेली आहे. अन्नधान्यजिनसा आणि इंधन यांची आज भडकलेली सार्वत्रिक महागाई हे त्या विस्कळीतपणाचे फलित होय. परिणामी, अन्नधान्ये आणि खनिज तेल व तेलजन्य पदार्थांच्या आयातीवरच ज्यांची अन्नधान्य व ऊर्जासुरक्षा पूर्णतया निर्भर आहे असे जगभरातील अनेक देश आज तुटवडा आणि महागाईने पार गांजून गेलेले आहेत. २०२० आणि २०२१ ही दोन वर्षे 'कोविड-१९'च्या पकडीत सापडून मेटाकुटीला आलेली जागतिक अर्थव्यवस्था महागाई, इंधनपुरवठ्याची विस्कळीत बनलेली साखळी, रशिया व युक्रेन यांच्यादरम्यानच्या युद्धापायी सर्वत्रच पसरलेली अस्थिरता, वाढते व्याजदर अशा विविध घटकांपायी पुन्हा एकवार मंदीच्या जबड्यात ढकलली जाते किंवा कसे, अशी भयशंका आज सर्वत्र मूळ धरते आहे. तसे दुर्दैवाने खरोखरच झाले तर, 'दुष्काळात तेरावा महिना' या न्यायाने गेल्या दोन वर्षांपासून जगाच्या सर्वच भागांत रुजलेली बेरोजगारी आणि अर्ध-बेरोजगारी अधिकच गहिरी बनून नाना प्रकारचे सामाजिक प्रश्न व समस्या अक्राळविक्राळ रूप धारण करतील, ही धास्ती आता बळकट बनते आहे.

या सगळ्यांत भयानक कोंडी संभवते ती युरोपची. हाडे गोठवून टाकणारा हिवाळा आता केवळ उंबरठ्यावर नव्हे तर पार तोंडावर येऊन ठेपलेला आहे. अशा परिस्थितीत, तेलाचे भडकलेले बाजारभाव युरोपीय देशांच्या मुळावरच उठतील. कारण, हिवाळ्यामध्ये टिकून राहण्यासाठी आवश्यक असणारा उबारा पुरवणारे तेलच आटोक्याच्या बाहेर महाग झाले तर कुडकुडण्यापलीकडे त्या देशांच्या हाती फारसे काही उरतच नाही. रशिया आणि रशियाची सत्ता मुठीत बळकवलेले पुतिन त्याचीच वाट जणू बघत आहेत. सौदी राजपुत्राबरोबर पुतिन यांनी अलीकडील काळात सघन-सखोल बनवलेले मैत्रीसंबंध या संदर्भात अतिशय बोलके आहेत. एकंदरच युरोप आणि खासकरून अमेरिकेबाबत मुस्लिमधर्मी आखाती देशांमध्ये व्यापक असंतोष व राग आहेच. जागतिक स्तरावर आखाती देशांच्या बरोबरीनेच व्हेनेझुएला आणि रशिया हे खनिज तेलाचे अन्य दोन पर्यायी तगडे पुरवठादार देश होत. सध्या व्हेनेझुएलाला पडला आहे अंतर्गत समस्यांचा गहन विळखा. तर, वैश्विक स्तरावर युक्रेनवरील हल्ल्यांपायी निर्माण झालेला खनिज तेलाच्या मागणी व पुरवठ्यातील असमतोल पथ्यावर पडलेल्या रशियाने तेलाच्या तापविलेल्या किमतींपायी युरोपीय देश आणि अमेरिका हडबडून जावी हे स्वाभाविकच ठरते. एकंदरीने, पाश्चिमात्य राष्ट्रांनी युक्रेनची उचललेली तळी चांगलीच झोंबलेला रशिया आखाती देशांशी संगनमत करून ऐन थंडीच्या मोसमात तेलाचे बाजारभाव कडक राखत युरोप-अमेरिकेला दातखीळ बसवणार असा

होरा या क्षेत्रातील जाणकार आज वर्तवत आहेत. हा कयास व्यवहारात खरा ठरलाच तर उभ्या विश्वाचा राजकीय सारीपाट उद्या नेमका कसा दिसेल याबाबत कोणतेही आडाखे बांधता येणे आज केवळ अशक्यच होय. राजकीय स्तरावरील या जीवघेण्या हाराकिरीमध्ये सरसहा आणि सर्रास बळी जातो आहे तो जागतिक अर्थकारणाचा. मात्र, आजघडीला त्याची ना कोणाला आहे किंचितही फिकीर ना कोणी आहे त्याबद्दल सचिंत.

आर्थिक आघाडीवरील वाढत्या कोंडींचे भीषण असे पडसाद सामाजिक जीवनामध्ये उमटू लागले की सर्वसामान्य नागरिकांचा राजकीय नेतृत्वाच्या क्षमतेवरील विश्वास क्रमाक्रमाने डळमळू लागतो. या प्रक्रियेचे दोन परिणाम संभवतात. एक म्हणजे, तात्पुरत्या राजकीय समीकरणांना उठावा मिळतो. लिझ ट्रस यांच्याकडून ऋषी सुनक यांच्याकडे ब्रिटनमध्ये साकारलेले सत्तेचे हस्तांतरण हा बव्हंशी याच प्रक्रियेचा परिपाक म्हणावा लागतो. मुळात, बिनबुडाच्या वांशिक अहंमन्यतेपायी युरोपीय समुदायाबरोबर काडीमोड घेण्याचा ब्रिटिश सत्ताधीशांचा तत्कालीन निर्णय आर्थिक आघाडीवर ब्रिटनला चांगलाच महाग शाबीत होतो आहे. त्यांतच आजमितीच्या जागतिक महागाईने सर्वसामान्य ब्रिटिश नागरिक पार जेरीस आलेला आहे. विशेषत:, अन्नधान्याच्या दरवाढीपायी ब्रिटनमधील अनेकांवर आहारात मूलभूत बदल करण्याबरोबरच प्रसंगी एक वेळ जेवून दिवस ढकलण्याचा अनवस्था प्रसंग आज ओढवलेला आहे. त्यांतच, आर्थिक ओढगस्तीपायी सरकारच्या माथ्यावरील कर्जाचा बोजा आणि तिजोरीतील तुटीचा खड्डाही वाढलेला आहे. महागाईने गांजलेल्या ब्रिटिश जनतेला चुचकारण्यासाठी लिझ ट्रस यांनी ऐलान केले आयकरात कपात घडवून आणण्याचे. परंतु, त्यांपायी अधिक खोल जाणारा तुटीचा खड्डा कसा भरून काढायचा हा जुळा प्रश्न दत्त म्हणून पुढ्यात उभा ठाकला आणि त्यांची सत्ता गेली. खासगी कॉर्पोरेट विश्वात कमालीचे यशस्वी ठरलेले सुनक त्यांची तेथील कल्पकता शासनसंस्थेच्या व्यवस्थापनातदेखील दाखवतील अशी उमेद मनाशी बाळगून ब्रिटिश जनमानसाने त्यांना कौल दिला खरा. परंतु, 'महागाई–बेरोजगारी–वाढता शासकीय खर्च–फुगणारी तूट' हे समस्या चतुष्टय सुनक कसे हाताळतील त्यांवर बरेच काही अवलंबून राहील. त्याला कारणही तसेच आहे. स्वत:चा खासगी धंदा स्वमर्जीने चालवणे आणि सरकार चालवणे या दोहोंत जमीन–अस्मानाचा फरक आहे. अर्थकारणातील मरगळीला करकपातीद्वारे चालना देण्याची व्यूहरचना व्यवहारात हुकुमी यशस्वी ठरतेच याचे दाखले फार कमी व अपवादानेच आजवर दिसत आलेले आहेत. करकपातीद्वारे लोकांच्या क्रयशक्तीमध्ये भर घडवून आणत बाजारपेठीय मागणीच्या उठावदार टेकूच्या आधारे अर्थकारणाचे कुंठित चक्र गतिमान बनवण्यापेक्षा सरकारी खर्चावर अंकुश आणत वित्तीय तुटीला पायबंद घालून अर्थकारण सावरण्याचा पर्याय अधिक व्यवहार्य ठरतो, याचे पुरेसे दाखले आजवर मिळत आलेले आहेत. परंतु, अर्थकारणाचा तोल सावरण्याचा हा पर्याय ब्रिटनसह अनेक युरोपीय देशांना परवडणारा नाही. कारण, युरोपातील अनेक देशांत सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य, ऊर्जा, शिक्षण, रोजगार, विमा यांसारख्या बाबींसंदर्भात शासकीय सुरक्षेचे आजवर लाभत आलेले भरभक्कम कवच शासनसंस्था पुरवत असलेल्या भरघोस आर्थिक पाठबळाद्वारेच तर साकारलेले आहे. अशा परिस्थितीत, शासकीय खर्चाबाबत एकाएकी हात आखडता घेणे हे कोणत्याही पक्षाच्या सरकारला जमणारे नाही. त्यांतही पुन्हा सुनक पडले ब्रिटनमधील सरंजामशाही वृत्तीची बैठक लाभलेल्या उमराव पक्षाचे खासदार. त्यांमुळे, सुनक यांनी पेहेरलेला राजपट त्यांना







व्यवहारात कितपत सुकर शाबीत होतो हे सांगणे दुष्करच होय. त्यांमुळे, ब्रिटनमधील अनेक राजकीय निरीक्षक व अभ्यासक सुनक यांच्या पंतप्रधानपदावरील अभिषेक हा तात्पुरती तडजोड म्हणूनच लेखताना दिसतात.

उत्तरोत्तर क्लिष्ट बनत जाणाऱ्या आर्थिक-सामाजिक समस्यांची राजकीय संदर्भातील दुसरी संभाव्य परिणती साकारते ती पूर्वगौरववादी, सांस्कृतिक तसेच आर्थिक राष्ट्रवादी भावभावनांचा परिपोष करणाऱ्या आणि सर्व प्रकारच्या सत्तेचे केंद्रीकरण घडवून आणण्यास उपकारक ठरणाऱ्या मानसिकतेला फुंकर घालत सत्तासंपादनाकडे आगेकूच करणाऱ्या राजकीय नेतृत्वाला वाढता पाठिंबा मिळत राहण्यात. इटलीच्या जॉर्जिया मेलोनी, फ्रान्समधील इमॅन्युएल मॅक्रॉन, रशियाचे पुतिन आणि चिनी सर्वेसर्वा शि जिनपिंग यांचा विस्तारणारा राजकीय पाया हे त्याच वास्तवाचे द्योतक ठरतात. रशियाला आव्हान द्यायचे आहे ते नाटोची पाठराखण करणाऱ्या युरोपीय भूमिकेला. तर, शि जिनपिंग यांना संपुष्टात आणायची आहे अमेरिकेची जागतिक प्रभुत्वसत्ता. तर, जागतिकीकरणाद्वारे गेल्या तीन दशकांदरम्यान वैश्विक स्तरावर वाढलेल्या वांशिक सरमिसळीमुळे बिचकलेल्या ब्रिटन, फ्रान्स, इटली यांसारख्या देशांचा सुप्तासुप्त विरोध आहे तो बहुसांस्कृतिकतेच्या जागतिक प्रवाहांना. या ना त्या कारणांपायी जगाच्या विविध भागांत अलीकडील काही वर्षांत उजव्या राजकीय विचारप्रणालीचा पाठपुरावा करणाऱ्या पक्षप्रवृत्तींना वाढते पाठबळ मिळण्यामागील सामाजिक मानसिकता याच सगळ्या विचारविश्वाद्वारे धुमारते आहे. आता, ब्राझीलमध्ये लुला यांच्या डाव्या राजकीय विचारसरणीच्या पारड्यात तेथील नागरिकांनी त्यांचा कौल टाकलेला असला तरी मतांच्या टक्केवारीचा विचार करता तो फारच निसटता म्हणावा लागतो. एकूणांतील ५०.९ टक्के जनमानसाने लुला यांना पसंती दाखवलेली असली तरी, ज्या उजव्या राजकीय विचारसरणीचा पाडाव लुला यांनी केला त्यांच्या पारड्यात कौल टाकणाऱ्यांचे एकूणांतील प्रमाण ४९.१ टक्के इतके होते, हे वास्तव नीट न्याहाळेल तर लुला यांच्या सरशीचे निसटते रंगरूप मनावर पक्के बिंबते.

अशा राजकीय परिस्थितीमधून जे अर्थ-राजकीय धोरण निर्माण होते त्याला एक तर दीर्घकालीन परिमाण नसते किंवा त्याला काही एक ठोस अशी निश्चित दिशाही राहत नाही. पुढ्यात उभ्या ठाकलेल्या आर्थिक प्रश्नाला त्या त्या वेळी सोयीच्या ठरणाऱ्या राजकीय भूमिकेच्या चौकटीत उत्तर शोधले जाते किंवा काही तरी थातुरमातूर पर्याय तरी शोधला जातो. या दोन्ही बाबी दीर्घकालीन आर्थिक हिताच्या लेखी तोकड्याच केवळ नव्हे तर प्रसंगी घातकही ठरतात. त्यांतून एक प्रकारची धोरणात्मक दिशाहीनता मग नांदत राहते. चहूंकडून आव्हानात्मक ठरत असणाऱ्या आर्थिक वास्तवाच्या चौकटीत कोणत्याही राजकीय व्यवस्थेला जे अपरिहार्य कठोर निर्णय घेणे भाग पडते त्यांतूनही लोकव्यवहारात अनेक स्तरांवर नाना प्रकारचे पडसाद उमटत राहतात. परिणामी, आधीच टोकदार बनलेले जटिल असे आर्थिक प्रश्न अधिकच दुर्धर स्वरूप धारण करू लागतात. आजघडीला जागतिक अर्थकारणात घडते आहे ते नेमके हेच. 'कोविड-१९'पायी भोगाव्या लागलेल्या यातना, त्यांतून जागतिक स्तरावर निर्माण झालेली एकंदरच अस्थिरता, कडव्या सांस्कृतिक तसेच आर्थिक राष्ट्रवादाच्या लहरींपायी वैश्विक स्तरावरील मुक्त व्यापाराला बसत असलेली खीळ अशा सगळ्या कडबोळ्यामुळे अन्नधान्ये तसेच इंधनाच्या तुटवड्यातून उद्भवलेल्या महागाईस पायबंद घालणे सगळ्यांच शासनसंस्थांना आताशा अवघड बनत असल्याचे आपण बघतो आहोत. गहू, सूर्यफूल, जवस, मका यांसारख्या खाद्यान्न जिनसांच्या उत्पादनात तसेच पुरवठ्यात रशियन महासंघ आणि युक्रेन हे दोघेही अग्रगण्य असलेले भूभाग युद्धात गुंतल्याने नजीकच्या भविष्यात या अन्नघटकांची दरवाढ सोसण्याविना पर्यायच नाही. त्यांतच भरीस भर म्हणून की काय, पर्यावरणीय

बदलांचे चटके वाढत्या प्रमाणात वेगवेगळ्या देशांना बसू लागलेले आहेत. ब्रिटनसह एकूणच युरोपात यंदा आलेल्या उष्णतेच्या लाटा, त्यांपायी भडकलेले वणवे, पावसाचे सरासरीने बदलत असलेले चक्र, अतिवृष्टी अथवा अवृष्टी यांचे सघन बनत चाललेले रूप या सगळ्यांपायी जागतिक समुदायाची अन्नसुरक्षा येत्या काळात कमकुवत ठरत राहील. दुसरीकडे, रशिया व युक्रेन यांच्यादरम्यान पेटलेल्या संघर्षापायी उद्भवलेली इंधनांची महागाई अन्नधान्यांच्या दरवाढीस इंधनपुरवठा करत राहील. यांद्वारे जाचक ठरणाऱ्या सर्वसाधारण महागाईस परिणामकारक आळा घालण्यासाठी देशोदेशींच्या शासनसंस्थांना उचलाव्या लागणाऱ्या कठोर पावलांपायी अर्थविषयक साद-पडसादांचे नवीनच चक्र गतिमान बनेल.


या संभाव्यतेचे कवडसे आजच आर्थिक आघाड्यांवर दृश्यमान होत आहेत. महागाईस आळा घालण्यासाठी कठोर अशा पैसाधोरणाचा अवलंब करण्याखेरीज आता गत्यंतरच उरलेले नाही. परिणामी, देशोदेशींच्या मध्यवर्ती बँका उदार पैसाधोरणाकडे पाठ फिरवत आहेत. साहजिकच, भांडवल बाजारात व्याजाच्या दरांची सरासरी पातळी आता चढती कमान दाखवत आहे. अमेरिकी फेडरल रिझर्व्हपासून ते भारतीय रिझर्व्ह बँकेपर्यंत या घटनाक्रमाला आज कोणीही अपवाद नाही. कोविड-१९ने सलग दोन वर्षे दिलेल्या दणक्यांपायी गलितगात्र झालेल्या अर्थव्यवस्थांमध्ये नव्याने प्रवर्तित झालेल्या गुंतवणुकींद्वारे काही एक जान फुंकली जाण्याच्या शक्यता व्याजदरांच्या चढत्या भाजणीमुळे पार कुंठित बनलेल्या दिसतात. साहजिकच, देशोदेशींच्या बेरोजगारीवर कोणताही ठोस उपाय लागू होण्याच्या खुणा आज कोठेच दिसत नाहीत. खुरटलेला आर्थिक विकास, महागाई आणि बेरोजगारी या तिहेरी चाकात अनेक देशांतील अनेक समाजघटक आज पिळवटून निघत आहेत. देशी गुंतवणूक नाही तर नाही, निदान परकीय गुंतवणूक तरी मदतीला येईल ही अनेक विकसनशील देशांना वाटणारी संभाव्यता अमेरिकी फेडरल रिझर्व्हने अवलंबलेल्या कठोर पैसाधोरणापायी वासलात निघते आहे. एक तर, अमेरिकी भांडवल बाजारात व्याजाचे सरासरी दर चढे बनू लागल्यानंतर अनेक अमेरिकी कंपन्यांनी तसेच म्युच्युअल फंडांनी काही विकसनशील देशांच्या भांडवली बाजारपेठांमध्ये 'पार्क' करून ठेवलेल्या गुंतवणुकी तिथून मोकळ्या करून अमेरिकी भांडवल बाजाराकडे त्यांचे तोंड वळवण्याचा सपाटा लावला. साहजिकच, त्या त्या देशांच्या चलनाच्या तुलनेत अमेरिकी डॉलरचे विनिमय मूल्य वधारले. त्याचा दुहेरी फटका बसतो आहे तो चलने कमकुवत बसलेल्या अर्थव्यवस्थांना. भारतीय अर्थव्यवस्थाही त्याला अजिबातच अपवाद नाही.

मूल्यऱ्हास घडून येत असलेल्या देशी चलनाचे दुहेरी फटके त्या त्या देशांच्या अर्थव्यवस्थांना बसू लागतात. आज आपण अनुभवतो आहे ते नेमके हेच. एक तर, जवळपास सगळ्यांच पश्चिमी बाजारपेठांतील मागणी वाढत्या आर्थिक अनिश्चिततेपायी नांगी टाकून बसलेली आहे. त्यामुळे, डॉलरच्या तुलनेत विनिमय मूल्य घसरूनही संबंधित देशांना निर्यातीद्वारे त्या मूल्यऱ्हासाचा लाभ उठवणे सध्या तरी शक्यच नाही. दुसरीकडे, जे देश अनिवार्य अशा आयातीवर अवलंबून आहेत त्यांना वधारलेल्या डॉलरपायी आयातीचे वाढीव मूल्य चुकते करणे भाग पडत असल्याने त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावर तुटीचे भगदाड पडत राहून ते रुंदावते आहे. देशांतर्गत महागाई, वाढती वित्तीय तूट, मलूल होऊन पडलेली मागणी, चिवट बेरोजगारी अशा कोंडीमध्ये घुसमटणाऱ्या अर्थव्यवस्थांकडे मग परकीय थेट भांडवली गुंतवणूकही पाठच फिरवते.



याच सगळ्या वास्तवाचे चटके भारतीय अर्थव्यवस्थेलाही सध्या बसत आहेत. इंधने आणि त्यांपायी भाजीपाल्यासारखे रोजच्या जीवनातील अन्नघटक यांची महागाई आपण अनुभवतो आहोतच. महागाईला लगाम घालण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेनेही कठोर पैसाधोरणाचा अवलंब केलेला आहे. परिणामी, व्याजदरांची सरासरी पातळी चढता क्रम दाखवते आहे. दुसरीकडे, अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीची चाके अडखळू नयेत म्हणून व्याजदर सुसह्य राखण्याबाबत रिझर्व्ह बँकेचा दट्ट्या बँकांवर आहेच. आता, ग्राहकांना कर्जे स्वस्त व आकर्षक दराने वाटायची तर ठेवीदारांच्या ठेवींवरील व्याजाचे दर नरम राखणे बँकांना अपरिहार्यच ठरते. जर ठेवींवर आकर्षक व्याज मिळणार नसेल तर बचतदार त्यांची पुंजी बँकांमध्ये का ठेवतील? परिणामी, बँकांना ठेवींची चणचण भासून उद्या त्यांच्या कर्जनिर्मिती क्षमतेवरही

आच आली तर मोठाच बांका प्रसंग ओढवेल. 'कोविड-१९'च्या फेऱ्यापासून ठाण मांडून बसलेली बेरोजगारी भारतीय अर्थव्यवस्थेत बळजोर बनतेच आहे. नोकऱ्यांची शाश्वती नाही, महागाई चटके देते आहे आणि नवीन रोजगार वेगाने निर्माण होण्याच्या दिशा काळवंडलेल्याच दिसतात, अशा तिहेरी कचाट्यात देशातील होतकरू तरूणाई आजमितीस आहे. परिणामी, सामाजिक अस्वस्थताही दाटणे स्वाभाविक ठरते. या सगळ्या पेचावर परिणामकारक तोडगा शोधून काढण्यासाठी देशभरातील विविध संस्था, संशोधन व्यासपीठे, तज्ज्ञ सल्लागार व सल्लासेवा माध्यमे, राज्यस्तरावरील नेतृत्व अशा विविध घटकांशी व्यापक चर्चाविनिमय करून सुसूत्रमय अशी कालनिश्चित धोरणदिशा अंगीकारण्याबाबत केंद्रातील सत्ताधीशांपाशी पूर्णत: प्रगाढ अनास्थाच दिसते. भरभक्कम वित्तीय तूट, घसरता रुपया, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू




खात्यावरील फुगणारी तूट, डॉलरच्या तुलनेत रुपयाचे विनिमय मूल्य टिकवून धरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने परकीय चलनाच्या साठ्याचे बटवे खुले केल्यामुळे अलिकडील काळात परकीय चलनाच्या साठ्यात घडून आलेली घट, मरगळलेली गुंतवणूक या सगळ्या चिवट आणि जटिल आव्हानांचा मुकाबला करण्याऐवजी धर्मक्षेत्रांमध्ये चकचकीत 'कॉरिडॉर' निर्माण करण्यात देशातील सर्वोच्च नेतृत्व मशगुल आहे.

चिनी अर्थव्यवस्थेच्या वाढविकासाचा दर अलिकडील काळात खचलेला असल्यामुळे वैश्विक स्तरावरील ती पोकळी भारतीय अर्थव्यवस्था भरून काढेल अशा प्रकारचे एक झगमगीत दिवास्वप्न रंगवून ते मुखर केले जाते. १९७८-७९ सालापासून चीनने अतिशय नियोजनबद्ध व्यूहरचना करून जागतिक अर्थकारणात आपले भक्कम स्थान प्रस्थापित करण्यासाठी जी दूरदृष्टी व राजकीय इच्छाशक्ती प्रगट केली तिचा मागमूसही आपल्या धोरणविषयक विचारविश्वात आजवर तरी दिसत नाही. चिनी 'मॉडेल'चा अंगीकार करणे ही तशीही सोपी बाब नव्हेच. कारण, चीनचे राजकीय वास्तवच भारतीय चित्रापेक्षा गुणात्मकरीत्या समूळ भिन्न आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या पोलादी एकल वर्चस्वाचा अंमल असल्यामुळे अर्थविषयक धोरणांमध्ये सातत्य व एकवाक्यता टिकवणे चिनी सत्ताधीशांना सहज शक्य होते. भारतातील परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. स्पर्धात्मक बहुपक्षीय अशी राजकीय व्यवस्था नांदणाऱ्या लोकशाही संरचनेमध्ये राज्याराज्यांच्या आर्थिक हिताची सांगड एकंदर देशी अर्थव्यवस्थेच्या आर्थिक प्रकृतीशी घालण्यासाठी सर्वस्तरीय व सातत्यशील अशा चर्चेची व त्या चर्चेला अवकाश पुरविणाऱ्या व्यासपीठाची इथे निकड आहे. १९५० साली अस्तित्वात आलेला केंद्रीय नियोजन आयोग आणि राज्यस्तरावरील त्याची भावंडे गणली जाणारी राज्याराज्यांतील नियोजन मंडळे यांच्या रूपाने ते व्यासपीठ २०१४ सालापर्यंत आपल्या देशात सक्रिय राहिले. आता, नियोजन आयोगासारख्या देशाच्या भविष्यकालीन दीर्घकालीक वाढविकासासाठी काही एक सम्यक् धोरणदृष्टी निर्माण करून ती राबविण्याबाबत आग्रही राहणारे व्यासपीठच सत्ताधारी धुरीणांनी एका फटक्यात मोडीत काढल्यामुळे बोलणेच खुंटले आहे.

या दुर्धर वास्तवाचा सगळ्यांत मोठा व कठोर फटका बसतो आहे तो राज्यांना. मुदलात, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आपल्या देशात राज्याराज्यांत प्रचंड तफावत पूर्वापार राहत आलेली आहे. वस्तू व सेवा करांच्या प्रणालीचा अवलंब सुरू झाल्यापासून तर प्रादेशिक स्तरावरील आर्थिक विकासाच्या आगेकूचीमधील तफावत अधिकच रुंद व गहिरी बनत जाईल, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. जिथे उद्योगव्यवसाय स्थापणे निखळ अशा आर्थिक निकषांनुसार किफायतशीर ठरेल तिथे उद्योजक त्यांची गुंतवणूक इथून पुढच्या काळात एकवटतील. परिणामी, उद्योगव्यापाराचे राज्याराज्यांदरम्यानचे स्थलांतर ही येत्या काळात नित्याची बाब ठरेल. महाराष्ट्रासारखे, एके काळी आर्थिक-औद्योगिक विकासाच्याबाबतीत उभ्या देशात अव्वल गणले जाणारे राज्य या कटू वास्तवाची अनुभूती सध्या सतत घेते आहे. नाना प्रकारचे नवनवीन प्रकल्प शेजारील राज्यांकडे आपला मोहरा वळवत असताना केवळ बघत बसणे हेच मराठी जनतेच्या हातात आता उरते आहे. अस्थिर राजकारण आणि त्याचा लाभ उठवत सत्तेचे केंद्रीकरण जारी राखण्याची देशातील धुरीण नेतृत्वाची निर्बंधहीन एककल्ली कारभारप्रणाली असा समसमा संयोग नांदणाऱ्या आजच्या अर्थराजकीय वास्तवात यांपेक्षा अधिक काही वेगळे घडण्याची अपेक्षा धरणे हाच घाऊक खुळेपणा ठरावा!

■■




# एक...एक...एकाचे एकारलेपण!

देशाचे पंतप्रधान साहेब विलक्षण कल्पक आहेत. त्यांच्या डोक्यात सतत नवनवीन कल्पना येत असतात. अशा नावीन्यपूर्ण कल्पना सुचण्यासाठी माणसाचा मेंदू तल्लख असावा किंवा तेवढे रिकामपण माणसाकडे असावे लागते. म्हणजे मग त्याची कल्पनाशक्ति चौखूर उधळू शकते. तर पंतप्रधान साहेबांनी एक नवीकोरी 'आयडिया' देशासमोर





सादर केली आहे. ती म्हणजे देशातील सर्व पोलिसांचा गणवेष एकसारखा असावा ! व्वा, काय आयडिया काढली आहे ! देशातली परिस्थिती इतकी छान आहे की अशा कल्पना पंतप्रधानसाहेबांच्या डोक्यात येणे अगदी स्वाभाविकच म्हणावे लागेल. देशातली बेकारी वाढत आहे. महागाई तर वाढतच चालली आहे. डाळी व खाद्यतेलाचे भाव दुपटीने वाढले आहेत. सामान्य माणसांचे महिन्याच्या खर्चाचे गणित विस्कळित झाले आहे. पण त्याची कोणतीही गंधवार्ता '७ लोककल्याण मार्गाला' नसावी हे आश्चर्यच म्हणावे लागेल. किंवा महागाई किंवा वाढती बेकारी या गोष्टी खोट्याच असाव्यात. या गोष्टी असत्या तर पंतप्रधानसाहेबांनी त्यात लक्ष नसते का घातले ? ते लक्षच देत नाहीत याचा अर्थ देशात महागाई, बेकारी हे मुद्देच नाहीत असा अर्थ अंधभक्त लावू शकतात. तेव्हा अशा सुखकारक परिस्थितीत पंतप्रधानांना देशभरातील पोलिसांच्या गणवेषाबद्दल काळजी निर्माण झाली तर त्यात गैर काय ? पंतप्रधान पोलिसांची किती काळजी करतात हे त्यावरुन कळून येत नाही का ?

पंतप्रधान राहतात त्या निवासस्थानाचा पत्ता ७ लोककल्याण मार्ग असा आहे. पहा ! लोककल्याणाशी किती बांधिलकी ? म्हणूनच पंतप्रधानसाहेबांना लोकांच्या कल्याणाची किती काळजी आहे बघा ना ! पोलिसांच्या गणवेषाची त्यांना काळजी लागून राहिली आहे. बाकीच्या लोकांच्या अडचणी, त्रास म्हणजे बेकारी किंवा महागाई हे त्रास फारच किरकोळ व दुय्यम आहेत. सध्या देशापुढे सर्वात महत्वाचा, मोठा प्रश्न आहे तो पोलिसांच्या गणवेषाचा !

आता राज्यघटनेप्रमाणे पोलिस यंत्रणा, कायदा व सुव्यवस्था राखण्याचा विषय हा राज्यांच्या अधिकारक्षेत्रातील आहे. त्यामुळे पोलिसदलांचे पोशाख किंवा गणवेष काय असावेत हे ठरविण्याचा अधिकार राज्यांचा असताना पंतप्रधानांना त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण काय ? पण त्यांना असा उलटा प्रश्न करणार कोण ? ते देशाचे सर्वशक्तिमान पंतप्रधान आहेत. त्यांनी इच्छा व्यक्त केली आहे तर त्याबद्दल विचार तर करावाच लागेल ना ?

पण पंतप्रधानसाहेबांना अचानक पोलिसांच्या गणवेषाची

आठवण का बरे यावी ? नुकत्याच झालेल्या राज्यांच्या गृहमंत्र्यांच्या परिषदेला संबोधीत करताना त्यांनी ही कल्पना सादर केली. अर्थात हा विषय राज्यांच्या अधिकारातला असल्याचे थोडेफार का होईना भान ठेवताना त्यांनी ही केवळ सूचना आहे आणि केंद्राकडून राज्यांवर ती लादण्याचा कोणताही विचार किंवा हेतु त्यामागे नसल्याची स्पष्टीकरणात्मक पुस्तीही त्यांनी जोडली. देशातल्या सर्व पोलिसांची समान ओळख असावी या हेतुने 'एक देश एक गणवेष' ही कल्पना आपल्या मनात आली असे त्यांनी सांगितले. म्हणजेच या त्यांच्या कल्पनेला आणि कल्पनाशक्तीला कोणताही तार्किक आधार नव्हता. त्यांच्या सुपीक व कल्पक मेंदूत एक कल्पना आली व ती त्यांनी तत्काळ बोलून दाखवली एवढेच !

दुर्दैवाने ती बाब लक्षात आली आणि त्याचा इतका गाजावाजा झाला की ब्रह्मांडनायकांना व त्यांच्या पक्षाला बचावाच्या पवित्र्यात जावे लागले होते. 'सूटबूट की सरकार' अशा शब्दात त्यांची संभावना झाली आणि ते त्यांना कायमचे चिकटले. परंतु त्यांची नवनवीन भपकेबाज कपडे परिधान करण्याची आवड किंवा छंद कमी झाला नाही. त्यांच्या अंगावरच्या शाली तर म्हणे अशा वैशिष्ट्यपूर्ण असतात की केवळ त्या त्यांच्यासाठीच तयार केलेल्या असतात. तशा शाली बाहेर बाजारात कुणालाही उपलब्ध होत नाहीत. आता हे त्यांचे वर्णन पाहता आणि ज्यांना विविध पोशाख परिधान करण्याची आवड आहे अशा व्यक्तीने पोलिसांना मात्र एकाच रंगाच्या पेहराव किंवा गणवेषात बंदिस्त करणे कितपत उचित आहे



पंतप्रधानांना कपड्यांची आवड आहे असे आतापर्यंतच्या अनुभवावरुन भारतीय जनतेच्या लक्षात आले आहे. आताच पंतप्रधान साहेबांनी केदारनाथ, बद्रीनाथ सारख्या हिमालयाच्या कुशीत वसलेल्या निसर्गरम्य अशा तीर्थस्थानांना भेटी दिल्या. त्यावेळी तर त्यांनी विविध प्रकारचे पोशाख आणि पेहराव करुन देशवासीयांच्या नेत्राचे पारणेच फेडले. अनेक ठिकाणी व विशेषतः परदेशात तर ते दिवसात तीनतीनदा पोशाख बदलत असल्याचे देशवासीयांच्या ध्यानात आले आहे. त्यांच्या अंगावर एकदा पाहिलेला पोशाख पुन्हा क्वचितच पाहण्यास मिळतो हेही भारतातली जनता आता जाणू लागली आहे. तुम्हाला आठवतच असेल ना एकदा त्यांनी अत्यंत उंची व भपकेबाज असा सूट घालून परदेशी पाहुण्यांचे स्वागत केले होते. तो इतका भपकेबाज होता की त्यावरील कलाकुसरीत त्यांचे नावही विणण्यात आले होते. त्यांच्या याचा विचार सगळ्यांनीच करण्याची वेळ आली आहे.

आता राज्याराज्यात पोलिसांचे गणवेष वेगळे का आहेत याबद्दलचे सामान्यज्ञान लक्षात घेऊ. भारत हा खंडप्राय देश आहे. या देशात एकाच वेळेला कुठे बर्फ पडत असते तर कुठे पाऊस तर कुठे कडक उन्हाळा असतो. पोलिसांचे गणवेष निश्चित करताना हवामान लक्षात घेतले जाते आणि पोलिसांना त्यांच्या हालचाली करताना अडचण येणार नाही अशा पध्दतीने गणवेष निश्चित केले जात असतात. उदाहरणार्थ पश्चिम बंगालमधील पोलिसांचे गणवेष पांढऱ्या रंगाचे असतात. याचे मुख्य कारण पश्चिम बंगालचे अतिशय दमट हवामान. याठिकाणी रंगीत गणवेषापेक्षा पांढऱ्या रंगाचा गणवेष पोलिसांना उचित असतो. परंतु देशभरातील पोलिसांचे गणवेष लक्षात घेता जवळपास सर्वच राज्यांमध्ये खाकी गणवेष थोड्याअधिक फरकाने रूढ असल्याने माननीय पंतप्रधानांना

त्यामध्ये अगदी एकसारखेपणा आणण्याचा आग्रह का आहे हे लक्षात न येणारे आहे. पण शेवटी ते पंतप्रधान आहेत आणि 'ही श्रींची इच्छा' म्हणून किमान भाजपची सरकारे असलेल्या



राज्यांमध्ये तरी त्यांनी एकसारखे पोलिस गणवेष करावेत अशी अपेक्षा आहे. कदाचित मग ते पाहून इतर राज्येही तो कित्ता गिरवू शकतील.




माननीय पंतप्रधानांना या 'एक'पणाचे अत्याधिक आकर्षण का आहे हेही अनाकलनीय आहे. भारत हा विविधतेने भरलेला देश आहे. एवढा मोठा खंडप्राय देश आहे की येथे एकाचवेळी वेगवेगळे हवामान असते. कुठे बर्फ पडत असते तर कुठे वृष्टी-अतिवृष्टी तर आणखी कुठेतरी कडक उन्हाळाही असतो. तरीही आख्ख्या देशात एकसारखेपणा म्हणजे एकसुरीपणाच म्हणा ना, असावा असा पंतप्रधानांचा आग्रह दिसतो. त्यांना वेगवेगळ्या राज्यांमध्ये असलेली विविधता मान्य नाही. सगळ्यांना एकाच रंगात रंगवून 'एकरंगी' करण्याचा त्यांचा हा राजहट्ट विचित्र आहे. सत्तेत आल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम 'एक देश एक बाजार आणि एक कर' अशी घोषणा केली होती. ही घोषणा देशात 'जीएसटी' किंवा 'वस्तु व सेवाकर प्रणाली' लागू करण्यासाठी होती. ही प्रणाली लागू करण्यासाठी किती घाई करण्यात आली होती हे सर्वांनाच माहिती आहे. पुरेशी पूर्वतयारी न करता ती लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम एवढाच झाला की लहान, घरगुती उद्योग-व्यवसाय पार निकालात निघाले. त्यावर अवलंबुन असलेले लोक अक्षरशः देशोधडीला लागले कारण त्यांना जीएसटी प्रणालीने लाभ होण्याऐवजी फटकाच बसला. होत्याचे नव्हते झाले. हा धक्का सहन करण्याची आर्थिक ताकद ज्यांच्यात होती तेवढेच तग धरु शकले.

यानंतर आणखी एक शक्कल पुढे आली. 'एक देश एक रेशन कार्ड' ! सगळ्या देशात एकच रेशनकार्ड योजना लागू करण्याचा प्रकार करण्यात आला. हाही राज्यांच्या अधिकारातला विषय असताना केंद्राकडून हस्तक्षेप करण्यात आला. मुळात हा प्रकारच अनावश्यक होता. कारण एका राज्यातील रेशन कार्ड हे दुसऱ्या राज्यात चालू शकते. म्हणजेच एखाद्याची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात बदली झाली तर त्याला आधीचे रेशन कार्ड रद्द करुन त्यासंबंधीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दुसऱ्या राज्यात तत्काळ नवीन रेशनकार्ड मिळत असे. एवढेच नव्हे तर स्वयंपाकाच्या गॅसचे कनेक्शन देखील अशाच पध्दतीने देशात कुठेही स्थानांतरित होऊ शकत होते. पण केवळ 'एक'चा हट्ट धरुन ही योजनाही लागू करण्याचा घाट घालण्यात आला.

याच मालिकेत आणखी एकाची भर पंतप्रधानांकडून टाकण्यात आली. या योजनेचे नाव होते 'एक देश एक खत'

(वन नेशन वन फर्टिलायझर). म्हणजे देशातल्या शेतकऱ्यांना जी विविध खते आवश्यक असतात त्यांना एकच नाव देण्याचा हा प्रकार होता. म्हणजे युरिया असो, नायट्रेट किंवा फॉस्फेट किंवा अन्य कोणतेही खत असले तरी ते सर्वत्र 'भारत' या नावाने विकण्याची योजना पंतप्रधानांच्या सांगण्यावरुन अमलात आणली गेली. यामुळे काय साध्य झाले याचा शोध अद्याप लागायचा आहे.

ही मालिका संपणारी नाही. पंतप्रधान साहेबांनी सत्तारूढ झाल्यापासून 'एक देश एक निवडणूक' अशा कल्पनेचाही पुरस्कार सुरु केलेला आहे. म्हणजे ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंतच्या सर्व निवडणुका एकाचवेळी घेण्याची ही योजना आहे. आता हे कसे शक्य आहे हे त्यांनाच माहिती ! कारण राज्यांच्या विधानसभांच्या मुदती वेगवेगळ्या कालावधीच्या आहेत. लोकसभेबरोबरच सर्व विधानसभांच्या निवडणुका कशा घ्यायच्या याचे गणित अद्याप जमू शकलेले नाही. कारण भाजपची सरकारे असलेल्या राज्यांना देखील ते शक्य नाही. परंतु एका बाजुला 'एक देश एक निवडणूक' असा आग्रह किंवा हट्ट धरायचा आणि दुसरीकडे गुजरात व हिमाचल प्रदेशाच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी असताना फक्त हिमाचलची निवडणूक आधी घेणे व गुजरातची निवडणूक लांबणीवर टाकायची याला दुटप्पीपणा की ढोंगीपणा म्हणायचे असा प्रश्न मनात आल्याखेरीज रहात नाही. आपल्या सोयीनुसार राज्याच्या निवडणुकांचे वेळापत्रक तयार करायचे आणि निवडणूक आयोगाकडून ते जाहीर करवून घ्यायचे असा हा धंदा आहे. अन्यथा ज्या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये सहा महिन्यांपेक्षा कमी अंतर असते त्या सर्व राज्यांच्या निवडणुका एकत्रितपणे घेण्याचा निवडणूक आयोगाला अधिकार असतो. परंतु सध्या निवडणूक आयोगाची भूमिकाही अनाकलनीय होत चालली आहे. निवडणूक आयोग ही स्वायत्त व घटनात्मक संस्था आहे आणि तिच्यावर सरकारचा अंकुश चालू शकत नाही असे असताना देखील सरकारच्या म्हणजे एका व्यक्तीच्या राजहट्टापायी निवडणुकांच्या वेळापत्रकाशी वाटेल तसा खेळ चालू आहे. गुजरातमध्ये निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्यापूर्वी महाराष्ट्रातून चोरट्यासारखे पळवून नेलेल्या उद्योगांचे भूमिपूजन करण्यासाठी आणि इतरही लोकांची भलावण करणाऱ्या योजनांची घोषणा करण्यासाठी गुजरात आणि हिमाचल यांच्या निवडणुका वेगवेगळ्या करण्यात आल्या आहेत. क्षुद्र पक्षपातीपणा काय असतो याचे हे उदाहरण आहे. थोडक्यात 'एक देश एक निवडणूक' हा निव्वळ प्रचाराचा आणि विनाकारण लोकांना निरर्थक अशा विषयाच्या चर्चेत गुंतवून ठेवण्याचा धंदा आहे. त्याचप्रमाणे संघराज्य पध्दतीत राज्य हा




घटक महत्वाचा असल्याने राज्यांनी केवळ केंद्राच्या तालावर नाचायचे ही मनोवृत्ती हुकुमशाहीची आहे.

पंतप्रधान साहेबांचा हा 'एक'चा एकारलेपणा, एकांगीपणा कशासाठी आहे ? भारताला केवळ एकाच रंगात रंगविण्याचा हा अट्टाहास कशासाठी आहे ? त्यांना हा एकसुरीपणा कशासाठी हवा आहे ? आपण फार मोठे समाजसुधारक असल्याचा आव आणून जाति-भाषा-पंथ-प्रदेश यांच्या भिंती दूर करण्याचे आवाहन कशासाठी ? ही लोकशाहीकडून सर्वंकष एकपक्षीय राज्यप्रणालीकडे वाटचाल आहे काय ? यामध्ये संसदेचे महत्वही कमी केले जात आहे. केवळ सरकार म्हणजेच कार्यकारी प्रमुखच सर्वशक्तिमान असणे हा या प्रणालीचा अर्थ असतो. तो म्हणेल ती पूर्वदिशा असा हा प्रकार आहे. जातपात. पंथ, प्रदेश व भाषा यांच्याबरोबरच धर्माचे नाव पंतप्रधान का घेत नाहीत ? त्यांना या देशात बहुसंख्यकवादी धर्माचे राज्य प्रस्थापित करुन इतर अल्पसंख्यक समाजांना दुय्यम स्थान द्यायचे आहे काय ? याची उत्तरे जोपर्यंत समाधानकारकरीत्या मिळत नाहीत तोपर्यंत सुजाण नागरिकांच्या मनात शंकाकुशंका व संशय कायम राहणार आहे. सर्वंकष विचारांची मंडळी ही नेहमी 'एकते मध्ये विविधता' असे शाहजोगपणे म्हणून भल्याभल्यांचा गोंधळ उडवत असतात. यामध्ये एकता ही सर्वोच्च व प्रमुख आहे आणि विविधतेला दुय्यम स्थान आहे. परंतु खरे तत्व आहे ते 'विविधते मध्ये एकते'चे ! यामध्ये विविधतेला प्राथमिकता

व प्रधानता असते आणि त्यामध्ये एकतेचे सूत्र मानण्यात येते. भारतात विविधता ही मुख्य आहे कारण जवळपास प्रत्येक राज्याची संस्कृति, भाषा ही वेगवेगळी आहे. मात्र भारतीयत्वाच्या एका धाग्यात ही विविधता गुंफली गेल्याचे थोर नेत्यांनी सांगून ठेवले आहे. परंतु सुमारबुध्दी राज्यकर्ते हा क्रम उलटा करुन एकजिनसीपणाच्या तत्वाला प्राधान्य देऊन सत्ता केंद्रीकरणाचा पुरस्कार करीत असतात. विविधतेला प्राधान्य देण्यामध्ये विकेंद्रीकरण आणि संघराज्य प्रणालीची भावना प्रमुख असते. हा फरक सूज्ञांनी समजून घेण्याची वेळ आली आहे.

सारांशाने एवढेच सांगता येईल की भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या खंडप्राय देशाला एकजिनसी करण्याचा प्रयत्न म्हणजे विविधता संपविण्याचे कारस्थान आहे. जी मंडळी 'एक देश, एक......' संकल्पनेने पछाडलेली आहेत त्यांना या देशात एकछत्री अंमल प्रस्थापित करुन सांस्कृतिक, भाषिक, प्रादेशिक स्वातंत्र्य नष्ट करायचे आहे हे स्पष्ट आहे. याचा स्वीकार करायचा की नाही हे लोकांनी ठरवायचे आहे !

## अर्थव्यवस्थेची दशा व दिशा


आर्थिक वर्षाच्या अखेरच्या टप्प्यात देश प्रवेश करीत आहे. २०२३-२४चा अर्थसंकल्प सादर करण्यात आता फक्त तीन महिन्यांचा (नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी) अवधी राहिला आहे. मनमोहनसिंग यांच्या काळात ऑक्टोबर महिन्यात आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीचा आढावा सादर केला जात असेल. त्यावरुन अर्थव्यवस्थेची वाटचाल अर्थसंकल्पानुसार सुरु आहे की नाही याचे आकलन केले जात असे. वर्तमान राज्यकर्त्यांना तशी कोणतीही फिकिर राहिलेली नाही. कारण त्यांचा या असल्या चांगल्या प्रथा व गोष्टींवर विश्वास नाही. 'आपण म्हणू ती पूर्वदिशा' आणि 'आपण बोलू ते सत्य' अशा अहंकार व घमेंडखोर वृत्तीने पछाडलेले राज्यकर्ते आहेत. जनतेला विश्वासात घेण्याची तयारी नाही. मात्र खोट्या भूलथापा आणि खोटी आश्वासने व खोटा प्रचार करुन त्यांची दिशाभूल करण्यात त्यांचा हातखंडा आहे.

देशाच्या अर्थमंत्र्यांनी भारतीय रुपयाची घसरण का होत आहे या प्रश्नाला 'अमेरिकेचा डॉलर मजबूत होत आहे म्हणून' असे दिव्य उत्तर देऊन त्यांच्या बुध्दीमत्तेचे प्रदर्शन घडवले. यामागे घमेंड, व मिजासखोर प्रवृत्तीही आहे.

कारण लोकांना खरे काही सांगायचे नाही व कळूही द्यायचे नाही व लपूनछपून निर्णय करीत राहणारे हे 'छुपे रुस्तुम' सरकार आहे. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार देशाच्या शेती क्षेत्राची अवस्था काय आहे यावर नजर टाकू. ताज्या माहितीनुसार गहू व तांदुळाच्या साठ्यात पाच वर्षातील नीचांकी घट नोंदली गेली आहे. गव्हाचा साठा हा बफर किंवा राखीव साठ्यापेक्षा किंचितसाच अधिक आहे. त्यात यावर्षी पावसाने दाखविलेल्या लहरीपणामुळे तांदूळ व गव्हाच्या उत्पादनात पाच ते सहा टक्क्यांनी घट अपेक्षित आहे. त्यामुळे सुमारे वीस ते तीस लाख टन गव्हाची आयात करण्याची पाळी भारतावर येऊ शकते. मनमोहनसिंग सरकारवर आणि त्यांच्या आर्थिक धोरणांवर तसेच कृषि धोरणांवर तोंडसुख घेणाऱ्या वर्तमान राज्यकर्त्यांनी आता तोंड काळे करण्याची वेळ आली आहे. कारण मनमोहनसिंग व कृषि मंत्री शरद पवार यांच्या काळात शेती क्षेत्राचा विकासदर चार टक्के होताच परंतु धान्याची निर्यात करुन व देशासाठी परकी चलन मिळवून देशाच्या अर्थव्यवस्थेला ऐन जागतिक मंदीच्या काळात आधार देण्याचे काम शेतीने केले होते. आता तर मोदी सरकारवर गव्हाच्या आयात करण्याची पाळी आली आहे हे वास्तव अंधभक्तांना ध्यानात घ्यावे लागेल.

अन्न महामंडळाच्या आकडेवारीनुसार सप्टेंबर अखेर गहू व तांदळाचा गोदामातील साठा ५११.४ लाख टन होता. गेल्या वर्षी तो ८१६ लाख टन होता. २०१७ पासूनची आकडेवारी पाहता सध्याचा साठा हा सर्वात कमी - नीचांकी आहे. म्हणजेच गेल्या पाच वर्षातील हा सर्वाधिक कमी साठा आहे. यापैकी गव्हाचा साठा २२७.५ लाख टन आहे. तो गेल्या सहा वर्षातील सर्वाधिक कमी साठा आहे. सामान्यतः देशाची तीन महिन्याची गरज भागेल आणि गहू खरेदीतील घट भरुन काढण्यासाठी म्हणून असलेला राखीव साठा २०५





लाख टन मानला जातो. म्हणजेच बफर किंवा राखीव साठ्यापेक्षा किंचितसाच जास्त गहू साठा देशात शिल्लक आहे. तांदुळाचा साठा मात्र पुरेसा आहे. परंतु तांदुळाच्या यंदाच्या उत्पादनात सहा टक्के घट होण्याची शक्यता लक्षात घेता उपलब्ध साठाही जपून वापरण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्नधान्यांच्या भावात सप्टेंबर महिन्यात साडेअकरा टक्क्यांनी वाढ झालेली आहे. म्हणजेच अन्नधान्यांची महागाई साडेअकरा टक्क्यांपेक्षा जास्त नोंदली गेली आहे. २०१३ पासूनची ही उच्चांकी किंवा सर्वाधिक महागाई आहे. आता या धान्यत्रुटीच्या स्थितीत यावर्षीच्या धान्योत्पादनात पाच ते सहा टक्क्यांनी घट होणार असेल तर महागाई कमी होईल की वाढेल याचे उत्तर देण्याची गरज नाही. लोकांना पोटाला चिमटा घ्यावा लागेल अशी स्थिती निर्माण होऊ शकते. अर्थात हा केवळ शेतीक्षेत्राचा आढावा आहे. इतर क्षेत्रांची कामगिरीही लक्षात घ्यावी लागेल.




दिवाळी दोन वर्षांनी साजरी करायला मिळाल्याने लोकांनी यावर्षी धूमधडाक्यात ती साजरी केली. भरपूर खरेदी करण्यात आल्याने बाजारात मागणी आणि खप दोन्हीत लक्षणीय वाढ झाली होती. परंतु अनेक तज्ञांनी ही एक तात्पुरती आर्थिक उसळी असल्याचे मत व्यक्त केले आहे. महागाई आणि बेकारी या दोन मूलभूत समस्यांवर अद्याप उपाययोजना शोधण्यात सरकारला यश मिळालेले नाही. सप्टेंबर अखेर बेकारीची टक्केवारी वाढून ७.८ टक्के झाली आहे. किंबहुना त्यामुळेच पंतप्रधानांना सरकार दहा लाख नोकऱ्या देण्याची घोषणा करावी लागली असावी. परंतु फोटो काढल्यानंतर या योजनेचे पुढे काय झाले हे कुणालाच कळलेले नाही. लोकांना वाढत्या महागाईचे चटके बसू लागल्याने सरकारची स्थिती अवघडल्यासारखी झाली आहे. इंधन(फ्युएल), अन्न(फूड) आणि खते(फर्टिलायझर्स) या तिन्ही गोष्टींवरील सरकारी सब्सिडीचे वाढते प्रमाण ही सरकारची डोकेदुखी झाली आहे. मोफत धान्य योजनेबद्दल बढाया मारतामारता आता ती योजना बंद कशी करायची याबद्दल आता सरकारची चांगलीच पंचाईत होऊन बसली आहे. बंद केली तर लोकांचा राग ओढवून घ्यायचा की योजना चालू ठेवून आर्थिक हालखी सहन करायची अशा शृंगापत्तीत सरकार आहे. दहा लाख लोकांना नोकऱ्या देण्याची घोषणा तर सरकार करुन बसले आहे परंतु त्याचे वित्तीय परिणाम म्हणजेच त्यासाठीची वित्तीय तरतूद कशी करायची हा यक्षप्रश्न आहे. सरकारी खर्च आटोक्यात राहण्याऐवजी नियंत्रणाबाहेर होऊ लागल्याचे चित्र आहे. याचे मुख्य कारण राज्यकर्त्यांची सवंग धोरणे हे आहे. आंथरुण पाहून हातपाय पसरण्याऐवजी राज्यकर्ते सवंग व लोकांना चांगले वाटेल अशा लोकप्रिय घोषणा करण्यात मग्न आहेत. त्यामुळे सरकारी तिजोरीवरील भार – बोजा वाढत चालला आहे हे त्यांच्या बहुधा लक्षात येईनासे झाले असावे. कररुपी महसुल वसुली चांगली असली तरी त्या पैशाला कसे पाय फुटत आहेत हे देखील सरकारला समजेनासे झाले असावे व त्यामुळे वित्तीय किंवा राजकोषीय तूटही हाताबाहेर चालली आहे. विकासदर आता सहा टक्क्यांपर्यंत खाली येण्याचा अंदाज व्यक्त होऊ लागला आहे.

अर्थव्यवस्था सावरण्याऐवजी राज्यकर्ते निवडणुका, निवडणुकांमध्ये विजय मिळविण्यासाठी सवंग घोषणांमध्येच मग्न आहेत. अर्थव्यवस्था सावरण्याचे कोणतेही गंभीर उपाय केले जात नसल्याचे चित्र आहे. अर्थव्यवस्थेला 'राम भरोसे' सोडण्यात आले असावे. फक्त रामाच्या नावाने मते मागून सत्तेत येणे एवढेच राज्यकर्त्यांना माहिती आहे. सामान्य माणूस त्रस्त झालेला आहे याची त्यांना फिकिर राहिलेली नाही. थोडक्यात 'जे जे होईल ते ते पहावे' अशीच गरीब व सामान्यजनांची अवस्था झालेली आहे. त्यांना कुणीच वाली उरलेला नाही !

■■

# पाकिस्तानचा चीन 'सर्वकालीन मित्र' चीनला अडचणीत आणण्याची संधी भारताने गमावली

जतिन देसाई

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला अडचणीत आणण्याची चीन एकही संधी सोडत नाही. असं करत असताना, पाकिस्तानचा चीन सर्वकालीन मित्र आहे हे मुद्दामहून दाखवण्याचा त्याचा प्रयत्नही असतो. गेल्या पाच महिन्यात संयुक्त राष्ट्राने (यूएन) पाकिस्तानच्या पाच दहशतवाद्यांना आंतरराष्ट्रीय दहशतवादी जाहीर करू नये यासाठी तांत्रिक कारणं उपस्थित करून चीनने पाकिस्तानला मदत केली. फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या करड्या यादीतून पाकिस्तान बाहेर निघालं त्यातही चीनची पाकिस्तानला गेल्या चार वर्षापासून मदत होती. या व्यतिरिक्त, लडाख येथे चीन प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (एलएसी) तणावमुक्त होऊ देत नाही. अद्यापही २०२० च्या एप्रिल महिन्यापूर्वी सारखी एलएसीवर स्थिती नाही. अरुणाचल प्रदेशच्या सीमेला लागून चीनने काही गाव देखील स्थापित केली आहेत. चीनचं विस्तारवादी धोरण हे काय नवीन नाही.

चीनला किमान आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि यूएनमध्ये अडचणीत आणण्याची भारताला देखील संधी मिळते. अलीकडे, तशी संधी भारताला मिळालेली. परंतु त्या संधीचा भारताने उपयोग केला नाही. भारताला मिळालेली ती चांगली संधी होती पण आपण ती गमावली. संयुक्त राष्ट्राच्या मानवी हक्क परिषदेत चीनच्या अशांत शिन जियांग प्रांतातील मानवाधिकाराच्या परिस्थितीवर चर्चा करण्यासंबंधीचा एक प्रस्ताव होता. चीनकडून शिन जियांग प्रांतातील उईगुर मुस्लिमांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत असल्याचा अहवाल एम्नेस्टी इंटरनॅशनलसह मानवाधिकाराच्या प्रश्नावर कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या संघटनेने यापूर्वी प्रसिद्ध केले आहेत. निवृत्त होण्यापूर्वी ऑगस्ट महिन्याच्या शेवटी मानवी हक्क परिषदेच्या तेव्हाच्या अध्यक्षा मिचेल बॅचलेट यांनी उईगुरांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दलचा अहवाल जाहीर केलेला. हा अहवाल प्रसिद्ध होऊ नये यासाठी चीनने खूप प्रयत्न केलेले. कॅनेडा, डेन्मार्क, स्वीडन, ब्रिटन, अमेरिका, तुर्कस्तान इत्यादीने मांडलेला या प्रस्तावाच्या बाजूने मतदान करून चीनला अडचणीत आणण्याची भारतासाठी सुवर्णसंधी होती. परंतु तसं करण्याऐवजी भारताने तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला. सर्वात मोठं आश्चर्य म्हणजे युक्रेन देखील तटस्थ राहिला. युक्रेनवर आक्रमण करणाऱ्या रशियाचा चीन जवळचा मित्र आहे. अमेरिकासह पाश्चात्य राष्ट्र मोठ्या प्रमाणात युक्रेनला आर्थिक व लष्करी मदत करत असल्याची वस्तुस्थिती असताना देखील युक्रेनने प्रस्तावाच्या बाजूने मतदान नाही केलं. चीनची दहशत त्यातून स्पष्ट होते. चीनच्या आर्थिक आणि लष्करी



सामर्थ्यामुळे तसेच विस्तारवादी धोरणामुळे अनेक राष्ट्र चीनच्या विरोधात मतदान करण्याचं टाळतात. ७ ऑक्टोबरला ४७ सभासद असलेल्या मानवी हक्क परिषदेत चीनमधील उईगुरांच्या परिस्थितीवर चर्चा करण्याची मागणी करणारा प्रस्ताव १९ विरुद्ध १७ मताने फेटाळला गेला. भारत, युक्रेन, मेक्सिको, ब्राझिलसह एकूण ११ राष्ट्र तटस्थ राहिली. भारत आणि युक्रेननी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केलं असतं तर उईगुर आणि चीनवर चर्चा झाली असती. चीन अडचणी आला असता. हा प्रस्ताव मंजूर होऊ नये याकरिता चीनने वेगवेगळ्या राष्ट्रांना प्रस्तावाच्या विरोधात किंवा तटस्थ राहण्यासाठी समजावलं होत. "आज आमच्या विरुद्ध हा प्रस्ताव आला आहे, उद्या तुमच्या विरोधात अश्या स्वरूपाचा प्रस्ताव येऊ शकतो" असं काही राष्ट्रांना चीनने सांगितलं होतं.

उईगुर मुस्लिमांवर होणारे अत्याचार नवीन नाही. उईगुर मधील एका गटाचे म्हणणे आहे की अठराव्या शतकाच्या मध्यावर चीनच्या चिंग घराण्याने शिन जियांगवर विजय मिळवला, तोपर्यंत ते स्वतंत्र होत. १९४० च्या दरम्यान सोव्हिएत रशियाच्या मदतीने स्वतंत्र ईस्ट तुर्कस्तान अस्तित्वात आलेला. पण चीनने १९४९ मध्ये या भागावर परत कब्जा मिळवला. चीन उईगुरांच्या मताशी सहमत नाही. पाकव्याप्त काश्मीर, अफगाणिस्तान, किर्गिंस्तान, कझाकस्तान, रशिया, मंगोलिया आणि भारताला लागून असल्यामुळे या प्रांताला भू-राजकीय महत्त्व आहे. चीनचं धोरण शिन जियांग प्रांतात मुस्लिमांची टक्केवारी कमी व्हावी असं सातत्याने राहिलं आहे. तिबेटमध्ये देखील चीनचं असंच धोरण राहिले आहे. सन १९४९ मध्ये शिन जियांग प्रांतात चिनी लोकांची टक्केवारी मात्र सहा टक्के होती. २०१० मध्ये चित्र बदलून ही टक्केवारी जवळपास ४० टक्के एवढी झाली. आश्चर्य म्हणजे मुस्लिमांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत असले तरी बहुसंख्य मुस्लिम राष्ट्र आणि त्यांची संघटना ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉ-ओपरेशन (ओआयसी) याबद्दल काही बोलत नाही. त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे चीनकडून या राष्ट्रात करण्यात येत असलेली प्रचंड गुंतवणूक. पाकिस्तानच्या मदतीने चीनने तालिबानच्या नेतृत्वाखालील अफगाण सरकारशी चांगले संबंध निर्माण केले आहेत. चीनमध्ये एकूण पाच स्वायत्त विभाग आहेत. त्यात शिन जियांग, तिबेटचा समावेश आहे. सहाजिकच स्वायत्तता नावापुरती आहे.

भारताला चीनला अडचणीत आणता आला असता. भारताने मात्र वेगळा विचार केला. प्रत्येक राष्ट्र आधी स्वतःचं राष्ट्रहित पाहतं आणि त्या दृष्टीने आपली आंतरराष्ट्रीय भूमिका ठरवते. चीनशी 'तणावाचे' संबंध असल्यामुळे, कदाचित, भारताने तटस्थ राहण्याची भूमिका घेतली असण्याची शक्यता आहे. यूएनमध्ये भारताने चीनला 'जसाच तसे' उत्तर द्यायला पाहिजे होते. आपल्या विरोधात भारत उघडपणे भूमिका घेणार नाही असे चीनला वाटता कामा नये.

भारत-चीन सीमेवरील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर तणाव आहे. २०२० च्या एप्रिल महिन्यापूर्वी भारताच्या ताब्यात असलेला काही भाग आता 'बफर झोन' झाला आहे. अरुणाचल प्रदेशला चीन दक्षिण तिबेट म्हणतं आणि आधी तो चीनचा भाग होता, असा त्याचा दावा आहे. दलाई लामा यांना भारताने अरूणाचल प्रदेशला जाऊं देता कामा नये, अशी चीनची भूमिका असते. अरूणाचलच्या सीमेवर चीनने दोनेक गाव वसवली आहेत. त्या ठिकाणी पक्क्या इमारती बनवल्या आहेत. अलीकडे भारत सरकारने चिनी कर्जाविरुद्ध कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे आणि प्रत्येक राज्याला त्या संबंधी सूचना





देण्यात आले आहेत. भारत आणि चीनच्या व्यापाराचा विचार केल्यास भारताची आयात गेल्या दोन वर्षात प्रचंड वाढली आहे. गेल्या वर्षी भारत आणि चीनमध्ये १२५.६ अब्ज डॉलर एवढा व्यापार झाला होता. त्यात भारताची चीनकडून आयात होती ९७.५ अब्ज डॉलर एवढी. यावर्षी पहिला नऊ महिन्यात भारताने ८९.६६ अब्ज डॉलर एवढ्या रकमेची वस्तू चीनकडून आयात केली. निर्यात मात्र १३.९७ अब्ज डॉलर एवढी होती. भारतात वेळोवेळी चिनी वस्तूंवर बहिष्कार घालण्याची घोषणा दिली जाते. पण वस्तुस्थिती ही आहे की चीनकडून आपण सतत अधिक वस्तू आयात करत आहोत.

चीन आणि पाकिस्तानच्या मैत्रीमुळे लष्कर-ए-तय्यबा, जैश-ए-मोहम्मदच्या काही दहशतवाद्यांच्या विरोधात भारत

आणि अमेरिकेने १२६७ अल-कायदा सेन्सन्स कमिटीच्या अंतर्गत कारवाई करायचं ठरवलं तर चीन त्यात अडथळा आणते. गेल्या पाच महिन्यात भारत आणि अमेरिकेने लष्कर-ए-तय्यबा आणि जैश-ए-मोहम्मदच्या पाच अतिरेक्यांच्या विरोधात प्रस्ताव आणलेला आणि त्यात त्यांना जागतिक दहशतवादी जाहीर करण्याची मागणी केली होती. एकदा जागतिक दहशतवादी जाहीर करण्यात आल्यास त्याच्यावर मोठ्या प्रमाणात निर्बंध येतात. त्यांची बँक खाते गोठवली जातात आणि त्या अतिरेक्यांच्या बाहेरच्या प्रवासावर प्रतिबंध येतो. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी सप्टेंबर महिन्यात यूएनच्या सर्वसाधारण सभेत दहशतवादाच्या मुद्यांवर पाकिस्तान आणि चीनची टीका केली होती. भारताच्या दृष्टीने फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या ज्या बैठकीत पाकिस्तानला करड्या यादीतून बाहेर काढण्यात आलं त्यापूर्वी भारत-अमेरिकेचा प्रस्ताव मंजूर होणे महत्त्वाचे होते. जर प्रस्ताव मंजूर झाला असता तर निश्चितच टास्क फोर्सवर बऱ्यापैकी दबाव आला असता.





ऑक्टोबर महिन्यात हाफीज तलाह सईद आणि शाहिद महमूद नावाच्या दोन दहशतवाद्यांच्या मदतीला चीन आलं. हाफीज लष्कर-ए-तय्यबाचा सर्वेसर्वा हाफीज सईदचा मुलगा असून मुंबईवर २६/११ ला करण्यात आलेल्या हल्ल्यात त्याची महत्त्वाची भूमिका होती. एप्रिल महिन्यात भारताने त्याला दहशतवादी जाहीर केला होता. पाकिस्तानातून भारत, अमेरिका आणि इस्राईलच्या विरोधात प्रचार करून त्यांच्यावर हल्ले करण्यासाठी लोकांना तलाह सांगत असतो. चीनने तांत्रिक मुद्दा उपस्थित करून तलाह विरुद्धचा प्रस्ताव अडवला. त्याच्या दोन दिवस आधी चीनने लष्कर-ए-तय्यबाच्या शाहीद महमूद नावाच्या दहशतवादीला आणि पाकिस्तानला यूएनमध्ये मदत केली. अमेरिकेने शाहीद महमूद आणि मोहम्मद सरवार यांना २०१६ च्या डिसेंबर महिन्यात दहशतवादी जाहीर केलेले. शाहीद महमूदच्या बाबतीत पण चीनने प्रस्ताव तांत्रिक कारणावरून अडवला.

सप्टेंबर महिन्यात भारत आणि अमेरिकेने लष्कर-ए-तय्यबाचा दहशतवादी साजिद मीर याला जागतिक दहशतवादी जाहीर करण्याचा प्रस्ताव मांडला होता. मुंबईवरील हल्ल्यात साजिद मीर याची महत्त्वाची भूमिका होती. अमेरिकेने आधीच त्याच्यावर ५० लाख डॉलरचं इनाम जाहीर केले आहे. ऑगस्ट महिन्यात अब्दुल रऊफ अझहर या दहशतवाद्याला काळ्यायादीत टाकण्याचा प्रस्ताव भारत आणि अमेरिकेने मांडलेला. तेव्हा देखील चीनने तो प्रस्ताव तांत्रिक कारण उपस्थित करून अडवलेला. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या सर्वेसर्वा मौलाना मसूद अझहरचा तो भाऊ आहे. काठमांडूहून इंडियन एअरलाइन्सच्या आयसी-८१४ विमानाचं अपहरण (१९९९), संसदेवर हल्ला (२००१) आणि पठाणकोट येथील हल्ल्याच्या (२०१६) नियोजनात त्याची महत्त्वाची भूमिका होती. आयसी-८१४ च्या प्रवाशांच्या बदल्यात मसूद अझहर आणि दोन इतर दहशतवाद्यांना भारताने सोडलं होतं. तेव्हाचे परराष्ट्र मंत्री जसवंत सिंग या तिन्ही दहशतवाद्यांना घेऊन काठमांडूला गेले होते. मसूद अझहर पाकिस्तानात नसून तो अफगाणिस्तानात लपलेला आहे असं अलीकडे पाकिस्तानने म्हटलेलं. साहजिकच टास्क फोर्सच्या काळ्यायादीत जाण्यापासून वाचण्यासाठी पाकिस्तानने असं म्हटल्याची शक्यता व्यक्त केली जाते. अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने मात्र मसूद अझहर अफगाणिस्तानात नसल्याचं म्हटलं आहे. यात पाकिस्तान खरं की अफगाणिस्तान हे सांगणं कठीण आहे. पण तालिबानने 'पाकिस्तानात अश्या स्वरूपाच्या दहशतवादी संघटना आणि अतिरेक्यांना मदत करते आणि ते वाढतात' असा आरोप केला होता.

जून महिन्यात अब्दुल रहमान मक्की याच्या बाबतीत पण असंच झालं होतं. मक्की हा लष्कर-ए-तय्यबाचा दहशतवादी आणि हाफीज सईदचा जवळचा नातेवाईक. अमेरिकेने त्याच्यावर वीस लाख डॉलरचं इनाम आधीच जाहीर केलं आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होत आहे आणि ती म्हणजे चीन आणि पाकिस्तान हे सर्वकालीन मित्र आहेत. पाकिस्तानला मदत करण्याची एकही संधी चीन जाऊ देत नाही. अलीकडे झालेल्या चायनीज कम्युनिस्ट पार्टीच्या (सीपीसी) २० व्या काँग्रेसमध्ये २०२० च्या जून महिन्यात भारतीय जवानांवर गलवान खोऱ्यात हल्ला करण्यात महत्त्वाची भूमिका असणाऱ्या पीपल्स लिबरेशन आर्मीच्या कमांडर की फबाओ यांना स्थान मिळालं होत. त्या हल्ल्यात भारताचे २० जवान शहीद झाले होते. चीनचे पण काही जवानांच त्यात मृत्यू झालं होत. फबाओ पण जखमी झाला होता.

भारताने चीनला आंतरराष्ट्रीय स्तरावर अडचणीत आणण्याची एकही संधी सोडता कामा नये.

■■

# भाजप भ्रमात, चकव्यात

व्यंकटेश केसरी



राजधानी दिल्ली शांत वाटत असली तरी राज्यांच्या राजधान्यांत हालचाली वाढल्या आहेत. त्याचे एक कारण अकरा राज्यात होऊ घातलेल्या विधासभेच्या निवडणूका हे असले तरी समाजात अस्वस्थता पण ती कोणत्या स्वरूपात बाहेर येईल याचास्पष्ट अंदाज येत नाही. पण ही अस्वस्थता, असंतोष सरकारला किंवा सत्तारूढ भाजपला फार काळ दाबता येणार नाही हे नक्की. विषमता विरुद्ध उन्माद, नैतिकता विरुद्ध दंडेली ,धर्म विरुद्ध अधर्म ही लढाई लोक डोळे बंद करून पाहत नाहीत.ही अस्वस्थता पंतप्रधान नरेंद्र




मोदी यांना जाणवल्याने त्यांचे गुजरातचे दौरे वाढले आहेत . ते एवढे वाढले की खाजगी चर्चेत "ते गुजरातचे पंतप्रधान आहेत की भारताचे मुख्यमंत्री " असे विनोद ऐकायला मिळतात. . यातली अतिशयोक्ती सोडा पण त्यांचे वाढते दौरे हा एकप्रकारे गुजरात भाजप, गुजरात सरकार यांच्यावर अविश्वास नाही काय ? गुजरात विधान सभेच्या निवडणुका तोंडावर आहेत. गुजरात ही हिंदुत्वाची प्रयोगशाळा आहे असे भाजप म्हणते. तिथे भाजपची दुसरी, तिसरी, चौथी फळी तयार झाली असताना, विरोधी पक्षाचे तगडे आव्हान नसताना या निवडणुका पंतप्रधानांसाठी एवढ्या प्रतिष्टेच्या कशासाठी ? मागच्या वेळीही मोदी आणि अमित शहा यांनी निवडणुकीचा मोर्चा सांभाळला पण भाजपाला ९९ जागा म्हणजे काठावर विजय मिळाला. आता तर राज्याचे अख्खे मंत्रीमंडळच नवे आहे.

मुख्यमंत्री- ममता बॅनर्जी, नितीश कुमार, अरविंद केजरीवाल.के चंद्रशेखर राव, हेमंत सोरेन, भगवंत मान, काँग्रेस नेते राहूल गांधी , शिवसेनेचे उद्धव ठाकरे , राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव,हे भाजपच्या निशाण्यावर आहेत. हे नेते व त्यांचे पक्ष आज जरी एकत्र नसले तरी ते लोकात फिरत आहेत , आपापल्या प्रभावक्षेत्रात काम करीत आहेत याचा काहीच परिणाम होणार नाही असे ज्यांना वाटते त्यांना तसे खुशाल वाटू द्या.अँटी इन्कम्बसी राज्य सरकारांच्या विरोधात असेल तर ती केंद्र सरकारच्या विरोधात का असू शकत नाही ? विरोधकांची कोंडी करून, त्यांना खिंडीत गाठल्याने नेते फुटतात पण लोकांची मते मिळत नसतात. राम मंदिर बांधल्याने राम राज्य येत असेल तर सरकारने राम मंदिर बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घ्यावा, तो देशाच्या पातळीवर राबवावा,जिल्ह्याजिल्ह्यात राम मंदिर उभारावे.

विधान सभा निवडणुकांचे निकाल कसेही लागू द्या , खरा मुकाबला २०२४च्या एप्रिल-मे महिन्यात होईल. ही निवडणूक कोणत्या प्रश्नावर होईल याबद्दल राजकीय पंडित आडाखे बांधत आहेत. हिंदुत्व झाले, पाकिस्तान झाले, अयोध्येत राम मंदिर उभे राहील, मुसलमानांना अघोषित दुय्यम दर्जा देण्यात येईल,त्यांची संख्या घटविण्याचे कायदे केले जातील पण त्यामुळे राष्ट्रवादाची लाट येईल काय ? तसे असते तर ईडी, सी,बी, आय. इन्कम टॅक्सच्या वापर विरोधी नेत्यांवर करण्याचे कारण काय ? पण कारण आहे. भाजप, तिचे चाणक्य, विश्वगुरू , राष्ट्र ऋषी, त्यांचे राज्याराज्यातील हाकारे, चेले-चपाटे यांना निवडणूक जिंकण्याची खात्री नाही.ती असती तर इतर पक्ष फोडण्यापेक्षा त्यांनी भाजपला मजबूत केले नसते का ? आणि मजबूत भाजपला विरोधी पक्षांची भीती वाटण्याचे कारणच काय.




भाजप भ्रमात आहे ,चकव्यात सापडली आहे. म्हणून २०२४ च्या लोकसभा निवडणूका या आतापर्यंत झालेला सर्व निवडणुकांपेक्षा वेगळ्या राहणार आहेत. मोदी विरुद्ध कोण? वरोधकांचा पंतप्रधानपदाचा चेहरा कोण? विरोधी पक्षांची खिचडी स्थिर सरकार देऊ शकेल काय ? असे नेहमीचे यक्तीवाद केले जातील पण मतदान होईल ते सरकारच्या कामकाजावर आणि सुडाचे शस्त्र दुधारी असते. दोन्ही बाजूने जखमा होतात. केंद्रात ७०हून अधिक मंत्री आहेत. दोन-चार वगळता कोणीही आपल्या खात्याबद्दल बोलताना दिसत नाही. त्यांना

आता निवणुकीच्या कामाला लावले आहे. ते बोलत नाहीत की त्यांना बोलण्यास मज्जाव करण्यात आला आहे याच्या सुरस कथा राजकीय वर्तुळात ऐकायला मिळतात. पण सरकार चालविण्यात त्यांचे काही योगदान नसेल तर मग एवढी खोगीर भरती कशासाठी. ?

गुजरात मधील बिल्किस बानू गँग रेप प्रकरणातील आरोपींना केंद्राच्या दबावाखाली सोडण्यात आले. त्यांच्या मुक्ततेला केंद्रीय गुप्तचर खाते, न्यायालयाचा विरोध होता पण तो धुडकावण्यात आला.त्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यांच्यावर पुष्प वर्षाव झाला,त्यांच्या तोंडी मिठाई भरविण्यात आली . हे अकरा नरवीर तुरुंगात "सजा"( ? ) भोगत असताना त्यांना ,त्यांची अधिकृत सुटका होण्यापूर्वी ,प्रत्येकाला एक हजार दिवसाचा पॅरोलही मिळाल्याचा बातम्या आहेत. हे गुजरातचे नरवीर २००२च्या कुप्रसिद्ध हिंदू मुस्लिम दंग्यातील धर्मवीर होते असे चित्र त्यांच्या सत्कारानंतर ,त्यांना मिळालेल्या पॅरोल नंतर निर्माण होत आहे. राम राज्यात , अमृतकाळात त्यांच्यावर एवढी मेहेरबानी कशासाठी ? या प्रश्नाचे उत्तर भाजपला द्यावे लागेल. आणि हा मुद्दा केवळ गुजरातपुरता सीमित राहणार नाही.

रुपयांची घसरण, महागाई, जागतिक भूक निर्देशांकात भारताची नीचांकाकडे होणारी वाटचाल --म्हणजे आर्थिक पातळीवर असलेल्या आणि भविष्यात येणाऱ्या संकटाचा सरकार कसा सामना करेल याबद्दल लोकात, उद्योग जगतात आत्मविश्वास निर्माण करण्यापेक्षा भाजप व तिचे मंत्री हिंदुत्ववादाचे हत्यार परजत बसले आहेत. राम मंदिराची भाषा करणारे राम राज्याबद्दल बोलत नाहीत. भाजप २०१४ पासून केंद्रात आहे, गुजरात मध्ये तो २५ वर्षाहून अधिक काळ सत्तेत आहे. या शिवाय उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, आसाम, हरियाणा, मध्य प्रदेशात तो सरकारात आहेत तर छत्तीसगड, राजस्तानातही त्याने राज्य केले आहे. या पैकी कुठल्या राज्यात राम राज्य आले याचा जाहीर ताळेबंद भाजपने द्यावा..

२०१९च्या विधानसभा निवडणुका जिंकल्यानंतर महाराष्ट्रात महाभारत घडले, बहुमत मिळूनही भाजप आघाडी फुटली , अडीच वर्षे बाहेर राहावे लागले, १९९६ साली अटल बिहारी वाजपेयींचे सरकार १३ दिवस चालले त्यानंतर युनाइटेड फ्रंटचा जन्म झाला. याचा अर्थ निवडणुकीनंतर समीकरणे बदलतात , चमत्कार होतात हा इतिहास आहे.

आर्थिक आघाडीवर गोंधळ झाल्याने इंग्लंड मध्ये राजकीय अस्थिरतेत अडकला आहे. आणि भारतात आस्मानी आणि सुलतानी तडाख्यात सापडलेल्या जनतेला आधार पाहिजे, सत्यासाठी राज्यकर्ते संवेदनशील हवेत. पण चित्र उलटे दिसते.

## भाजपाची 'बदलती' ओळख

भारतीय राजकारणात भाजप एक मजेदार रसायन आहे. राष्ट्रीय आंदोलनापासून जाणीवपूर्वक दूर राहिलेला हा पक्ष किंवा यांची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ , स्वतःला कट्टर राष्ट्रभक्त म्हणवून घेतात आणि ज्या पक्षाने या आंदोलनाचे नेतृत्व केले,स्वातंत्र्य लढा घराघरात पोहोचविला त्याला संपविण्याची भाषा करतात. हे मुसलमानांचा, ख्रिश्चनांचा द्वेष करतात ,त्यांच्या



राष्ट्रभक्तीविषयी शंका घेतात पण त्याच वेळी वसुधैव कुटुम्बकम बद्दल बोलतात. स्वातंत्र्य लढ्यात गांधी टोपी हे प्रतीक बनले होते पण यांनी काळी टोपी डोक्यावर चढविली. यांचा भर धोतरापेक्षा खाकी चड्डीवर राहिला कारण यांना चळवळीपेक्षा रणांगणाचे आकर्षण




आहे. संघ, जनसंघ, भाजपने कोणतेही आंदोलन केले नाही पण दुसऱ्यांनी केलेले आंदोलन मात्र हायजॅक केले हा इतिहास आहे काय? अगदी अयोध्येतील रामजन्मभूमी आंदोलनाची सुरुवात भाजपने केली नाही पण त्यात " योग्य वेळी" उडी मात्र मारली जशी त्यांनी (संघ परिवाराने) जयप्रकाश नारायण यांच्या पुनर्निर्माण आंदोलनात एंट्री घेतली होतो तशी ! याचा त्याना राजकीय विस्तारासाठी फायदा झाला हे निर्विवाद सत्य आहे. .

भाषावार प्रांतरचना मान्य नसल्याने संघपरिवार संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनापासून दूर राहिला पण बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेबरोबर योग्य वेळी आघाडी करून महाराष्ट्रात पसरला. हा पक्ष सत्तेत असताना वेगळ्या विदर्भ राज्याबद्दल मौनातं राहतो पण सत्ता गेली की महाराष्ट्र तोडण्याची भाषा करतो.एकाच वेळी विदर्भ राज्यवादी, महाराष्ट्रवादी राहणे हा विरोधाभास नाही तर या पक्षाचे धोरण आहे. यांच्या हाती मुंबई कशी सुरक्षित राहील या शंकेला भरपूर आधार आहेत. हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांना महामानव, विश्व रत्न या शब्दांनी गौरवितात. भक्तिभावाने त्यांची जयंती साजरी करतात, पुण्यतिथी पाळतात पण त्यांच्या संसदीय लोकशाहीबद्दल त्यांचे मूलभूत आक्षेप राहिले आहेत. म्हणून कधी संविधानाची समीक्षा कर तर कधी संसदीय प्रथा, परंपरा याला फाटा मारून अप्रत्यक्षपणे नाराजी दाखवीत असतात.

यांना जर्मनीचे, हिटलरचे आकर्षण आहे. संघाच्या ध्वजाला भारतीय, हिंदू परंपरेनुसार अभिवादन केले जात नाही.यांना अखंड हिंदुस्थान हवा आहे पण त्यात मुसलमान नकोत, हे कसे शक्य आहे असे भाजपच्याच एका वरिष्ठ नेत्याने विचारले होते. पण अर्थात हे मोदी युग सुरु होण्याच्या पूर्वीचा काळ आहे. त्यात भाजप मध्ये काही नेहरूवादी नेते होते. आता जमाना कट्टरवादी, उग्रवादी, दीर्घद्वेषी. बदला घेणाऱ्यांचा आहे.

भाजपला काही काही शब्दांचे विलक्षण आकर्षण आहे. त्यांना 'महा' हा शब्द आवडतो. भाजपचे "महा अधिवेशन" असते तर इतर पक्षांची "अधिवेशने" असतात. त्यांना " एक देश, एक गणवेश " याचे आकर्षण आहे. पोलिसांसाठी तसा गणवेश असावा अशी सूचना सरकारमधून करण्यात येत आहे. पण पोलीस हा राज्यांचा विषय आहे. त्यांना लोक सभा, विधान सभेच्या निवडणूका एकाच वेळी पाहिजेत . पण सध्या हिमाचल प्रदेश आणि गुजरात विधानसभेच्या निवडणूका त्यांना एकाच वेळी घेता आल्या नाहीत. गुजरात हे भारतातले कदाचित एकमेव राज्य असेल जिथे विधान सभेच्या निवडणूक प्रचारात पाकिस्तान हा महत्वाचा मुद्दा असतो. नरेंद्र मोदी या राज्याचे मुख्यमंत्री झाल्यापासून पाकिस्तान, मुसलमान या मुद्द्यानेच प्रचारात रंग भरतो, निवडणूका जिंकता येतात. त्यामुळे विकासाच्या मुद्द्याने भाजप निवडणुका जिंकीत नाही हे आपोआप सिद्ध होते.पाकिस्तान हे जर शत्रू राष्ट्र असेल तर मोदी सरकारने त्याच्याशी असलेले डिप्लोमॅटिक संबंध तोडून टाकले पाहिजेत पण ना पाकिस्तानशी ना चीनशी संबंध तोडण्याची बिशाद नाही हे सारे जग जाणते.

भाजप आणि संघ परिवाराने भगव्याचे राजकीयकरणं केले, हिरवा रंग मुस्लिम धार्जिणी ठरविला आणि निवडणुकीचा हंगाम येताच सामान नागरी कायद्यांचे नगारे हा पक्ष वाजवू लागतो. यांना जेपी (जयप्रकाश नारायण) लागतात, व्ही पी. (व्ही पी. सिंग), लागतात, बाळासाहेब (ठाकरे) लागतात, अण्णा (हजारे) , बाबा (रामदेव) तर हवेच पण निवडणुकीतील विजयाचे श्रेय मात्र ते स्वतःकडेच घेतात. आणि याला कोलांटउड्या म्हणायचे नाही, संधिसाधूपणा तर नाहीच नाही. पण हीच या पक्षाची खरी ओळख नाही काय?





■■

# शिवरायांची जलनीती

प्रकाश पवार

पृथ्वीच्या अस्तित्वापासून आणि मानवी जीवनाच्या सुरुवातीपासून पाणी हा एक महत्त्वाचा यक्षप्रश्न राहिलेला आहे. अतिप्राचीन, प्राचीन, मध्ययुगात पाण्याचा प्रश्न गंभीर होता. तसेच आधुनिक युगात पाण्याचा प्रश्न खूप गंभीर आहे. दुसऱ्या शब्दात शिवरायांच्या काळात पाण्याचा प्रश्न चिंताजनक होता. शिवरायांचे पाणी विषयक धोरण तीन प्रकारच्या घडामोडींमधून निश्चित झाले होते. एक, त्यांच्या काळात दुष्काळ पडले होते. शिवरायांचा जन्म झाला त्यावेळी दक्षिणेमध्ये थोरल्या दुष्काळामुळे (great drought) बिकट परिस्थिती निर्माण झालेली होती. इ. स. १६३० मध्ये दक्षिण भारतात थोरला दुष्काळ पडलेला होता. या दुष्काळाच्या खाईत रयत अक्षरशः होरपळून निघाली होती. गावेच्या गावे ओस पडली होती. अन्न आणि पाणी मिळणे मुश्किल झाले होते. या विदारक दुष्काळाची वर्णने समकालीन लेखकांनी केली होती. अब्दुल हमीद लाहोरी यांनी दुष्काळाचे वर्णन केलेले आहे. त्यांच्या वर्णनानुसार भाकरीच्या तुकड्यासाठी लोक स्वतःला विकायला तयार होते. परंतु घेणारा कोणी नव्हता. मृतांच्या हाडांची भुकटी पिठात टाकून ती विकली जात होती. शेवटी दारिद्र्याने कळस केला. कारण माणसेच माणसाला खाऊ लागली. हे थोरल्या दुष्काळाचे वर्णन आहे. या थोरल्या दुष्काळाचा परिणाम पंधरा-वीस वर्ष राहिला. या पार्श्वभूमीवर शिवरायांनी पाणी धोरण निश्चित केले होते.



थोडक्यात शिवरायांना थोरल्या दुष्काळामुळे पाण्याचे महत्व तंतोतंत समजलेले होते. त्यांचे पाणी विषयक ज्ञान प्रत्यक्ष थोरल्या दुष्काळाच्या अनुभवातून तयार झालेले होते.

दोन, शिवरायांना पाण्याबद्दलचे धोरण ठरवताना मातृ आणि पितृ अशा दोन्हीही घरातील वारसा होता. कारण पाण्यासाठी लखोजी जाधवराव यांनी तळ्यांचे बांधकाम केले होते. तसेच मालोजीराजे भोसले यांनी पाण्यासाठी तळ्यांचे बांधकाम केले होते. आई आणि वडील या दोन्हीही घराण्याचा विचार पाण्याच्या संदर्भात सर्जनशील पद्धतीने विकसित झालेला होता.

तीन, तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्याय पाणी वाटपाची परंपरा जैन आणि बौद्ध परंपरेने विकसित केलेली होती. जैन आणि बौद्ध पाणी वाटपाच्या परंपरेवर आधारित शिवरायांचे पाणी धोरण विकसित होत गेले. लेणी आणि पाणी यांचा संबंध जैन आणि बौद्ध परंपरेत आहे. शिवरायांनी जैन आणि बौद्ध लेण्यांचे सूक्ष्म निरीक्षण केले होते. मावळ खोऱ्यात जैन आणि बौद्ध लेण्या आहेत. तसेच रायगडच्या परिसरात जैन आणि बौद्ध लेण्या आहेत. त्यांचे जलसंवर्धनाचे धोरण शिवरायांच्या दृष्टीमधून सुटलेले नव्हते. शिवरायांनी जैन आणि बौद्ध लेण्यांच्या पद्धतीने गडांवरती पाण्याची व्यवस्था केलेली होती. काळानुसार पद्धतीमध्ये फरक झाले. परंतु जैन आणि बौद्ध परंपरेतील न्याय पाणी वाटपाचे धोरण शिवरायांनी शिवकाळात विकसित केले होते. त्या धोरणाला शिवरायांनी त्यांच्या काळाच्या संदर्भात नवीन आकार दिला.

शिवरायांनी पाण्याचा विचार मुख्यत्वे समुद्र आणि बिगर समुद्राचे पाणी अशा दोन पद्धतीने केला होता असे दिसते. सत्यानव टक्के पाणी समुद्राचे आहे. त्याबद्दलचा विचार फार केला जात नाही. शिवरायांनी समुद्राच्या पाण्याचा आणि राज्यसंस्थेचा संबंध जोडलेला होता. हा एक पाण्याबद्दलचा त्यांचा महत्त्वाचा विचार होता. तर समुद्राच्या व्यतिरिक्त असलेल्या तीन टक्के पाण्याबद्दल त्यांनी सातत्याने विचार केलेला होता. यामुळे समुद्राचे पाणी आणि बिगर समुद्राचे पाणी अशा दोन चौकटींमध्ये शिवरायांचा पाणी विषयक विचार विकसित झालेला दिसतो. या गोष्टी शिवरायांनी घेतलेल्या निर्णयामधून आपणास स्पष्ट करता येतात.









## स्वराज्याची संकल्पना आणि समुद्राचे पाणी

शिवरायांच्या स्वराज्याच्या सत्तेचा एक मार्ग समुद्राच्या पाण्यातून जात होता. कारण शिवरायांनी राज्यसंस्थेची स्थापना केली. त्या राज्यसंस्थेचे एक स्वरूप समुद्राशी संबंधित पाण्याशी जोडले गेलेले होते. या संदर्भातील सर्वसाधारण निरीक्षणे पुढील प्रमाणे नोंदविता येतात. एक, शिवरायांनी आरमाराची स्थापना केली. त्यांना द फादर ऑफ इंडियन आर्मी म्हटले जाते. या अर्थाने आरमाराची स्थापना हा घटक थेटपणे समुद्राच्या पाण्याशी संबंधित आहे. स्वराज्याचे संरक्षण समुद्राच्या पाण्याच्या मदतीने करता येते हा विचार त्यांनी आरमाराच्या स्थापनेमधून विकसित केला होता. आरमार हा घटक राज्यसंस्थेचे एक महत्त्वाचे अंग आधुनिक काळातील आहे. राज्यसंस्थेच्या सत्तेचा आरमार हा पायाभूत घटक आहे. आरमाराचे अस्तित्व समुद्राच्या पाण्याविना अशक्य असते. यामुळे शिवरायांनी स्वराज्याच्या राज्यसंस्थेला समुद्र हा एक घटक जोडून घेतला. दोन, समुद्राच्या पाण्याबद्दल त्यांनी सुधारणावादी दृष्टिकोन स्वीकारला होता. समुद्रावरून प्रवास केला तर धर्म बुडतो अशी एक अंधश्रद्धा होती. तो रुढीवादी दृष्टीकोण होता. म्हणजेच समुद्राचे पाणी हे एका अर्थाने धर्म बुडवे मानले जात होते. शिवरायांनी समुद्राचे पाणी धर्म बुडवे नाही असा विचार विकसित केला. उलट शिवरायांनी समुद्राचे पाणी राज्याची स्थापना करण्यासाठी उपयोगात आणले होते. तीन, समुद्राचे पाणी ही एक नैसर्गिक जल संपत्ती आहे. हा दृष्टिकोन शिवरायांनी स्वीकारला होता. संपत्तीचे विविध प्रकार आहेत. संपत्तीच्या विविध प्रकारांपैकी समुद्र संपत्ती हा एक प्रकार शिवरायांनी अधोरेखित केलेला होता. चार, समुद्रावरती राज्यसंस्थेची सत्ता म्हणजेच समुद्राच्या पाण्यावर राज्यसंस्थेचा अधिकार असतो. ही गोष्ट देखील शिवरायांनी स्पष्ट केली होती. समुद्रावर राज्यसंस्थेचे नियंत्रण हा घटक त्यांनी स्वराज्यातील लोकांमध्ये खूप खोलवर रुजवला होता. यामुळे शिवरायांच्या पश्चात देखील मराठा आरमार विकसित होत गेले. पाच, सत्ता आणि समुद्र यांचे सहसंबंध शिवरायांनी जोडले होते. याबद्दलचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवरायांच्या राज्याभिषेकाच्या वेळी त्यांनी भाल्याच्या टोकावर दोन सोन्याच्या माशाच्या प्रतिमा तयार करून लावलेल्या होत्या. ही नोंद हेन्री ऑक्झेंडन यांनी केलेली आहे. म्हणजे थोडक्यात समुद्रावर आणि पाण्यावर स्वराज्याची सत्ता असेल हे सूत्र त्यांनी अधोरेखित केले होते. सहा, सागरी किनारा, सागरी बेटे, सागरी किल्ले, सागर संपत्ती, या गोष्टींचा संबंध पाण्याची थेटपणे येतो. स्वराज्याचा विस्तार आणि स्वराज्याची समृद्धी सागराच्या पाण्यावर अवलंबून आहे ही दृष्टी शिवरायांनी स्वराज्यामध्ये विकसित केली होती. यामुळे त्यांनी सागरी बेटांचा उपयोग करून सागरी किल्ल्यांचे बांधकाम केले होते. सात, सागराचा उपयोग व्यापार करण्यासाठी होतो. सागरावरती नियंत्रण ठेवून शिवरायांनी व्यापारावर देखील नियंत्रण ठेवले. सागरी मार्गाने होणारा

व्यापार हा घटक त्यांनी राज्यसंस्थेच्या उत्पादन व्यवस्थेशी जोडून घेतला. सागरी व्यापाराला स्वराज्य ही राज्यसंस्था मान्यता देत होती. तसेच सागरी व्यापाराला स्वराज्य ही राज्यसंस्था विनाशुल्क मान्यता नाकारत होती. म्हणजेच थोडक्यात सागरी व्यापार स्वराज्याच्या अर्थसंकल्पाचा एक महत्त्वाचा घटक आहे. हा मुद्दा त्यांनी अधोरेखित केलेला होता. आठ, सिंधुदुर्ग किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्या काळातील गोड्या पाण्याच्या दगडी विहीरी आहेत. त्यांची नावे दूध विहीर, साखर विहीर व दही विहीर अशी आहेत. सिंधुदुर्ग हा जलदुर्ग या प्रकारचा किल्ला आहे. नऊ, विजयदुर्ग हा किल्ला ११ व्या शतकात शिलाहार घराण्यातील राजा भोज यांनी  बांधला. हा किल्ला जलदुर्ग आहे. हा किल्ला तीन बाजूंनी पाण्याने घेरलेला आहे. या किल्ल्यात दोन भुयारी मार्ग आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६६४ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विजयदुर्ग किल्ला जिंकला होता. शिवाजी महाराज आणि राजा भोज यांचा थेट संबंध आहे. कान्होजी आंग्रे आणि त्यांचे पुत्र संभाजी आंग्रे व तुळोजी आंग्रे यांच्या ताब्यात हा किल्ला इ.स. १७५६पर्यंत होता.  दहा, इ.स. १६७९ च्या ऑगस्ट महिन्यात शिवाजी महाराजांनी मायनाक भंडाऱ्याला येथे पाठवून बेटावर खांदेरीचा किल्ला बांधावयास काढला. या बेटावर वेताळाचे एक  श्रद्धास्थान आहे. त्याची पूजा केल्याशिवाय कोणीही कोळी मासेमारीसाठी नावा समुद्रात घालत नाहीत. अकरा, कुलाबा किल्ला हा सागरी किल्ला होता. हा किल्ला पश्चिम किनाऱ्यावरती समुद्रामध्ये अलिबाग शहरानजीक आहे. किल्ल्याला दोन दरवाजे आहेत.



बारा, शिवराय आग्रा येथे होते. तेव्हा त्यांनी हिरोजी इंदूलकर यांना पत्र पाठविले होते. त्यात ते लिहतात, आमचे लक्ष सिंधुदुर्गी स्थिरावले हे बरे जाणणे, अवघे काम चखोट करणे... वाळू गोड्या पाण्यामध्ये चार दोनदा भिजू देणे. खारटाण धुतले जाईल. ती धुतलेली वाळू वापरणे. यावरून देखील शिवराय समुद्राचा किती सूक्ष्मपणे विचार करत होते हे स्पष्ट होते.


## किल्ले आणि पाणी

शिवरायांनी डोंगरी भागातील किल्ल्यांचा उपयोग संरक्षणासाठी केला. याबरोबरच त्यांनी डोंगरी किल्ल्यांवरती पाण्याचा शोध घेतला. आज्ञापत्रांमध्ये किल्ले आणि पाणी यांचे संबंध स्पष्ट केलेला आहे. आज्ञापत्राचे आठवे प्रकरण दुर्ग या आशयाचे आहे. या प्रकरणात पाणी आणि दुर्ग यांच्यातील सहसंबंध सविस्तरपणे स्पष्ट केलेला दिसतो. गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी, टाकी पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशी मजबूत करावी. गडावरी झराही आहे, जसे तसे पाणीही पुरते, म्हणून तितकियावरीच निश्चिती न मानावी. किंनिमित्य की, झुंजामध्ये भांडियांचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात, आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हा संकट पडते. याकरिता तसे जागी जखिरीयाचे (साठविलेले) पाणी म्हणून दोन-चार टाकी तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊन न द्यावे,  गडाचे पाणी बहुत जतन राखावे (गर्गे ब. गो. व घाटे द्वा. वा. १९३९: ४१). या आज्ञापत्रातील पुराव्यामध्ये पुढील गोष्टी अधोरेखित केलेल्या आहेत. एक, आधी खडक फोडुनी तळी बांधावी असा पुरावा अज्ञापत्रात मिळतो. दोन, झऱ्याच्या पाण्यावर विसंबून राहू नये. कारण आवाजामुळे झऱ्यांची दिशा बदलते. हे भूगर्भविषयक ज्ञान नोंदविले गेले आहे. तीन, जलसंवर्धनाचा विचार मांडलेला आहे.   चार, डोंगरी किल्ल्यावरती त्यांनी आजच्या भाषेत वॉटर हार्वेस्टिंग केले. किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने सर्वात

प्रथम पाण्याचे महत्त्व अत्यंत महत्त्वाचे व अनन्यसाधारण होते. त्यात सह्याद्रीत चार महिने पाऊस पडतो. त्यामुळे प्रत्येक किल्ल्यावर पाण्याची साठवणूक शिवराय काटेकोरपणे करत होते. शिवकाळात विजेचा शोध लागला नव्हता. त्यामुळे विद्युतपंपाने पाणी खेळवणे, हे त्या काळी शक्य नव्हते. मात्र त्याही परिस्थितीत स्वराज्यात प्रत्येक किल्ल्यावर वर्षभर पुरेल अशी व्यवस्था त्यांनी केली होती. प्रसंगी गडावर हल्ला झाला तर आणीबाणीच्या काळातही आवश्यक तो पाणीसाठा कसा राहील, याची काळजी शिवरायांनी घेतलेली होती. त्याचे मुख्य कारण त्याकाळी जलाभेद्य खडकांचे थर आणि पाझरणारे खडक यांच्या साहाय्याने पाणीसाठा करता येऊ शकतो, हे तत्कालीन पाथरवटांच्या (खडक फोडणारी जमात) लक्षात आले होते (प्रहार, १९फेबुवारी २०१५). पाथरवटांच्याकडे भूगर्भातील ज्ञान आहे. हे सुक्ष्म निरिक्षण शिवरायांचे होते. पाथरवट या सामान्य व्यक्तीकडे भूगर्भातील पाण्याबद्दलचे ज्ञान आहे हा मुद्दा त्यांनी अधोरेखित केलेला होता. त्यामुळे अशा हरहुन्नरी लोकांकडून शिवरायांनी किल्ल्यामध्येच खाणी, तलाव, हौद किंवा दगडांच्या उतरणीवर खोल खड्डे निर्माण करून पाणी सतत पाझरत राहील, याची व्यवस्था केली होती. त्याचबरोबर अशा जलाभेद्य खडकांची मुबलकता आढळली तर त्यातले मधले खडक अलगद काढून किंवा त्यांना पाणी पाझरत राहील इतके तासून तलाव तयार केले. यामुळे वर्षभर पाण्याची मुबलकता राहील, अशी व्यवस्था केली होती. रायगडावरील गंगासागर तलाव, कोळींब तलाव, सज्जनगडावरील सोनाळे तलाव, प्रतापगडावरील रहाटाचे तळे, भवानी तलाव ही त्याची काही उदाहरणे आहेत. या संदर्भातील काही निवडक उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, मानवी संरक्षणासाठी आणि राज्यसंस्थेच्या विकासातील महत्त्वाचा घटक म्हणून किल्ले ओळखले जातात. शिवाजी महाराजांची पाण्याबद्दलची भूमिका आज्ञापत्रात व्यक्त झाली आहे. आज्ञापत्रात म्हटले आहे की गडावर झऱ्याचे पाणी भरपूर आहे म्हणून त्यावर विसंबून न राहता एकदोन तळी अधिक बांधून राखीव ठेवावी. पाणी या घटकाला त्यांनी जास्त महत्त्व दिले होते असे दिसते. किल्ल्यांचे बांधकाम पाणी सुविधेचा शोध घेऊन झालेले आहे. किल्ल्यांच्या बांधकामासाठी पाण्याची सुविधा उपलब्ध करून घेतल्या गेली. दोन, किल्ल्यावरती राहणाऱ्या लोकांसाठी पाण्याची सुविधा आवश्यक होती. यामुळे किल्ल्यांवरती तलावांचे बांधकाम करण्यात आले. तलावांमध्ये पाणी वॉटर हार्वेस्टिंगच्या पद्धतीने संकलित केले गेले. राजगड हा उंच किल्ला आहे. हा किल्ला मराठा राज्याची पहिली राजधानी होती. हा किल्ला सर्वात अगम्य समजला जातो. येथे मोठ्या प्रमाणात पाणी साठवण्याची सोय होती. किल्ल्यात दोन मोठे तलाव आणि सुमारे ३९ दगडी टाके आढळतात. त्यांना खडकांमध्ये साठलेल्या पाण्याचे ज्ञान होते. खडकांमधील झरे ओळखण्याचे ज्ञान होते. तीन, मराठा राज्याची राजधानी रायगड किल्ला ही होती. किल्ल्यात आता सुमारे १२ तलाव आणि ३० दगडी टाके आढळतात. राजधानी रायगडाच्या दृष्टीने पाणीसाठा गंगासागर, हत्ती तलाव, हिरकणी तलाव, बामण तलाव, काळा हौद, कुशावर्त तलाव, चांभार टाके, हनुमान टाके अशा विपूल पाणी साठवण्याच्या जागा शोधल्या होत्या. वर्षभर पुरेसा पाणी पुरवठा करणाऱ्या







जागांची व्यवस्था शिवरायांनी गड बांधतानाच केली होती. किल्ल्यातील सर्वात जास्त साठवण क्षमता असलेला गंगासागर तलाव आहे. शिवकालीन पाणीपुरवठ्याची व्यवस्था सर्व किल्ल्यांवर जवळपास सारखीच होती. रायगडवरील गंगासागर तलाव आणि हत्ती तलाव ऐतिहासिक आहेत. या तलावातून तसेच किल्ल्यांवर खोदलेल्या टाक्यांमधून निघणारा दगड किल्ल्याच्या बांधकामासाठी वापरला गेला. चार, नैसर्गिकरीत्या तयार झालेले तलावही निवडक किल्ल्यांवर पाहायला मिळतात. उदाहरणार्थ भुदरगडावरचा दुधसागर

तलाव, टंकाई किल्ल्यावरचा तलाव, नरनाळा किल्ल्यावरचा शक्कर तलाव इत्यादी. हे तलाव आकाराने मोठे आहेत. पाच, काही किल्ल्यांवर बांधीव तलाव किंवा तळी आहेत. उदाहरणार्थ अहिवंतगड आणि महिमतगड इत्यादी अनेक किल्ल्यांवर बांधीव तलाव आजही पाहायला मिळतात. गडावरचे पाण्याचे नैसर्गिक स्रोत, उतार, पाण्याचा निचरा होण्याचा मार्ग यांचा अभ्यास करून असे तलाव बांधलेले आढळतात. याचाच अर्थ नैसर्गिक स्रोत, पाण्याचा उतार, पाण्याचा निचरा याबद्दलचे ज्ञान तलाव किंवा तळी बांधताना त्या काळात उपलब्ध होते.  बांधीव तलावाच्या चारही बाजू दगडांनी बांधून घेतलेल्या असतात. सहा, महादेव कोळी राजा नागनाथ (नागा) नाईक यांच्या ताब्यात सिंहगड पूर्वी होता. त्यांनी पाण्याची व्यवस्था देवटाके या स्वरूपात केली होती. सिंहगडावर देवटाके आहे. या देवटाक्यातील पाणी पिण्यासाठी आजही सिंहगडावर वापरले जाते.  महात्मा गांधी जेव्हा पुण्यास येत तेव्हा या देवटाक्याचे पाणी मागवत असत, असे बोलले जाते. सात, सुधागड (भोरपगड) किल्ला हा सह्याद्री पर्वतरांगामध्ये असलेला किल्ला आहे.

सुधागड किल्ल्याला भोरपगड असेही नाव आहे. शिवाजी महाराजांनी भोरप गडाचे नाव बदलून सुधागड किल्ला असे केले. सुधागड पठाराचे तीन विभाग होतात. पहिला विभाग म्हणजे वाड्यासमोरील पश्चिमेकडील पठार. या परिसरात तलाव आणि मोठी टाकी आहे. आठ, स्वराज्यात सपाट व नागरी वस्त्यांमध्ये शिवरायांनी विहिरी, तलाव, पाणवठे खोदून घेतले होते. रायगडावरील शिलालेखात रायगड बांधणाऱ्या हिरोजी इंदुलकर यांनी.. 'वापी, कुप, तडाग' असा उल्लेख केला आहे. हा या संदर्भातील महत्त्वाचा पुरावा आहे. इतर किल्ल्यांवरही पाण्याची मुबलक व्यवस्था लोकांना उपलब्ध करून दिली होती. या अर्थाने पाण्याचे नियोजन काटेकोरपणे केले होते.



## जंगल आणि पाणी

पाणी, वनस्पती आणि माणूस यांचे एकमेकांशी असणारे नाते शिवरायांनी ओळखले होते. शिवरायांच्या संघर्षमय जीवनातदेखील पर्यावरणाचे संतुलन ठेवणारी वन जीवन त्यांच्या नजरेआड झाली नाही. त्या काळची वनराई ही

भरमसाठ होती. त्याचा ऱ्हास शिवरायांनी होऊ दिला नाही. प्रत्येक गडावर व गड परिसरात शिवरायांनी आंबा, वड, नारळ, शिसव, बाभूळ, यांची लागवड केली होती. आरमारासाठी साग व शिसवी झाडे वापरली जात असत. फळ, फळांवरासाठी आंबा, चिकू, फणस इत्यादी झाडे इतकेच नव्हे तर राजकीय संदेश वहनासाठी काळा धूर व पांढरा धूर सोडणारी झाडेही शिवरायांनी खास लावली होती. त्यांचा उपयोग राजकीय परिभाषा म्हणून केला होता. शिवराय निसर्गसंवर्धनाबाबत जागरूक होते. हा मुद्दा आज्ञापत्रामध्ये स्पष्ट होतो. उदाहरणार्थ 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये' हे शिवरायाचे तत्त्व होते. अगदी गरज पडल्यास शेतकऱ्यास योग्य तो मोबदला देऊन झाडे खरेदी करावीत. रयतेस तोशीस पडता कामा नये. आंबा, फणस ही झाडे लेकरांसाठी वाढवली. मात्र सैनिकांनी बळजबरीने तोडल्यास त्यांच्या दु:खाला पारावार उरत नाही, अशी त्यांची भावना होती. पर्यावरण व रयतेच्या भावनांबाबतचे विचार पाण्याच्या संदर्भातील होते. शिवरायांचे समकालीन संत तुकाराम यांचा 'वृक्षवली आम्हा सोयरी वनचरे' हा अभंग शिवरायांच्या धोरणामध्ये सुस्पष्टपणे दिसतो. गड, परिसराच्या मोकळ्या जागा, बागायती जागा, डोंगरपायथ्याचे अनेक भूखंड त्यांनी ओलिताखाली आणले. त्यासाठी जाणीवपूर्वक झाडे वाढवली होती. थोडक्यात पाण्याप्रमाणे त्यांनी शेतीचे धोरण देखील लवचिक स्वरूपाचे निश्चित केले होते.

## विहिरी

शिवरायांच्या काळात विहिरींचे खोदकाम करण्यात आले. विहिरीचे बांधकाम देखील त्यांनी करून घेतले होते. या संदर्भातील काही निवडक उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, जिजाऊ पाचवडला राहत होत्या. त्यांच्यासाठी वाडा बांधला होता. त्या वाड्यात दोन विहिरी बांधल्या होत्या. यापैकी एका विहिरीला तक्क्याची विहीर म्हणतात. हा वारसा पुढे वीरबाई यांनी चालविला. वीरबाई यांनी बारा मोटांची विहीर सातारा जिल्ह्यातील नागेवाडी पासून जवळ खोदून घेतली होती. त्या विहिरीवर देखील तक्क्या आहे. त्या विहिरीत एक महाल देखील बांधला होता. वीरबाई या सातारा येथील राज घराण्यातील होत्या. दोन, सिंधुदुर्ग किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्या काळातील गोड्या पाण्याच्या दगडी विहीरी आहेत. त्यांची नावे दूध विहीर, साखर विहीर व दही विहीर अशी आहेत. सिंधुदुर्ग हा जलदुर्ग या प्रकारचा किल्ला आहे. तीन, कुलाबा हा किल्ला जलदुर्ग असला तरीही किल्ल्यावरती गोड्या पाण्याच्या विहिरी हे किल्ल्याचे वैशिष्ट्य आहे.

## बाजी पासलकर जलाशय

बाजी पासलकर यांची आधुनिक काळातील अस्मिता पाण्याची संबंधित जपली जाते. उदाहरणार्थ पुण्याजवळील वरसगाव धरणातील जलाशयाला बाजी पासलकर यांचे नाव देण्यात आले आहे. धरणाच्या जलाशयात त्यांचा चिरेबंदी वाडा तसेच त्यांच्या वंशजांची जमीन बुडाली आहे.







## स्वच्छता आणि पाणी

शिवरायांनी सतराव्या शतकात आपल्या गडकोटात शौचकुपांची व्यवस्था केली होती. आजच्या काळातही आवर्जुन जाऊन बघावी अशी मलमूत्र विसर्जनाची अनोखी व्यवस्था केली होती. शिवरायांच्या पर्यावरण व ग्रामस्वच्छतेचा दृष्टिकोन निकोप व सर्जनशील होता, याचे हे उत्तम उदाहरण ठरते. आजच्या काळात निर्मल ग्राम स्वच्छता अभियान राबवले गेले. परंतु १७व्या शतकात अशा प्रकारची योजना शिवरायांनी राबवली होती. एक, आजही प्रतापगडाच्या पूर्वेकडील बुरुजात शौचकुपांचा त्या काळातील पुरावा दिसतो. दोन, रायगड, राजगड, पुरंदर येथील शौचकुपे सुस्थितीत आजही आहेत. तीन, पहारेकरी सैनिकांसाठी शौचकुपाची व्यवस्था शिवकाळात केली होती. पहारेकरी हा वर्ग सामान्य जन या प्रकारचा होता. म्हणजेच शिवकाळात सामान्य जन



आणि राज्यकर्ता वर्ग या दोन्ही वर्गांसाठी समान धोरण आखले गेले होते. चार, मलमूत्र खोल तटबंदी बाहेर दरीत पडण्याची व्यवस्था केली होती. पाच, सिंधुदुर्ग या जलदुर्गावर चाळीस शौचकूप बांधलेले पुरावे आजही आहेत. शिवराय काळाच्या पुढे होते, याचे हे पुरावे आहेत. शिवराय जलसंवर्धन, वनसंवर्धन व ग्रामस्वच्छता यासारख्या योजनांचे जनक होते.

## पाण्याच्या बद्दलचे संघर्ष

शिवरायांच्या काळात पाण्याच्या बद्दलचे संघर्ष उभे राहिले होते. शिवरायांनी पाण्याच्या बद्दलचे संघर्ष सोडविले होते. या संदर्भातील दोन उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत. एक, शिवरायांनी शेतीसाठी पाण्याची व्यवस्था केली होती. याबद्दलचे उत्तम उदाहरण म्हणजे नसरापूरचा तलाव दुरुस्त करण्यात आला होता. नसरापूरच्या तलाव दुरुस्त करण्यासाठी त्या काळात मोठा खर्च आला होता. त्यापैकी निम्मा खर्च लोकवर्गणीतून जमा झाला होता. शेतीसाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी शिवरायांनी लोकवर्गणी ही संकल्पना विकसित केली होती. विशेष म्हणजे या संकल्पनेमध्ये सहकार ही गोष्ट मध्यवर्ती होती. पाण्याच्या बद्दलची सहकाराची संकल्पना यामुळे शिवकाळात जन्मास आली होती. दोन, दुसरे एक उदाहरण म्हणजे १६७६ साली आजच्या नाशिक जिल्ह्यातील बाणगंगा नदीवर बांध घालण्यावरून मोहाडी आणि जानोरी गावात तंटा उभा राहिला होता. तेव्हा न्याय निवाडा करून बांधाचे काम सुरू ठेवण्यात आले. त्यांनी पाण्याचा प्रश्न नैसर्गिक मानला होता. परंतु पाण्याचा प्रश्न राज्यसंस्था सोडवेल अशी भूमिका या न्यायनिवाड्यात शिवरायांनी घेतली होती. तीन, कोकण विभागात वेगळ्या पद्धतीचे बंधारे शिवकाळात बांधले गेले होते. यासंदर्भातील नोंदी मोडी लिपीत आहेत. चार, शिवरायांनी शेतीबरोबर व्यापारी वर्गालाही पाणीपुरवठा केला होता. पाषाण, जिजापूर, मलपुरा, खेळपुरा या पेठा निर्माण केल्या होत्या. या पेठांमध्ये पाण्याची व्यवस्था त्यांनी व्यापारी वर्गासाठी केलेली होती. शिवरायांनी पाण्याचे धोरण कृषी, उद्योग, व्यापार अशा वेगवेगळ्या पद्धतीने विकसित केले होते. तसेच त्यांनी पाणी हा घटक संस्कृती विकसित करणार आहे हा मुद्दा समजून घेतला होता. त्यांचे पाण्याचे धोरण आधुनिक काळात वेळोवेळी व्यक्त होत राहिलेले आहे. विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेवेळी यशवंतराव चव्हाण यांनी सागरी किनाऱ्याचे महत्त्व आपल्या भाषणांमध्ये नोंदविले होते. यशवंतराव चव्हाण यांनी विधानसभेत सागरी किनाऱ्यांबद्दलचे भाषण केले होते. त्यांनी महाराष्ट्रात धरणांचे बांधकाम करून शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी आणि उद्योग यांना पाणीपुरवठा करण्याचे सूत्र विकसित केले होते. तसेच पुढे दैनिक सकाळच्या एका कार्यक्रमात शरद पवार यांनी सागरी किनाऱ्यांच्या विकासाबद्दलचा विचार मांडला होता. डाव्या चळवळीतील कॉम्रेड दत्ता देशमुख, बाबा आढाव, भारत पाटणकर, संपत देसाई, यांनी न्याय पाणी वाटप विषयक चळवळी कृतिशील केलेल्या आहेत. डॉ. सुधीर भोंगळे यांनी स्वतंत्रपणे महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न अभ्यासलेला आहे. त्यांनी पाणी आणि शेती यांच्यातील संबंध स्पष्ट केले आहेत. तसेच मधु कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या चौकटीत आजचे प्रश्न मांडताना न्याय पाणी वाटपाचा विचार मांडला आहे. म्हणजेच थोडक्यात शिवरायांचा पाणी विषयक विचार महाराष्ट्रामध्ये आजही प्रवाही असल्याचे दिसते.

संदर्भ- १) गर्गे ब. गो. व घाटे द्वा. वा. (संपादक), १९३९, मराठीशाहीतील आज्ञापत्र, बाबुराव चिमटे, धनतोली नागपूर.

■■

**मराठ्यांच्या इतिहासाचे एक भाष्यकार, संशोधक, लेखक, संपादक त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा ५९ वा स्मृतीदिन या नोव्हेंबर महिन्यात आहे. त्यांचे स्मरण करणे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या कारकीर्दीचा थोडक्यात आढावा घेऊयात.**

# इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर

प्रा.डॉ. गणेश राऊत



शेजवलकरांचा जन्म राजापूर तालुक्यातील कशेळी गावात झाला. शेजवलकर आणि रियासतकार सरदेसाई यांचा जन्म एकाच जिल्ह्यात झाला तो म्हणजे रत्नागिरी. आणखी एक योगायोगाची गोष्ट म्हणजे दोघांनी अखेरचा श्वास घेतला तोही पुणे जिल्ह्यातच. शेजवलकरांचे शालेय शिक्षण आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतून झाले. मुंबईतीलच विल्सन महाविद्यालयातून ते पदवीधर झाले.

एम. ए. ही पदवी मिळविण्यासाठी त्यांनी 'मुसलमानी संस्कृतीचा हिंदू संस्कृतीवरील प्रभाव' हा प्रबंध सादर केला. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षकांशी मतभेद झाल्यामुळे त्यांना ही पदवी मिळू शकली नाही. मात्र हा प्रबंध त्यांच्या मृत्यूनंतर इंग्रजीत प्रसिध्द झाला. बी. ए. झाल्यावर पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून मुंबईतील लष्कराच्या लेखा विभागात कारकीर्दीचा श्रीगणेशा शेजवलकरांनी केला. पुढे हे कार्यालय पुणे शहरात वानवडी येथे गेले. शेजवलकर पुण्याला आले आणि नोकरीला तीन वर्षे पूर्ण व्हायच्या आतच त्यांनी नोकरीस रामराम ठोकला. त्यांच्या सरकारी नोकरीची इतिश्री पुण्यात झाली.

पुणे मुक्कामी त्यांच्या आयुष्यात इतिहासाचे वळण आले. ते भारत इतिहास संशोधक मंडळात जाऊ लागले. येथे रियासतकार सरदेसाई, दत्तो वामन पोतदार आणि दत्तोपंत आपटे यांच्याशी त्यांचा संपर्क झाला. रियासतकार सरदेसाई यांच्या निमंत्रणावरून ते बडोदा येथे गेले. रियासतकार शेजवलकरांच्या प्रतिभेवर खूष होते. वयाने आणि इतिहासाच्या क्षेत्रात ज्येष्ठ असून सुध्दा रियासतकारांनी आपल्या 'नानासाहेब पेशवे' या पुस्तकाची प्रस्तावना लिहायला सांगितली. शेजवलकरांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन स्वतःच्या प्रज्ञेला अनुसरून भिन्न मतप्रदर्शन आणि विचारप्रवर्तक दीर्घ प्रस्तावना लिहिली. ही प्रस्तावना त्या काळात खळबळजनक ठरली. या संदर्भात सरदेसाई लिहितात – '' इतके व्यासंगी, बुद्धिमान व विद्वान गृहस्थ माझ्या पाहण्यात फारच थोडे आहेत. कित्येक महत्त्वाच्या बाबतीत त्यांचा माझा मतभेद असून तो जाहीर रीतीने वाचकांसमोर मांडल्यास त्यापासून इतिहासाचा फायदा होईल अशा बुध्दीने ती छापली आहे. ती लिहिण्याचे कबूल करून त्यांनी माझा मोठा गौरव केला आहे असे मी समजतो''. या प्रस्तावनेमुळे शेजवलकरांचे स्थान मराठ्यांच्या इतिहासकारांपैकी एक साक्षेपी इतिहासकार




असे झाले. पुढे या दोन स्वयंप्रज्ञ माणसांना एकत्र काम करणे अवघड झाल्याने त्यांनी पत्रकारितेकडे धाव घेतली.

मुंबईतील कर्नाटक प्रेसने सुरू केलेल्या 'प्रगति' या साप्ताहिकाचे संपादक म्हणून त्यांनी तीन-चार वर्षे काम केले. १९२९ ते १९३२ या काळात त्यांनी पत्रकारिता केली. आर्थिक, सामाजिक, राजकीय, ललित, धार्मिक, ऐतिहासिक अशा विविध विषयांत त्यांनी मुशाफिरी केली. 'प्रगति' ला एक दर्जा प्राप्त करून दिला. तो पारतंत्र्याचा काळ असल्यामुळे ब्रिटीश शासनाचा रोष त्यांच्यावर झाला आणि 'प्रगति' बंद झाले. पुढची सात वर्षे वेगवेगळ्या गोष्टीत मन रिझविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

१९३९ मध्ये सध्याचे अभिमत विद्यापीठ आणि तेव्हाचे डेक्कन कॉलेज, पुणे येथे ते इतिहासाचे प्रपाठक झाले. १९५५ निवृत्त झाल्यावर सुध्दा काही काळ ते गुणश्री प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. २८ नोव्हेंबर १९६३ रोजी पुणे शहरात त्यांनी अंतिम श्वास घेतला.

शेजवलकरांच्या लेखन प्रवास विलक्षण आहे. शेजवलकरांचे मित्र आणि विश्रब्ध 'शारदा' कर्ते ह. वि. मोटे यांनी शेजवलकरांचे 'प्रगति' मधील गाजलेले लेख एकत्र केले. यातून 'शेजवलकरांचे लेख-प्रथम खंड' आणि 'शेजवलकरांचे लेख - खंड २ रा' असे दोन खंड प्रकाशित झाले. शेजवलकर महाराष्ट्रातील दुर्मिळ इतिहास लेखकांपैकी एक होत कारण त्यांनी इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये लेखन केले. यात दत्तोपंत आपटे, व्यक्तिदर्शन, पानिपत १७६१ (इंग्रजी), निजाम-पेशवे संबंध, पानिपत १७६१ (मराठी), नागपूर अफेअर्स भाग १ व २ (संपादन), कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी, संपादित ग्रंथामध्ये विभावरीचे टीकाकार, लाला लजपतराय यांचे आत्मचरित्र व चरित्र, मोत्याचे कणीस या प्रमुख कृतींचा समावेश आहे.

शेजवलकरांचे चिरंतन स्मारक म्हणजे शिवचरित्र. मुंबईस्थित मराठा मंदिर या संस्थेने त्यांच्याकडे शिवचरित्र लिहिण्याचे काम दिले. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांच्याकडे ही जबाबदारी आली होती. प्रकृती साथ देत नव्हती. अशाही अवस्थेत त्यांनी जबरदस्त काम केले. त्यांच्या मृत्यूनंतर 'श्री शिवछत्रपति - संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने' हा ग्रंथ प्रसिध्द झाला. या ग्रंथास साहित्य अकादमीचा पुरस्कार (मरणोत्तर) जाहीर झाला. १९६४ मध्ये प्रसिध्द झालेल्या ग्रंथाने त्यांना दिगंत कीर्ती मिळवून दिली. १९७७ मध्ये ह. वि. मोटे प्रकाशन यांनी 'त्र्यंबक शंकर शेजवलकर निवडक लेखसंग्रह' प्रकाशित केला. येथे शेजवलकरांचे लेखन थांबले.

श्री शिवछत्रपती आणि पानिपत या दोन स्वतंत्र ग्रंथांमधून शेजवलकरांच्या विलक्षण प्रतिभेचे, कष्टांचे आणि वेगळी वाट पकडण्याचे कौशल्य दिसते. शिवचरित्रासाठी त्यांनी प्रस्तावना, लेख टिपणे, चरित्राचा आराखडा, ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे, कौटुंबिक माहिती इ. साहित्य संकलन केले. मराठी विश्वकोश १८ मध्ये शेजवलकरांवर





टिपण लिहिणारे सु. र. देशपांडे या संदर्भात लिहितात – ''या ग्रंथावरून शेजवलकरांचा प्रदीर्घ व्यासंग, स्वतंत्र प्रज्ञा आणि निर्भिड ऐतिहासिक दृष्टीकोन यांचे प्रत्यंतर येते. हे अपूर्ण शिवचरित्र पुढील पिढीस एक अत्यंत विश्वसनीय असा संदर्भग्रंथ ठरले आहे.'' पानिपत ग्रंथासंदर्भात देशपांडे लिहितात – ''पानिपत हा ग्रंथ शेजवलकरांनी जदुनाथ सरकारांचे दोषपूर्ण विवेचन व मराठ्यांवरील अन्यायकारक टीका, याला उत्तर म्हणून लिहिला. विविध प्रकारच्या ऐतिहासिक साधनांची सूक्ष्म चिकित्सा, नकाशांचा सूक्ष्म अभ्यास, प्रत्यक्ष भेटी देऊन भौगोलिक स्थळांचे सूक्ष्म निरीक्षण, आंतरशाखीय दृष्टी यांचा ताळमेळ घालून हा ग्रंथ लिहिला आहे. इतिहास संशोधन पध्दतीत या ग्रंथाने एक उच्च मानदंड निर्माण केला आहे. त्यांचे लेखन अभ्यासपूर्ण, चिकित्सक, विचारप्रवर्तक, अन्वयार्थी आणि बहुआयामी आहे.


मराठ्यांचा सर्वांगीण इतिहास हा त्यांचा अभ्यासविषय होता. पेशवाईच्या कालखंडात शिवाजी महाराजांच्या धोरणापासून जी फारकत घेतली गेली, तिच्यावर बोट ठेवून आणि मराठ्यांच्या अवनतीसाठी पेशव्यांना जबाबदार धरून त्यांनी कठोर चिकित्सा केली. स्वातंत्र्य, समता व बंधुता या फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्त्वत्रयीमुळे शेजवलकर प्रभावित झाले होते. या तत्त्वांच्या निकषावर त्यांनी वेळोवेळी केलेली ऐतिहासिक चिकित्सा अभ्यासनीय आहे. भूतकाळाबाबत अशी चर्चा करतानाच वर्तमानाच्या संदर्भात राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा या दोहोंचा मेळ घालण्यावर त्यांनी भर दिला. इतिहासाचार्य राजवाडे यांच्याप्रमाणे फटकळ व आग्रही तसेच प्रखर बुद्धिमत्तेचे आणि चतुरस्र विद्वान म्हणून शेजवलकर ओळखले जातात. ते निव्वळ संकलक-संशोधक नव्हते, तर इतिहासाचे प्रतिभावंत भाष्यकार आणि समाजचिंतक होते. आधुनिक मराठी इतिहासलेखन परंपरेत तात्त्विक, बहुशाखीय आणि स्वयंभू मर्मदृष्टी लाभलेल्या न्यायमूर्ती म. गो. रानडे व वि. का. राजवाडे यांच्यासारख्या मोजक्या इतिहासकारांमध्ये शेजवलकर यांची गणना करावी लागेल.

गं. दे. खानोलकर लिहितात – महाराष्ट्रात ज्ञानाच्या एखाद्या क्षेत्रात स्वतःला स्थिर करून घेऊन निरलसपणे, श्रेष्ठ प्रतीच्या जिज्ञासेने कडकडीत विरागी वृत्तीने त्याची सेवा करणारे, आणि त्यातून प्राप्त झालेले फळ समाजास अर्पण करण्यात परमोच्च आनंद मानणारे नव्हे असे करणे हे आपले जीवितकर्तव्यच आहे असे मानणारे जे काही विद्याव्यासंगी विद्वान अत्यल्प प्रमाणात आढळतात त्यांपैकी शेजवलकर हे एक होत.

■■

## स्वतः ब्राह्मण तरी ब्राह्मणावर परखड टीका

**लोकहितवादींप्रमाणेच स्वतः ब्राह्मण असूनही ब्राह्मणांवर टीकेची झोड उठविणारे एक अपवादात्मक व्यक्तिमत्त्व म्हणून शेजवलकरांकडे बोट दाखविता येईल. व्यक्ती म्हणून नव्हे तर प्रामुख्याने वर्ग म्हणून ते ब्राह्मणांवर परखड टीका करतात. ब्राह्मणत्वाचे संकुचित अभिमानी यामुळे घायाळ झाले असले तरी ते स्वाभाविक म्हटले पाहिजे! पेशवाईच्या कठोर मीमांसेमुळे शेजवलकरांवर चित्पावन द्वेष्टेपणाचा ठपका ठेवला गेला. पण खरे तर एका सामाजिक प्रवर्गावर ऐतिहासिक परिप्रेक्षातून ओढलेले ताशेरे संकुचित जातीयवादाच्या चौकटीत बसवणे अन्यायकारक आहे. शेजवलकर हे संकुचित जातीयवादी असते तर वि.का. राजवाड्यांवरील एका लेखात त्यांनी चित्पावनांना प्रशस्तिपत्रक देऊन ''चित्पावनांचे यश त्यांच्या त्यागाच्या पराकाष्ठेत, एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविण्याच्या चिकाटीत, एकांतिक अढळ निष्ठेत, अविश्रांत उद्योगात व सुखलालसेच्या विन्मुखतेत आहे. जोवर या गुणांची योग्यता जगात मोठी मानली जात आहे, तोवर त्यांचे यश चिरंजीव आहे,'' या शब्दात गौरव केला नसता!**






# रिसायतकार सरदेसाई

**प्रा.डॉ. गणेश राऊत**

**महाराष्ट्र आणि अखिल भारतीय पातळीवरील एक थोर इतिहासकार म्हणजे रिसायतकार सरदेसाई. त्यांच्या मृत्यूला या नोव्हेंबर महिन्यात ६३ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांचे कृतज्ञ स्मरण करणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या जीवनचरित्राचा थोडक्यात आढावा घेऊन इतिहास लेखनाचा मागोवा घेऊयात.**

जीवनचरित्र - गोविंद सखाराम सरदेसाई उर्फ रिसायतकार यांचा जन्म १७ मे १८६५ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गोविल गावी झाला. त्यांनी अखेरचा श्वास पुणे जिल्ह्यातील कामशेत येथे २६ नोव्हेंबर १९५९ रोजी घेतला. सखाराम व गंगाबाई यांच्या पोटी गोविंदरावांचा जन्म झाला. गोविंदरावांचे शालेय शिक्षण शिपोशी, मॅट्रिकचे शिक्षण रत्नागिरी, बी. ए. मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण झाले. शिकत असतानाच तत्कालीन रूढीप्रमाणे त्यांचा विवाह गंगूताई कीर्तने यांच्याशी झाला. पुढे त्यांचे नाव लक्ष्मीबाई ठेवण्यात आले.

१८८९ मध्ये ते बडोद्यास सयाजीराव गायकवाड महाराजांकडे दरबारात वाचक म्हणून नोकरीस लागले. पुढे रीडर ते टीचर असा त्यांचा प्रवास झाला. सुरूवातीला त्यांचा पगार सत्तर रूपये होता. दरबारात काही काळ त्यांनी हिशेबनिसाचेही काम केले. गायकवाड घराण्यातील राजकुमारांना शिकविताना त्यांना परदेशात विशेषतः युरोपात जाण्याची संधी मिळाली. त्यांनी संपूर्ण भारत, इंग्लंड आणि युरोपातील देशांचा पाच वेळा प्रवास केला. याचा त्यांच्या पुढील जडण-घडणीवर मोठा परिणाम झाला. १९२५ मध्ये ते निवृत्त झाले. निवृत्तीनंतर कामशेत येथे त्यांच्या आयुष्यातील दुसरे पर्व सुरू झाले.




बडोद्यात वाचून दाखविण्यासाठी, शिकविण्यासाठी कठीण शब्दांचे अर्थ सांगण्यासाठी त्यांनी टिपणे काढली होती. या टिपणांचा उपयोग करून त्यांनी रिसायती आकारास आणल्या. त्यांच्या इतके विपुल लेखन, संपादन, संकलन मराठी भाषेत अन्य कोणाही इतिहासकाराने केले नाही म्हणूनच जागतिक पातळीवर गाजलेले थोर भारतीय इतिहासकार जदुनाथ सरकार यांनी सरदेसाईंना 'मराठ्यांचा सर्वश्रेष्ठ विद्यमान इतिहासकार' आणि 'इतिहासयोगी' (A Hermit of History) असे म्हटले आहे.


सरदेसाई यांना श्यामकांत आणि श्रीदत्त अशी दोन मुले होती. श्रीदत्त वयाच्या ११ व्या वर्षी म्हणजे अकाली मृत्यू पावला. श्यामकांत जर्मनीला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेला. तो पीएच डी झाला. जर्मनीतच त्याचे निधन झाले. एवढ्या मोठ्या आघातातून त्यांनी स्वतःला सावरले. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी या संदर्भात रिसायतकारांवर योग्य टिप्पणी केली आहे. साहित्यसम्राट लिहितात -'' इतिहासालाच त्यांनी आपला मुलगा मानलेला आहे''.


इतिहास लेखनामुळे रियासतकारांना लोकमान्यता व राजमान्यता मिळाली. ब्रिटिश सरकारने त्यांना रावसाहेब, रावबहादूर या सन्मानदर्शक पदव्या तर भारत सरकारने पद्मभूषण हा नागरी बहुमान दिला. राजवाडे संशोधन मंदिर (धुळे) यांनी 'इतिहासमार्तंड' ही पदवी व सुवर्णपदक दिले. पुणे विद्यापीठाने मानद डॉक्टरेट, डी. लिट. दिली. जयपूर येथील अखिल भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. सातारा दरबारकडून आणि भोरच्या पंतसचिवांकडून त्यांना महावस्त्र


देऊन गौरविण्यात आले होते. बडोदेकरांकडून त्यांना शाल, मानपत्र देण्यात आले होते. 'माझी संसारयात्रा' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. कृतार्थ आयुष्य जगून भारतीय इतिहासावर त्यांनी स्वतःची अमीट नाममुद्रा उमटवून अखेरचा श्वास घेतला.


सरदेसाई यांच्याबद्दल इतिहासकार अ. रा. कुलकर्णी लिहितात – ''ग्रँट डफ नंतर मराठ्यांचा इतिहास संपूर्णपणे मराठी आणि इंग्रजी भाषेतून लिहिणारे एकमेव इतिहासकार म्हणजे गोविंद सखाराम सरदेसाई. किंकेडचा इतिहास जेम्स ग्रँट डफच्या इतिहासाला बाजूला सारू शकला नाही पण सरदेसायांनी मात्र ते यश संपादन केले. मराठ्यांच्या इतिहासावर इतके विस्तृत आणि विपुल लेखन करणारा इतिहासकार आजवर झालेला नाही.










## रियासतकार गो. स. सरदेसाई यांची ग्रंथसंपदा

### 'रियासती' व इतिहासविषयक ग्रंथ

१) मुसलमानी रियासत – पूर्वार्ध व उत्तरार्ध
२) मराठी रियासत – तेरा भाग
३) ब्रिटिश रियासत – पूर्वार्ध व उत्तरार्ध
४) मराठी रियासत – गुजराती अनुवाद – पूर्वार्ध व उत्तरार्ध
५) ग्रीस देशाचा इतिहास
६) सरदेसाई घराण्याचा इतिहास
७) अव्वल मराठेशाहीचे अंत: स्वरूप
८) ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी
९) ऐतिहासिक पत्रबोध
१०) राजा शिवाजी
११) शिवाजी महाराजांची बिरुदे
१२) चित्रमय हिन्दी राजवंश व मोगल बादशहा

इतिहासविषयक संपादित, संशोधित ग्रंथसूची वगैरे

१३) पेशवे दप्तर १ ते ४५ खंड
१४) ऐतिहासिक पत्रव्यवहार – कृ. पां. कुलकर्णी व या. मा. काळे ह्यांचेसह
१५) ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे
१६) ऐतिहासिक विषयांची सूची
१७) 'काव्येतिहास संग्रहा'त प्रसिद्ध झालेले लेख, पत्रे, यादी वगैरे – या. मा. काळे व वि. स. वाकसकर ह्यांचेसह.
१८) रा. ब. पारसनीस कृत 'इतिहास संग्रह' व 'भारतवर्ष' या दोन मासिकांतील विषयांची/चित्रांची सूची.
१९) मराठ्यांच्या इतिहासाचे साहित्य – त्र्यं. शं. शेजवलकर व द. वि. आपटे ह्यांचे सह.
२०) 'परमानंदकाव्यम्
२१) 'अणुपुराण'
२२) महादजी शिंदे यांची पत्रे
२३) भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तातील, त्रैमासिकातील विषयांची सूची.

इतिहासविषयक शालोपयोगी व बालोपयोगी ग्रंथ –

२४) शालोपयोगी भारतवर्ष
२५) बालोपयोगी महाराष्ट्राचा इतिहास
२६) महाराष्ट्राच्या इतिहासाच्या सोप्या गोष्टी २७)

हिंदुस्थानचा प्राथमिक इतिहास
कै. श्रीमंत सयाजी महाराज ह्यांच्या भाषांतर मालेसाठी भाषांतरित ग्रंथ
२८) सिलीकृत एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंडचे 'इंग्लंड देशाचा विस्तार'
२९) मॅकॅव्हिली कृत 'दि प्रिन्स' चे 'राजधर्म'
इंग्रजी भाषेतील ग्रंथ
३०) न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठाज् तीन खंड
३१) मेन करंटस् ऑफ मराठा हिस्ट्री
३२) शिवाजी सोविनियर
३३) हॅन्डबुक टू दि रेकॉर्डस् इन् दि ओलिनेशन ऑफीस
३४) पूना रेसिडेन्सि कॉरस्पॉन्डन्स् – पाच खंडांचे संपादन
आत्मचरित्र, कौटुंबिक स्वरुपाचे ग्रंथ –
३५) श्यामकांतची पत्रे
३६) माझी संसार यात्रा

**तत्कालीन, स्फुट लेखन...**

'विविध ज्ञान विस्तार', 'रत्नाकर', 'मनोरंजन', 'चित्रमयजगत' 'सह्याद्रि' इ. अनेक नियतकालिकांमधून विविध विषयांवरील २७५ लेख.

आपल्या लेखनाबद्दल सरदेसाई असे लिहितात की, इ. स. १९०० साली मराठ्यांचा इतिहास किती तुटपुंजा होता आणि आज त्याला भरीव रूप कसे आले, हा विचार माझ्या मनात आला म्हणजे या महनीय कामात आपलाही थोडाबहुत हातभार लागला याबद्दल कृतकृत्यता वाटते."

''मराठ्यांच्या विषयीचे गैरसमज दूर करणे हा या लेखनामागील प्रमुख हेतू आहे. मराठ्यांचा इतिहास हा एका विशिष्ट समाजाचा अथवा प्रदेशाचा ठेवा नसून, सर्व भारतीयांना स्फूर्ती, शहाणपणा आणि सावधानता देणारे एक साधन आहे असे वाटले पाहिजे. मराठ्यांच्या शत्रूंनी आणि विरोधकांनी त्यांना दीर्घ कालापासून समजावून न घेतल्याने मराठ्यांचे, विशेषतः त्यांच्या –हासाच्या आणि तदनंतरच्या काळाचे वर्णन कृष्णवर्णातच अधिक केले आहे. या अशा इतिहासावरून वाचकांना मराठ्यांच्याकडे जमेची बाजू काहीच नाही असे वाटण्याची भीती आहे. तेव्हा मराठ्यांची कैफियत निःपक्षपाती जनते समोर मांडण्यासाठी आपण इतिहास लेखन केले आहे.''

''इतिहास लेखकाने आपली भूमिका न्यायाधीशाप्रमाणे सर्वथा निर्विकार ठेवली पाहिजे. जसा पुरावा पुढे येईल तसा तसा आपला निष्कर्ष बदलत जावा. त्यात पूर्वग्रह बिलकूल असू नये.''

''हिंदुस्थानच्या समग्र भागांतील अनेक लहानमोठ्या व्यक्तींस पत्रे लिहून नानाविध माहिती मी मागविली आणि बहुतेकांनी ती मला संतोषाने पुरविली. या उपकारांची फेडही मी तितक्याच तत्परतेने केली आहे. मी ज्याप्रमाणे अनेकांकडे वाचना करीत आलो, तशीच याचना मजकडे करणारे लोकही काही थोडे नाहीत. त्यांना मी आपल्या शक्तीप्रमाणे ताबडतोब पूर्ण संदर्भासह, नीट समजूत पडेल अशा प्रकारे प्रत्येकास सदैव माहिती पुरवीत आलो आहे. त्यात कितीही श्रम पडले तरी कधी कंटाळा मानला नाही की पृच्छक लहानमोठा कोण आहे याची पर्वा मी कधी केली नाही. आज पन्नास वर्षे हा माझा एक मोठा उद्योगच झाला असून कामशेतला ग्रंथसंग्रह हाताशी व वेळेची सवड म्हणूनच मला हे काम करता आले आहे. त्याजबद्दल सर्वाकडून मला भरपूर दुवाही मिळत आला आहे. इ.स. १९०० साली मराठ्यांचा इतिहास किती तुटपुंजा होता आणि आज त्याला भरीव रूप कसे आले आहे हा विचार माझ्या निरनिराळ्या आवृत्यांतून नजरेस आला म्हणजे या महनीय कामात माझाही थोडाबहुत हातभार लागला याबद्दल मला कृतकृत्यता वाटते. जगातील सर्वच कामे अशा अनेकांच्या उद्योगाने सिद्ध होतात. मात्र विषयाची जितकी परिपूर्णता होत जाते तितके त्यातले दोष किंवा उणीवाही जास्त नजरेत येऊन तदनुसार लेखकाच्या भावी उद्योगाला तेज चढ़ते. सुधारणेला शेवट कधीच नसतो."

''प्रसिद्ध झालेल्या कृतीतील दोष लोकांनी दाखविले म्हणजे मी विव्हळ होऊन केव्हा या चुका दुरुस्त करीन अशी मला उत्कंठा लागे. लोकांच्या मनांत चुकीचे ग्रह उत्पन्न करण्याचा मला बिल्कुल हक्क नाही. ते मी पाप समजतो त्यापेक्षा गप्प बसणे बरे. माझ्या लेखावर विसंबून लोक त्यांचा उपयोग करतात यास्तव झालेल्या चुकांची सुधारणाही मी शक्य तितक्या त्वरेने करीत आलो आहे."

''मी आपले दोष सुधारण्याची संधी कधी वाया दवडली नाही."

''इ. स. १९०० साली मराठ्यांचा इतिहास किती तुटपुंजा होता आणि आज त्याला भरीव रूप कसे आले, हा विचार माझ्या मनात आला म्हणजे या महनीय कामात आपलाही थोडाबहुत हातभार लागला याबद्दल कृतकृत्यता वाटते."

रियासतकारांचे मराठ्यांच्या इतिहासावर असणारे ऋण न फेडता येण्याजोगे आहे. यासंदर्भात स. मा. गर्गे लिहितात, या रियासतींनी मराठी इतिहासाच्या क्षेत्रात अभिजात ग्रंथाचे स्थान प्राप्त केले आहे. गेल्या चार पिढ्यातरी या रियासतींच्या साहाय्याने मराठ्यांचा समग्र इतिहास समजून घेतला जात आहे. मराठ्यांच्या इतिहासातील कोणताही संदर्भ शोधण्यासाठी वाचकाला या रिसायतीकडेच वळावे लागते. त्यामुळे या अभिजात ग्रंथाची लोकप्रियता टिकून आहे.

प्रस्तुत नव्या संपादित आवृत्तीच्या वेळीही पुन्हा एकदा हीच गोष्ट सिद्ध झाली आहे. यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

■■




# उबग आणणारी भक्ति की लाचारीचा कळस ?

अयोध्येतले गरीब-दीन लोक विश्वप्रिय ब्रह्मांडनायक आणि उत्तर प्रदेशाचे नायक मुख्यमंत्री यांचे आभार मानत आहेत.

तुमच्या मनात स्वाभाविक प्रश्न आला असेल की का बरं ?

तुम्हा मंडळींनी दिवाळीच्या आदल्या संध्याकाळी या अयोध्येत शरयू नदीच्या किनारी लक्ष-लक्ष दिवे उजळल्याची दृष्ये टीव्हीवर पाहिली असतीलच.

शरयू नदीच्या किनारी असलेल्या ३७ घाटांवर हा दीपोत्सव साजरा करण्यात आला.

पंधरा लाखाहून अधिक पणत्या किंवा दिवे लावण्यात आले होते. त्यासाठी सुमारे ६० हजार लिटर तेल वापरण्यात आले होते. या भागात मोहरीचे तेल खातात त्यामुळे दिव्यांमध्येही हेच तेल वापरण्यात आले होते. राज्य सरकार पुरस्कृत ही दीपोत्सव होता. भले सुप्रीम कोर्टाने सरकारने धर्मनिरपेक्षता पाळण्याचे मत व्यक्त करुनही उत्तर प्रदेश सरकार आणि केंद्र सरकारही बहुसंख्यक धर्माला कसे झुकते माप देतात त्याचाच हा नमूना आहे.

पण विषयांतर नको !

या दीपोत्सवाच्या निमित्ताने समोर आलेले भयानक वास्तवही चटके देणारे आहे. या दीपोत्सवाला देशाचे उत्सवप्रिय पंतप्रधान प्रमुख अतिथि होते. मुख्यमंत्रीही होतेच !

हजारो गरीब लोकही ते दृष्य डोळ्यात साठवत असतानाच हा उत्सव कधी संपतोय याची आतुरतेने वाट पहात होते.

कारण ????

या उत्सवाच्या प्रारंभीच त्यांना जाहीरपणे सांगण्यात आले होते की या दिव्यांमध्ये उरलेले तेल ते फुकट मोफत नेऊ शकतात ! त्यामुळेच हे गरीब दीनवाणे लोक हा उत्सव कधी संपतोय याची वाट पहात उभे होते.

उत्सव संपला पण अतिविशिष्ट मंडळी जाईपर्यंत पोलिस होते आणि दिव्यांमधील तेल गोळा करण्यासाठी आसुसलेले ते गरीब लोक पुढे सरसावताच त्यांनी त्यांच्यावर लाठ्या चालवल्या. पण गर्दी ती गर्दीच. अतिविशिष्ट मंडळी जाताच पोलिसही शिथिल झाले.

मग काय लोकांना दिव्यांवर झडप घालून स्वतःकडच्या प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये त्यातील उरलेले तेल ओतायला सुरुवात केली.

हे इतके गरीब दीन दुबळे लोक होते की त्यांनी त्याबद्दलही पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना धन्यवादच दिले.

गरीबीने त्यांच्यात स्वाभिमानही उरलेला नव्हता.

कारण.....................

सध्या मोहरीच्या(सरसों) तेलाचा भाव लिटरला २०० रुपये आहे !

अशा या महागाईत जर फुकट तेल मिळाले तर कुणाला नको आहे ?

विदारक..............विषण्ण करणारं हे वास्तव !






गरीबी आणि महागाई दीनदुबळ्यांना किती लाचार बनवते त्याचा हा जिताजागता नमूना !

अतिविशिष्ट मंडळींची मिजास आणि मस्ती पहा की आपण फार दानशूर असल्याचा आव आणत मोठे मन असल्याचे नाटक करीत त्यांनी दिव्यांमध्ये उरलेले तेल फुकट नेण्याची परवानगी गरीब लोकांना दिली !

कोवढे मोठे हे थोर उपकार ?

तेलाचे भाव कमी करण्यास किंवा महागाई कमी करण्यास प्राधान्य नाही. त्याऐवजी गरीब दीन दुबळ्यांना दिव्यातले उरलेले तेल गोळा करण्याची परवानगी देण्यात पुरुषार्थ मानणारी ही नपुंसक जमात फक्त उत्सवात मग्न आहे.

हे असले उत्सव करुन बहुसंख्यक समाजाची मते पदरात पाडण्याचा हा धंदा आहे !

तळमळे अवघी प्रजा............उत्सवी मग्न राजा अशी ही स्थिती आहे. काय पाळी आली आहे या देशावर आणि देशाच्या गरीब जनतेवर ??

रेवडी संस्कृतीवर टीका करणाऱ्यांनीच असली रेवडीबाजी करणे हा लबाडपणा व ढोंगीपणाचा कळसच मानावा लागेल.

ही संतप्त उद्विग्नता किती काळ चालणार आहे हे प्रभु रामचंद्रच जाणोत!

## चापलूसीचे दुसरे नाव....!

चापलूसी, चाटुकारिता, चमचेगिरी, हांजीहांजी, जी हुजुरी या भारतीय राजकारणातल्या काही लोकप्रिय संज्ञा आहेत.

इंदिरा गांधी यांच्या प्रशंसेत आपण कुणापेक्षा कमी ठरु नये यासाठी त्यावेळचे कॉंग्रेस अध्यक्ष देवकांत बरुआ यांनी 'इंदिरा इज इंडिया' असे म्हटल्यावर त्यांची यथेच्छ टिंगल केली गेली. त्या टिंगलीत आताचे वर्तमान सत्ताधारी आघाडीवर होते.

पण सत्तेत आल्यानंतर वर ज्या संज्ञांचा उल्लेख केला आहे त्यांची बाधा होत असावी.

२०१४ मध्येच 'हर हर मोदी' अशा घोषणा देऊन त्यांना देवत्व आणि 'देवांचा देव महादेव' यांच्या पंक्तीत नेऊन बसवण्यात आले होते.

नंतरच्या काळात तर त्यांना राष्ट्रपिता म्हणण्यापर्यंतही काही चापलूसखोरांनी मजल गाठली.

अर्थात अशा स्तुतिपाठकांचा गराडा हवाहवासा वाटतच असतो.

जेव्हा राजा स्वतःच बढाया मारणारा व फुशारक्याबाज असतो तेव्हा त्याचे अनुयायी चापलूसीचे नवनवे विक्रम करतील तर त्यात नवल ते काय ? ५६ इंचाच्या बढाया सर्वांनी ऐकलेल्या आहेतच !

स्वस्तुति आणि स्वनामधन्यतेने सध्याची राजवट ग्रस्त आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकांची अध्यक्षता पंतप्रधानच करीत असतात. परंतु सरकारी पत्रकात तसे उल्लेख पूर्वी नसायचे. पण २०१४ पासून पंतप्रधानसाहेबच बैठकीची अध्यक्षता करीत असल्याचे नावानिशी नमूद केले जात असते.

संसदेत प्रश्नोत्तराच्या तासात जवळपास बहुतेक मंत्री उत्तरे देताना 'पंतप्रधानांच्या कुशल मार्गदर्शनाखाली' देशाचा कारभार कसा स्वर्गीय पध्दतीने सुरु आहे अशी ग्वाही सातत्याने देत असतात.

'पंतप्रधानांचे मार्गदर्शन' एवढे व्यापक आहे की त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केल्याखेरीज सत्तापक्षातील कोणत्याही नेत्याचे भाषण पूर्ण होऊ शकत नाही. मंत्री तर त्या ऋणाचा सततच उल्लेख करीत असतात. त्यांच्या मंत्रालयाने केलेली सर्व कामगिरी ही 'पंतप्रधानांच्या मार्गदर्शना'मुळे साध्य झाली असते व त्याचे सर्व श्रेय पंतप्रधानांना दिले जात असते.

अगदी वरिष्ठ मंत्री देखील याला अपवाद नाहीत.

देशातले दुसऱ्या क्रमांकाचे शक्तिमान मंत्रीमहोदय माननीय गृहमंत्री देखील पंतप्रधानांना सर्व चांगल्या कामाचे श्रेय दिल्याखेरीज भाषण पूर्ण करीत नसल्याचे सर्वांनी अनुभवले असेल. या नियमाला एक मंत्री महोदय





अपवाद होते.

ते महाराष्ट्रातले नितिन गडकरी !

रा.स्व.संघाचा थेट पाठिंबा असलेले मंत्री म्हणून ते ओळखले जातात. त्यामुळेच ते काहीशे स्पष्टवक्ते म्हणून ओळखले जात. असेही सांगितले जाते की मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये देखील एखाद्या निर्णयाबद्दल शंका असल्यास ते स्पष्टपणे त्याबाबत प्रश्नही विचारत असत.

नोटाबंदीचा आततायी निर्णय केल्यानंतर देखील त्यांनी विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांना, 'या निर्णयाच्या परिणामांचे आकलन केले आहे काय' अशी विचारणा केल्याचे समजले होते. अर्थात ब्रह्मांडनायकांनी त्यांना उत्तर देणे फारसे प्रशस्त मानले नव्हते.

स्पष्टपणे प्रश्न विचारणारे मंत्री म्हणून त्यांची ओळख झालेली होती.

पण काळ बदलत असतो.





प्रथम त्यांच्याकडील अतिलघु-लघु व मध्यम उद्योगांचे खाते काढून घेण्यात आले. त्यानंतर त्यांना भाजपच्या सर्वोच्च निर्णय मंडळ असलेल्या केंद्रीय संसदीय मंडळातून अर्धचंद्र देण्यात आला. त्यांचे महत्व पध्दतशीरपणे कमीकमी करण्यात येऊ लागले.

आता या कारणामुळे किंवा कशामुळे माहीत नाही. पण त्यांच्या भाषेतही बदल होऊ लागलेला आढळतो. त्यांच्याकडील रस्ते-परिवहन व महामार्ग खात्याच्या कामगिरीबाबत त्यांनी केलेल्या अनेक ताज्या ट्वीटमध्ये 'मोदीजींच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली', 'मोदीजींचे आत्मनिर्भर भारताचे स्वप्न', 'नरेंद्र मोदीजी' असे शब्द येऊ लागल्याने त्याची चर्चा राजकीय वर्तुळात होऊ लागली आहे.

ही काय स्वतःला तारण्याची धडपड आहे की

आणखी काही ??

रविशंकर प्रसाद आणि प्रकाश जावडेकर यांच्यासारख्या वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या मंत्र्यांना देखील पंतप्रधान साहेबांनी झटक्यात बाहेर हाकलले होते.

आता काय गडकरी तो प्रकार होऊ नये म्हणून टाळण्याची खटपट तर करीत नसावेत ?

काही महिन्यांपूर्वीच त्यांनी आता त्यांना राजकारणात रस राहिला नसल्याचे म्हटले होते आणि निवृत्तीची इच्छाही व्यक्त केली होती.

आता काय त्यांची त्या दिशेने तर वाटचाल चालू नसावी ???

## भीष्म की चाणक्य प्रतिज्ञा?

एखाद्या व्यक्तीने केलेल्या घोर प्रतिज्ञेला भीष्म प्रतिज्ञा म्हणून संबोधले जाते व मराठीत हे शब्द चांगलेच रूढ झाले आहेत.

परंतु सर्वांना माहिती आहे की आर्य चाणक्याने देखील अशीच घोर प्रतिज्ञा केलेली होती.

मगध साम्राज्य वैभवाच्या कळसाला असताना सत्तेने उन्मत्त झालेल्या धनानंद राजाने चाणक्याचा भर दरबारात अपमान केला होता. त्याची शेंडी विस्कटून टाकली होती.

संतप्त चाणक्याने तेथल्या तेथे प्रतिज्ञा केली होती की धनानंदाचा नायनाट केल्यानंतरच आपण शेंडीला गाठ मारु !

मगध साम्राज्य म्हणजे सध्याचे बिहार राज्य आहे तो प्रदेश !

आता चाणक्याचा वारसा लाभलेले राज्य म्हटल्यावर त्याचा प्रभाव असणारच ना ?

भाजपला टांग मारुन राष्ट्रीय जनता दलाबरोबर रातोरात हातमिळवणी करुन मुख्यमंत्रीपद कायम ठेवणारे नीतीशकुमार हेही एक प्रकारे चाणक्यनीती करीतच आहेत. परंतु भाजपचे नेते मात्र नीतीशकुमार यांचे राज्य किंवा सरकार कसे नष्ट करता येईल यासाठी प्रयत्नशील आहेत. बिहार विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते आणि भाजपचे वरिष्ठ नेते सम्राट चौधरी हे सध्या भगव्या रंगाचा फेटा घालून सगळीकडे वावरताना दिसतात. भाजपच्या संभाव्य मुख्यमंत्र्यांच्या यादीत त्यांचाही समावेश असल्यानेच त्यांच्या नाट्यमय वागण्यासही एक झळाली आली आहे.

तर ते सध्या भगव्या फेट्यात





वावरण्याचे कारण काय ?

नीतीशकुमार यांचे सरकारचा खातमा होत नाही तोपर्यंत आपण हा भगवा फेटा डोक्यावर वागविणार आहोत असे त्यांनी जाहीरपणे सांगितले.

जेव्हाजेव्हा नीतीशकुमार यांची माझ्यावर नजर पडेल तेव्हा तेव्हा त्यांना माझ्या शपथेची आठवण देणारा हा फेटा असेल. हा फेटा नाही तर नीतीशकुमार यांच्या सरकारचे ते कफन आहे असे वर्णनही ते करतात.

अर्थात त्यांची ही शपथ किंवा प्रतिज्ञा आणि फेट्याचे नाटक कुणीच फारशा गांभीर्याने घेताना आढळत नाही.

नीतीशकुमार यांची मुख्यमंत्रीपदावरील पकड पक्की आहे आणि राष्ट्रीय जनता दलाबरोबर त्यांचे सरकार व्यवस्थित चालू असल्याने सम्राट चौधरी यांना त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळेल असे वाटत नाही अशी त्यांची चेष्टा केली जात आहे.

# यात्रांच्या राजकारणाला वेग?

राहूल गांधींनी केरळपासून भारत जोडो यात्रा सुरु केली.

एखादा नेता जेव्हा रस्त्यावर उतरुन थेट लोकांपर्यंत पोहोचू लागतो तेव्हा त्याचा वेगळाच परिणाम होत असतो.



जनसामान्यांशी त्याचे आपोआपच नाते जोडले जाऊ लागते.

महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे यांच्यासारख्या महान नेत्यांनी याच मार्गाने जनसामान्यांबरोबर थेट नाळ जोडली होती.

माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देखील भारत-पदयात्रा केली होती आणि त्या यात्रेला तुफान प्रतिसाद मिळाला होता.

इलेक्ट्रॉनिक युगाचा कितीही विकास झाला तरी शेवटी मनुष्याचा परस्परांबरोबर येणारा प्रत्यक्ष संपर्क हा सर्वश्रेष्ठ मानवी संपर्क असतो हे वास्तव कालातीत आहे. त्यामुळेच जेव्हा नेते आपल्या कोषातून बाहेर येऊन थेट जनसामान्यांमध्ये मिसळू लागतात तेव्हा त्या नेत्याला वेगळे वलय प्राप्त होते.

राहूल गांधी यांना पप्पू पप्पू म्हणून प्रचारकांनी आतापर्यंत भरपूर छळून काढले. त्यांच्या भारत जोडो यात्रेची देखील यथेच्छ टिंगल टवाळी केली जात आहे. पण त्या यात्रेला मिळणारा प्रतिसाद कुणालाच नजरेआड करता येत नसल्याने प्रचारकांच्या परिवारात अस्वस्थता पसरत आहे. या यात्रेचे वार्तांकन माध्यमांनी करु नये यासाठी त्यांच्यावर दबावतंत्राचा व आमिषे दाखविण्याच्या तंत्राचा वापर सुरु आहे.

असे असले तरी काही प्रमाणात का होईना या यात्रेचे वार्तांकन किंवा यात्रेची दखल माध्यमांना घ्यावीच लागत आहे.

या यशामुळेच आता राहूल गांधी यांना हिणविण्याचे धंदे करणाऱ्यांना देखील थेट लोकसंपर्कासाठी रस्त्यावर उतरण्याची इच्छा होऊ लागली आहे.

कर्नाटकात पुढील वर्षी विधानसभा निवडणूक आहे. राहूलच्या यात्रेला कर्नाटकात भरघोस प्रतिसाद मिळाला.

आता त्याचा प्रभाव पुसण्यासाठी कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे स्वतःच यात्रा काढणार असल्याची माहिती आहे.

या यात्रेचे नेतृत्व भाजपचे आजी-माजी मुख्यमंत्री करणार आहेत.

वर्तमान मुख्यमंत्री बोम्मई



यांच्याबरोबरच माजी मुख्यमंत्री बीएस येद्युरप्पा हेही या यात्रेत सहभागी होणार आहेत. या यात्रेला 'जनसंकल्प यात्रा' असे नाव देण्यात आले आहे.

कर्नाटकातील राजकारणाचे तीन मुख्य ध्रुव आहेत.

काँग्रेस, भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दल. काँग्रेस आणि भाजपने यात्रा राजकारण सुरु केल्यानंतर जनता दलाचे नेते स्वस्थ कसे बसतील ?

माजी पंतप्रधान व वयोवृध्द नेते एचडी देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली 'पंचरत्न यात्रा' सुरु करण्यात आली आहे. या सर्वाचा अर्थ एकच आहे की राहूल गांधी यांची यात्रा यशस्वी होताना दिसते आहे आणि तिला प्रतिसादही चांगला मिळत आहे.

या यात्रेवरुन लोकांचे लक्ष उडविण्यासाठी ब्रह्मांडनायकांनी बेकार युवकांना जाहीर नोकऱ्या देण्याचा कार्यक्रम आखला होता.

पण तो अक्षरशः फुसका बार ठरला. पीएफआय - पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेवर देशव्यापी छापे मारुन मुस्लिमांना उचकविण्याचा आणि जेणे करुन त्यांनी काही गडबड केल्यास राहूल यांच्या यात्रेत विघ्न आणण्याचा हेतु या छाप्यांमागे होता हे आता स्पष्ट झाले आहे.

कारण छापे घातल्यानंतर पुढे कोणतीच हालचाल झालेली नाही. त्यामुळे हाही बार फुकट गेला.

आता अस्वस्थचित्त ब्रह्मांडनायक आणखी कोणते कारनामे करुन या यात्रेत विघ्न आणू इच्छितात हे यात्रा जसजशी पुढे जाईल तसे कळून येईल.

## स्वामींना भीती वाटते आहे?

अति चापलूसीची परिणिती कशात होऊ शकते ?

त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे



सुब्रह्मण्यम स्वामी हे आहे.

भारतीय राजकारणात केवळ विध्वसंकाची भूमिका वठवत आलेल्या स्वामींना आता त्यांच्या जिवालाच धोका होण्याची शक्यता व भीती वाटू लागली आहे. एकेकाळी भारतीय राजकारणात 'नको ती बला किंवा कटकट' म्हणून राजकीय नेते स्वामींपासून दोन हात दूर राहणे पसंत करीत एवढे उपद्रव मूल्य त्यांनी प्राप्त केले होते. आता त्यांनाही कुणीतरी सवाई भेटल्याचे दिसत आहे.

स्वामींच्या राज्यसभा सदस्यत्वाची मुदत एप्रिल महिन्यातच संपली. त्यानंतरही त्यांनी खासदार म्हणून मिळणारा बंगला सोडलेला नव्हता.

सहा महिन्यानंतर त्यांना बंगला सोडण्यासाठी नोटिस गेली. परंतु आपल्याला झेड श्रेणीची सुरक्षा असल्याने आपल्याला सरकारतर्फे निवासस्थानाची सोय केली गेली पाहिजे असा युक्तिवाद त्यांनी केला. परंतु सरकारने नियमानुसार त्यांना बंगला देता येणार नाही कारण त्यांचे स्वतःचे राहते घर दिल्लीत आहे व तेथे सुरक्षा दिली जाईल असे स्पष्ट केले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट व अनिर्णित अवस्थेत आहे.

सध्या सोशल मीडियावर या प्रकरणी जोरदार चर्चा-प्रतिचर्चा सुरु आहे. काहीजणांनी स्वामींना तुम्हाला एवढे घायकुतीला येण्याचे कारण काय म्हणून विचारले असता त्यांनी दिलेले उत्तर विलक्षण होते. त्यांनी लिहिले, 'मला माझा हरेन पंड्या होऊ द्यायचा नाही !'

हरेन पंड्या म्हणजे काय ??

हरेन पंड्या गुजरात भाजपचे वरिष्ठ नेते व गृहमंत्री होते.

२००२च्या दंग्यांनंतर त्यांची हत्या करण्यात आली होती. सध्याचे पंतप्रधान गुजरातचे मुख्यमंत्री होते.

त्यांच्या हत्येच्या संदर्भात



पत्रकार जोसी जोसेफ यांनी लिहिलेल्या पुस्तकात(द सायलेंट कू) काही चकित करणारी माहिती आहे. या दंग्यांच्या तपासाच्या संदर्भात नागरिकांची एक समिती माजी न्यायमूर्ति व्ही. कृष्णा अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली नेमली होती. या समितीला हरेन पंड्या हे गुप्तपणे भेटल्याची माहिती उघड झाली होती. त्यानंतर काहीच दिवसात त्यांची गोळी घालून हत्या करण्यात आली होती. या हत्येत सामील शूटर सोहराबुद्दिन शेख, तुलसीराम प्रजापति यांचा पोलिसांच्या चकमकीत मृत्यु झाला होता. ही सर्व माहिती लक्षात घेता स्वामींची 'हरेन पंड्या होण्याची' भीती गंभीर आहे.

भारतात हिंदूंचे खरे सरकार सत्तारूढ झाल्याचा उमाळा स्वामींना आला आणि ते भाजपमध्ये २०१४नंतर सामील झाले. त्यांना वाटले नवे सत्ताधीश त्यांच्या सल्ल्याने चालतील पण त्यांना चक्क अडगळीत टाकण्यात आल्याने त्यांचा तिळपापड झाला.

त्यांचा वापर काँग्रेस व सोनिया गांधी यांच्या विरोधात करुन घेतल्यानंतर त्यांना अडगळीत टाकण्यात आले.

आता मात्र त्यांच्यातली उपद्रवक्षमता संपली असावी आणि त्यामुळेच त्यांना भीती वाटू लागली असावी. दुसऱ्यांना उपद्रव करणाऱ्यांची अखेरीला हीच अवस्था होते.

## प्रवेश वर्मा दुःखी का ?

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री साहिबसिंग वर्मा यांचे चिरंजीव प्रवेश वर्मा आहेत. साहिबसिंग यांच्या अकाली मृत्युमुळे त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवरुन त्यांनी निवडणूक लढवून राजकारण प्रवेश केला. लोकसभेच्या सलग तीन निवडणुका त्यांनी विक्रमी मताधिक्याने जिंकल्या.

यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळात आपला समावेश व्हावा अशी इच्छा त्यांना होणेही स्वाभाविक आहे.



परंतु याआधी त्यांच्या ऐवजी दिल्लीतून हर्षवर्धन आणि विजय गोयल यांना संधी देण्यात आली. या दोघांनाही करोनानंतर घरी पाठविण्यात आले.

त्यानंतर तरी दिल्लीचे प्रतिनिधी म्हणून आपल्याला केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळेल अशी अपेक्षा त्यांना होती.

परंतु त्यावेळच्या मंत्रिमंडळ फेरबदलातही प्रवेश वर्मा यांना डावलण्यात आले. त्यांच्या ऐवजी मीनाक्षी लेखी या प्रथमच खासदार झालेल्या महिला नेत्यास संधी देण्यात आली. यामुळे प्रवेश वर्मा व त्यांच्या समर्थकात निराशेची लाट पसरणे स्वाभाविक आहे. प्रवेश वर्मा जाट समुदायाचे आहेत. हरयानात जाट समुदायाला मुख्यमंत्रीपद नाकारण्यात आले असल्याने केंद्रीय मंत्रिमंडळात जाट समुदायाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे हा त्यांचा व त्यांच्या अनुयायांचा आग्रह आहे.

अखेर त्यांनी सहनशक्ति संपून त्यांनी बेताल व बाष्कळ आणि पक्षाला अडचणीत आणणारी विधाने करण्यास सुरुवात केली. त्या मालिकेतच त्यांनी एक ताजे विधान करुन मुस्लिम समाजावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन जाहीर सभेत केले. त्याच्या अत्यंत तीव्र प्रतिकूल प्रतिक्रिया उमटल्या आणि सर्वोच्च न्यायालयाने अशी चिथावणीखोर विधाने करणाऱ्यांविरुध्द तक्रारी होण्याची वाट न पाहता कारवाई करण्याचा आदेश पालिस यंत्रणांना दिला आहे आणि हे न केल्यास कोर्टाच्या अवमाननेला तोंड देण्यास तयार रहा असा इशाराही दिला आहे.

आता प्रवेश वर्मा यांना मंत्रीपदाचे 'बक्षीस' मिळणार काय याचीच प्रतीक्षा आहे.

■■



# Nanded City, Pune
The Maximum City
Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

## प्रत्येक घराला एक मन असतं.
## प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

### आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

### CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

### जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

**महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने दि. ४ आणि ५ नोव्हेंबर २०२२ रोजी शिर्डी येथे राज्यातील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी 'राष्ट्रवादी मंथन: वेध भविष्याचा' हे दोन दिवसांचे शिबिर झाले. राजकारणाच्या धबडग्यात राजकीय कार्यकर्त्यांचे प्रबोधन महत्त्वाचे असते. वर्तमानातील प्रश्नांचा वेध घेतानाच भविष्यातील आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन केले होते. त्यानिमित्त घेतलेला धांडोळा.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष येत्या जून महिन्यात रौप्यमहोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे. राजकीय पक्षाचे आयुर्मान मोजायचे झाल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आता वयात येऊ घातला आहे. गेल्या २५ वर्षात राज्याचे आणि देशाचे राजकारण सतत बदलते राहिले आहे. या काळात झालेल्या अनेक राजकीय घडामोडींचा आर्थिक व सामाजिक परिणाम मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. आपल्या देशात राजकीय पक्ष जन्माला येण्याची प्रक्रिया सतत सुरू असते आणि त्यातले अनेक पक्ष हे पहिल्या काही दिवसातच संपून जातात. आदरणीय नेते शरद पवार साहेबांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची मुहूर्तमेढ रोवली त्यावेळीसुद्धा हा पक्ष फार काळ अस्तित्वात राहणार नाही आणि तो एखाद्या मोठ्या पक्षात बहुधा कॉंग्रेसमध्ये विलीन होईल असे भविष्य अनेक राजकीय विश्लेषकांनी वर्तविले होते. परंतु छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशांसारख्या महान नेत्यांची परंपरा जपणारा पक्ष म्हणून आता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची ओळख आहे. आपल्या प्रवासाच्या या टप्प्यावर पक्षाची आयडियॉलॉजी (विचार) आणि पक्षाचे व्हीजन याबद्दल विचार मंथन होणे गरजेचे आहे.

प्रत्येक राजकीय पक्ष आपली स्वत:ची एक व्होट बँक बनवत असतो. धर्माचा अतिरेकी वापर करून सध्या आपण धर्माचे स्तोम माजवणाऱ्या एका वेगळ्या नेतृत्वाखाली देशाची हुकूमशाहीकडे होणारी वाटचाल बघतो आहोत. सत्ताधाऱ्यांनी व्यक्त केलेल्या कुठल्याही वर्तनाबद्दल जरा कोणी असहमती किंवा विरोध दर्शविला तर लगेचच त्याला देशद्रोही म्हणून

# कार्यकर्त्यांच्या प्रबोधनाचा 'राष्ट्रवादी' प्रयोग

**हेमंत टकले**



हिणवले जायला सुरुवात झाली आहे. 'देशभक्त विरोधी देशद्रोही' अशी एक भलतीच लढाई समोर येत आहे. देशातला मध्यम वर्ग हा अधिकाधिक आर्थिक सुस्थितीत जाऊन त्याला समाजातल्या खालच्या वर्गाशी काहीही देणेघेणे उरलेले नाही. देशातील आर्थिक घराणी गेल्या काही वर्षांत तूफान वेगाने धनाढ्य होत आहेत. जगातल्या सर्वात श्रीमंत लोकांच्या यादीत अकरा भारतीय उद्योगपतींचा समावेश असणे याबद्दल आश्चर्य वाटण्यासारखे काहीही राहिले नाही.



चीन किंवा अमेरिकेसारखे देश भारताकडे एक उत्तम बाजारपेठ म्हणून नजर लावून बसले आहेत. आज खेड्यापाड्यात सुद्धा सॅमसंगच्या अँन्ड्रॉईड मोबाईलची मोठाली होर्डिंग सहज पहायला मिळतात. यासर्व पार्श्वभूमीवर देश सातत्याने कुठल्या न कुठल्या निवडणुकांना सामोरे जात असतो आणि संपत्तीच्या जोरावर राजकारणात सत्ता हस्तगत करणे हा तर आता एक सोपा खेळ तयार झाला आहे. लोकशाहीचे जे चार प्रमुख स्तंभ आहेत त्यापैकी शासन, प्रशासन, प्रसार माध्यम हे सर्व आता सत्ताधाऱ्यांचे बटिक झालेले आहेत. सामान्य माणसांसाठीचा दिलासा म्हणजे देशातील न्यायव्यवस्था. पण सर्वोच्च न्यायालयापासून तर अगदी शेवटच्या दिवाणी न्यायालयापर्यंत वरून सांगितलेले निकाल दिले जात आहेत ही फार मोठी शोकांतिका आहे. अशा परिस्थितीत केडरबेस म्हणून स्वातंत्र्य पूर्व काळातील काँग्रेस आणि नंतरच्या काळातला भारतीय जनता पक्ष यांचे केडर नक्की काय करत आहेत हा एक संशोधनाचा विषय ठरेल. झटपट श्रीमंत होण्यासाठी राजकारण हा बिन गुंतवणुकीचा मस्त धंदा आहे अशी कार्यकर्त्यांची समजूत झाली तर लोकशाहीला अर्थच उरणार नाही.

आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रत्येक देश आपली अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी युध्द होण्याची वाट बघत असतो. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आण्विक शस्त्रांची निर्मिती करण्याची एक शर्यत लागते आणि मग, देशप्रेमाच्या नावाखाली युद्ध खेळवली जातात. रशिया असो, चीन असो, अमेरिका असो किंवा आपला नव्याने मित्र झालेला फ्रान्स असो. सगळ्यांनाच युध्द व्हावे असे सारखे वाटत असते. इतिहासातली बांग्लादेशाची निर्मिती असो, रशियाचे अनेक तुकडे झालेले असो किंवा व्हिएतनाम युध्द असो. या सगळ्या निरर्थक खेळांमधून नैसर्गिक साधनांवर कब्जा मिळविण्यासाठी चाललेले हे प्रयोग आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर एखाद्या तरुणाने जर राजकारणात यायचा विचार केला आणि कुठल्याही राजकीय पक्षाची आयडियॉलॉजी पटवून त्या पक्षात जायचे ठरवले आणि त्याने जर 'मी तुमच्या पक्षात का येऊ?' असा प्रश्न विचारला. आणि या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही, तो पर्यंत मी पक्षात येणार नाही, असे म्हणाला तर त्याला समाधानकारक उत्तर आजघडीला फक्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच देऊ शकतो. कारण या पक्षाकडे शरद पवार यांच्यासारखे दिशादर्शक नेतृत्व आहे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष एका विचारधारेवर चालला आहे. देशाला, राज्याला विज्ञाननिष्ठ पायांवर पुढे नेण्याची भूमिका ते सातत्याने मांडत आले आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांची मनोभूमिका तयार व्हावी, यासाठी पक्षांतर्गत अनेक व्यासपीठांच्या माध्यमातून त्यांचे प्रशिक्षण, प्रबोधन करण्यात येत असते. पक्षाने यापूर्वी अलिबाग, पुणे, कर्जत आदी ठिकाणी अभ्यास शिबिरे घेतली आहेत. एक वर्षापूर्वी महाबळेश्वर येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अभ्यास शिबिर झाले होते. शरद पवार यांना अपेक्षित पक्षाची उभारणी व्हावी; राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत सजग व्हावा यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या संकल्पनेतून शिर्डी येथील अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या काळात राज्यासमोर, देशासमोर अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. आर्थिक पातळीवरच्या आव्हानांनी गंभीर स्वरुप धारण केले आहे. केंद्रातील सत्ताधा-यांनी घटनात्मक संस्थांचे खच्चीकरण केले आहे. बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून तो आजघडीचा देशासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे. समाजा-समाजामध्ये द्वेषाच्या भिंती उभारण्यात येत आहेत. केंद्रातील सरकार अनेक आघाड्यांवर अपयशी ठरत असताना सोशल मीडियाच्या माध्यमातून अपप्रचार करून समाजामध्ये भ्रम निर्माण करण्यात येत आहे. अशा सगळ्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या मनाची मशागत होणे गरजेचे असून त्यादृष्टिने शिर्डीचे शिबिर महत्त्वाचे ठरले आहे. २०२४च्या निवडणुकांना सामोरे जाण्यासाठीची दिशा या शिबिरातून मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे.

**(लेखक माजी विधान परिषद सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कोषाध्यक्ष आहेत.)**

■■



## शेवटचे पान



# ‘रेड अलर्ट’

खिडक्या, दरवाजे आणि भिंती,
जन्माला आल्यापासून पिच्छा करतायत,
श्वास कोंडून जगणं अवघड झालयं...
पूर्वी वाडे होते, गल्ल्या होत्या, आळ्या होत्या,
पण सगळं मोकळं ढाकळं होतं, बंद शब्दच नव्हता...
मला कुणी जात विचारली नाही, धर्म विचारला नाही,
पुढे पैसा मोठा झाला, आपण मात्र लहान झालो,
आता नव्या भिंती उंचच उभ्या राहतायंत तुरुंगागत...
देशच तुरुंग झालाय, जेलर एक की दोन माहित नाही,
न जानो कदाचित गॅस चेंबर्स सुद्धा उभे राहतील.
दु:ख हे आहे की अनेकांनी ही जन्मठेप स्विकारलीच,
हिच वेळ आहे संघर्ष करण्याची आर नाही तर पार,
तुम्ही मी लढतांना संपलो तरी बेहत्तर,
पण पुढच्या पिढीसाठी बंधनमुक्त देह बनू या,
हुकूमशहा स्वत:च स्वत:ला संपवतील
हा ‘रेड अलर्ट’ आहे सज्ज व्हा....!